# मत्तयाचे शुभवर्तमान

1 1 येशू ख्रिस्तांची वंशावळी जे दाविद व अब्राहामाच्या वंशाचे होते.
2 अब्राहामाच्या मुलाचे नाव इसहाक आणि इसहाकाच्या मुलाचे नाव
याकोब होते. याकोबापासून यहूदा व त्याचे भाऊ झाले होते. 3 यहूदा आणि
तामारेपासून पेरेस व जेरह झाले होते. पेरेसाचा मुलगा हेस्रोम आणि हेस्रोमाचा
मुलगा अराम होता. 4 अरामापासून अम्मीनादाब; अम्मीनादाबापासून नहशोन
आणि नहशोनापासून सलमोन झाला. 5 सल्मोनाला आणि राहाबेला बवाज
आणि बवाज व रूथेपासून ओबेद झाला, ओबेदाला इशाय. 6 इशायाचा
मुलगा दावीद राजा झाला. 7 उरीयाची पत्नी आणि दावीदापासून शलमोन
झाला. 8 शलमोनाचा मुलगा रहबाम होता, रहबामाचा मुलगा अबीया आणि
अबीयापासून आसा, आसापासून यहोशाफाट; यहोशाफाटापासून योराम आणि
योरामापासून उज्जीया झाला. 9 उज्जीयापासून योथाम, योथामापासून आहाज
आणि आहाजापासून हिज्कीया झाला. 10 हिज्कीयापासून मनश्शे, मनश्शेपासून
आमोन आणि आमोनापासून योशीया उत्पन्न झाला. 11 यहूदी लोक बाबेलाला
जात होते तेव्हा योशीयापासून यखन्या आणि त्याच्या भावांनी जन्म
घेतला. 12 बाबेलास गेल्यानंतर यखन्यापासून शल्तीएल आणि शल्तीएलाने
जरूब्बाबेल याला जन्म दिला. 13 जरूब्बाबेलाने अबीहूद आणि अबीहूदाने
एल्याकीम आणि एल्याकीमाने अज्जुराला जन्म दिला. 14 अज्जुराला सादोक
आणि सादोकाला याखीम आणि याखीमापासून एलीहू ाचा जन्म झाला.
15 एलीहूदापासून एलाजार, एलाजारापासून मत्तान आणि मत्तानापासून
याकोब झाला. 16 याकोबापासून योसेफ जो मरीयेचा पति होता, जिच्यापासून
येशू ख्रि ास्तांनी जन्म घेतला. 17 अब्राहामापासून दावीदापर्यंत चौदा पिढया;
दावीदापासून बाबेलाच्या गुलामीपासून ख्रिस्तापर्यंत चौदा पिढया झाल्यात.
18 येशू ख्रिस्तांचा जन्म याप्रकारे झाला. योसेफाबरोबर मरीयेच्या मागणीनंतर
त्याचा शारीरीक संबंध होण्यापूर्वीती पवित्रात्म्याद्वारे गर्भवती झाली. 19 एक
नीतिमान व्यक्ती असल्यामुळे योसेफाने गुप्तपणे मागणीची शपथ मोडण्यचा

विचार केला कारण तो मरीयेची बदनामी पाहू शकत नव्हता. 20 परंतु जेव्हा तो
असा विचार करत होता, तेव्हा अचानक स्वप्नात परमेश्वरबापांचा एक स्वर्गदूत
प्रगट होऊन म्हणाला, "दावीदाच्या वंशातल्या योसेफा, मरीयेचा स्वीकार
करायला आणि तिला आपल्याकडे आणायला घाबरू नको, तिच्या गर्भाचे जे
फळ आहे ते पवित्रात्म्यापासून आहे. 21 तिला एक पुत्र होईल, तू त्याचे नांव
येशू ठेव, कारण तो आपल्या लोकांना त्यांच्या पापांपासून वाचवेल. 22 हे सर्व
यासाठी घडले कारण जे काही प्रभूजींनी संदेष्टयांद्वारे सांगितले होते, ते पूर्ण
व्हावे; ते हेच की, "पहा, एक कुमारी गर्भवती होईल आणि तिला एक पुत्र
होईल आणि त्याचे नाव "इम्मानुएल" ठेवतील ज्याचा अर्थ असा आहे "आपल्या
बरोबर परमेश्वरबाप" असे ठेवले जाईल. 24 झोपेतून जागा झाल्यानंतर त्याने
तसेच केले जसे प्रभूंच्या स्वर्गदूताने त्याला करण्याची आज्ञा दिली होती.
25 परंतु, जोपर्यंत मरीयेने आपल्या प्रथम पुत्राला जन्म दिला नाही तोपर्यंत
त्याने तिच्याशी शारीरीक संबंध ठेवला नाही आणि त्याने त्याचे नांव येशू असे
ठेवले.

2 1 हेरोद राजाच्या दिवसात यहूदाच्या बेथलेहेमात जेव्हा येशूंचा जन्म
झाला तेव्हा पूर्वेकडच्या देशातून ज्योतिषी यरूशलेमेतून येऊन विचारू
लागलेत, 2 "यहूदयांचा राजा ज्याचा जन्म झाला आहे, तो कोठे आहे? कारण
आम्ही पूर्व दिशेस त्याचा तारा पाहिला आहे आणि आम्ही त्यांची आराधना
करण्यासाठी आलो आहोत" 3 "हेरोद राजा आणि यरूशलेमेतील लोक असे
ऐकून घाबरून गेले. 4 तेव्हा राजाने लोकांचे प्रमुख याजक आणि शास्त्री यांना
जमवून विचारले, "ख्रि◌ास्तांचा जन्म कोठे होऊ शकतो?" 5 त्यानी त्याला
उत्तर दिले, "यहूदाच्या बेथलेहेमात, कारण संदेष्टयांनी असे लिहिले आहे
की, 6 यहूदातील प्रांता, हे बेथलेहेमा तू यहूदाच्या सर्व पुढाऱ्यामध्ये लहान
नाहीस कारा तुझ्यातून एक शासक (राजा) निघेल जो माझ्या इस्त्राएली
लोकांचा मेंढपाळ होईल" 7 तेव्हा हेरोदाने ज्योतिषांना गुप्तपणे बोलावून
विचारले, "तारा दिसण्याची निश्चित वेळ कोणती होती?" 8 त्याने त्यांना
बेथलेहमाला पाठवतांना म्हटले, त्या बाळाविषयी व्यवस्थित विचारपूस करा.
तो साप1डल्यावर मला कळवा म्हणजे मी देखील जाऊन त्याला दंडवत करीन.

9 राजाचे ऐकून ते निघाले. पूर्वेकडचा तारा त्यांच्या पुढे-पुढे चालला आणि
ज्या जागी ते बाळ होते त्या जागेच्या वर जाऊन थांबला. 10 तो तारा पाहून
त्यांना खूप आनंद झाला. 11 तेथेच आत गेल्यावर त्या ज्योतिषांनी येशूंना
आपल्या थैल्या/पिशव्या आपली आई मरिया हिच्याजवळ पाहिला. त्यानी
वाकून येशूंना नमन केले आणि आपल्या पिशव्या सोडून त्यानी सोन, ऊद व
गंधरस अर्पण केले. 12 परमेश्वरबापांनी त्यांना स्वप्नात हेरोदाकडे न जाण्याची
ताकीद दिली त्यामुळे ते दुसऱ्या मार्गाने आपल्या देशाकडे निघून गेले. 13 ते
गेल्यानंतर एका परमेश्वरदूताने स्वप्नात योसेफाला असे सांगितले, "उठ! बाळ व
त्याच्या आईला घेऊन मिसर देशात पळून जा; जोपर्यंत मी तुला सांगत नाही
तोपर्यंत तेथेच राहा. कारण हेरोद बाळकाचा प्राण घेण्याच्या बेतात आहे,
शोधात आहे." 14 योसेफ रात्रीच उठला आणि बाळ व त्याची आई मरिया यांना
घेऊन अंधारातच तो मिसर देशाकडे निघून गेला. 15 तो हेरोदाच्या मृत्युपर्यंत
तेथेच राहिला; यासाठी की परमेश्वराच्या संदेष्टयांनी जे काही म्हटले होते, "की
मी आपल्या पुत्राला मिसर देशातून बोलावले" ते पूर्ण व्हावे. 16 जेव्हा हेरोदाने
पाहिले कि, ज्योतिषांनी आपल्याला धोका दिला, तेव्हा तो रागाने भरून गेला
आणि लोकांना पाठवून, ज्योतिषांनी जी निश्चित वेळ त्याला सांगितली होती
त्याप्रमाणे त्याने बेथलेहेम आणि त्याच्या आसपासच्या सर्व प्रदेशात राहणाऱ्या
सर्व दोन वर्षाच्या व त्यापेक्षा कमी वयाच्या बाळांना मारून टाकले. 17 यिर्मया
संदेष्टयाद्वारे सांगितले होते ते पूर्ण झाले. 18 रामा येथे एक करून नाद ऐकण्यात
आला, रडणे व मोठा विलाप! राहेल आपल्या बाळांसाठी रडत आहे आणि शांत
होत नाही कारण ती बाळके आता जिवंत नाहीत. 19 हेरोदाच्या मृत्युनंतर
प्रभूंच्या परमेश्वरदूताने मिसर देशात योसेफाला स्वप्नात दर्शन देऊन सांगितले,
20 "उठ बाळाला व त्याच्या आईला घेऊन इस्त्राएल देशात जा, कारण बाळाचे
प्राण घ्यावयास पहात होते ते मरून गेले आहेत." 21 तो उठला आणि बाळ
व त्याची आई यांना घेऊन इस्त्राएल देशात आला. 22 परंतु हेरोदाचा मुलगा
अर्खेलाव आपल्या पित्याच्या जागी यहूदीयात शासन करत आहे हे ऐकून तो
तेथे जाण्यास घाबरला. मग स्वप्नात सूचना मिळाल्यामुळे तो गालीलाच्या
प्रदेशात निघून गेला. 23 आणि नासरेथ नावाच्या नगरात जाऊन राहू लागला.

"त्यांना (येशूंना) नासोरी म्हणतील हे जे म्हटले गेले होते. ते पूर्ण व्हावे म्हणून
असे झाले."

3 1 त्या दिवसात बाप्तिस्मा करणारा योहान यहूदीयाच्या जंगलात येऊन
असा संदेश देऊ लागला, 2 "अंतःकरणापासून पश्चाताप करा, मन बदला
कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे. 3 हा तोच आहे ज्याच्याविषयी यशया
संदेष्टयाने भविष्यवाणी केली होती; ती हीच की जंगलात घोषणा करणाऱ्याचा
आवाज ऐकू आला की, प्रभु परमेश्वराच्या आगमनासाठी आपल्या स्वतःला
तयार करा. 4 योहान उंटाच्या केसाचे कपडे घालत असे. तो टोळ व मध खात
असे. 5 यरूशलेम, सर्व यहूदीया व यार्देनेच्या आसपासचे लोक योहानाकडे
येऊ लागले. 6 आपतुझे पाप स्वीकार केल्यानंतर योहान त्याचा यार्देन नदीत
बाप्तिस्मा करत असे. 7 जेव्हा त्याने पुष्कळ परूशी व सर्व सदूकी यांना
बाप्तिस्म्यासाठी आपल्याकडे येतांना पाहिले तेव्हा तो त्यांना म्हणाला, "हे
सांपाच्या पिलांनो, भविष्यातील न्यायापासून, क्रोधापासून पळण्यासाठी व
आपला बचाव करण्यासाठी कोणी तुम्हाला सावध केले? 8 यासाठी की तुमचे
हृदय परिवर्तनाचे फळ तुमच्या जीवनात प्रगट व्हावे. 9 या गोष्टीची कल्पना
आणि विचार आपल्या मनात आणू नका की, अब्राहाम तुमचा पिता आहे;
कारण मी तुम्हाला सांगतो की, या दगडापासून अब्राहामासाठी मुले निर्माण
करण्यासाठी परमेश्वर समर्थ आहे. 10 आता कुऱ्हाड झाडांच्या मुळाशी ठेवलेली
आहे. यास्तव जे झाड चागले फळ देत नाही ते तोडून अग्नीत टाकले जाते. 11 मी
पाण्याने तुमचा बाप्तिस्मा करतो पण माझ्यानंतर जे येणार आहेत ते माझ्यापेक्षा
अधिक सामर्थी व समर्थ आहेत; मी त्याचे जोडे उचलण्याच्या लायकीचाहि
नाही. ते तुमचा पवित्रात्म्याने आणि अग्नीने करणार आहे. 12 त्याचा सूप
त्यांच्या हातात आहे. ते तुझे खळे अगदी स्वच्छ करतील. आपण गहू कोठारात
गोळा करतील, परंतु भूस न विझणाऱ्या अग्नीत जाळून टाकतील. 13 त्यावेळी
येशू गालीलातून यार्देनेच्या किनाऱ्याकडे योहानाकडे बाप्तिस्मा घेण्यासाठी
आले. 14 परंतु योहान त्यांना मना करत म्हणाला, "मी आपल्या हातून बाप्तिस्मा
घ्यावा याची आवश्यकता असून देखील, आपण माझ्या हाताने बाप्तिस्मा
घ्यायला येता, हे कसे काय? 15 येशूंनी त्याला उत्तर दिले, "आता असेच

होऊ दे, कारण याचप्रकारे करणे आपल्यासाठी उचित आहे. तेव्हा योहानाने
त्याचे म्हणणे ऐकले. येशू बाप्तिस्मा घेऊन लगेच वर आले तेव्हा त्यांच्यासाठी
आकाश उघडले. येशूंनी परमेश्वरांचा आत्मा फाख्यासारखा (पक्षी) उतरतांना व
आपणावर येतांना पाहिला. 17 याबरोबरच आकाशातून अशी वाणी झाली की,
"हा माझा प्रिय पुत्र आहे, याच्याविषयी मी अत्यंत आनंदी संतुष्ट आहे".

4 1 सैतानाकडून येशूंची परिक्षा व्हावी म्हणून बाप्तिस्म्यानंतर पवित्रात्मा
येशूंना जंगला घेऊन गेला. 2 चाळीस दिवस व चाळीस रात्री उपास
केल्यामुळे येशूंना जोरदार भूक लागली. 3 तेव्हा पारखणारा त्यांच्याजवळ
येऊन म्हणाला, "जर आपण परमेश्वराचे पुत्र आहात, तर या दगडांना आज्ञा
करा की त्यानी भाकरी व्हावे. 4 येशूंनी त्याला उत्तर दिले, "लिहिले आहे
की मनुष्य केवळ खाण्याद्वारे नव्हे तर परमेश्वरपित्यांच्या मुखातून बाहेर
निघणाऱ्या प्रत्येक शब्दाद्वारे जिवंत राहील. 5 तेव्हा सैतान त्यांना पवित्र
नगर यरूशलेमेतील मंदिराच्या शिरोभागी (सर्वात उंच स्थळ) घेऊन गेला व
म्हणाला, 6 "जर आपण परमेश्वराचे पुत्र आहात तर स्वतःला उडी टाकून खाली
पाडा, कारण लिहिले आहे की, परमेश्वरबाप आपल्या दूतांना आपल्याविषयी
आज्ञा देतील की, आपला पाय धोंडयावर आपटू नये, मार लागू नये. 7 येशूंनी
त्याला म्हटले, "हे देखील लिहिले आहे की, तू आपल्या प्रभु परमेश्वराची परिक्षा
पाहू नको, त्यांना पारखू नको 8 मग सैतान त्यांना एक अतिशय उंच डोंगरावर
घेऊन गेला, तेथून त्याने सर्व जगाचे राज्य आणि त्याचे वैभव त्यांना दाखवले.
9 आणि त्यांना हे सुद्धा म्हटले, "जर आपण पाया पडून मला दंडवत नमन केले
तर मी हे सर्वकाही आपल्यावर देऊन टाकीन." 10 तेव्हा येशू त्याला म्हणाले,
"अरे सैतान चालता हो, पळ येथून. कारण लिहिले आहे की, तू आपला परमेश्वर
परमेश्वर यांनाच नमन कर, त्यांचीच सेवा कर आणि केवळ त्यांचीच उपासना
कर." 11 तेव्हा सैतान तेथून पळाला आणि स्वर्गदूत येऊन येशूंची सेवा करू
लागले. 12 जेव्हा येशूंनी ऐकले की योहानाला अटक झाली आहे (कैदेत आहे)
तेव्हा ते स्वतः गालीलात निघून गेले. 13 तेथून ते नासरेथास गेले आ ा ि
त्यानंतर जबुलून व नफताली यांच्या क्षेत्रातील समुद्र किनाऱ्यारील कफर्णहूमात
राहू लागले. 14 यशया संदेष्टयाद्वारे म्हटलेली ही गोष्ट पूर्ण व्हावी म्हणून असे

झाले : [15] जबुलून आणि नफतालीचा देश, समुद्र किनाऱ्यावरचा, यार्देनेच्या
पलीकडचा परराष्ट्रीयांचा गालील - [16] जे लोक अंधारात बसलेले होते, त्यानी
एक भव्य प्रकाश पाहिलेला आहे, जे मृत्युच्या देशात आणि छायेत बसलेले होते.
त्याच्यावर ज्योति चमकलेली आहे." [17] त्या समयापासून येशू शिकवू आणि
सांगू लागले की अंतःकरणाने परिवर्तन करा, पश्चाताप करा, कारण स्वर्गाचे
राज्य जवळच आले आहे. [18] गालीलाच्या समुद्राजवळून जात असतांना त्यानी
शिमोन (पेत्र) व अंद्रिया नावांच्या दोन कोळी (मासे धरणारे) भावांना समुद्रात
जाळे फेकतांना पाहिले. [19] येशू त्यांना म्हणाले, "येऊन माझ्याकडून शिका की
कशाप्रकारे मनुष्यांची मनें परमेश्वरांसाठी जिंकून त्यांना अनंत जीवन प्रदान
केले जाऊ शकते." [20] ते लगेच तुझे जाळे सोडून येशूंच्या बरोबर गेले. [21] तेथून
जसेच येशू पुढे गेले, त्यानी आणखी दोन भावांना, म्हणजेच याकोब आणि
त्याचा भाऊ योहान अर्थात जब्दीच्या मुलांना व जब्दीला जाळे नीट करतांना
पाहिले आणि त्यानी दोन्ही मुलांना बोलावले. [22] ते देखील लगेच आपली होडी
व बाप याला सोडून येशूंच्या मागे चालू लागलेत. [23] येशू संपूर्ण गालीलातून
जातांना यहूदयांच्या आराधनालयात शिकवत राहिले आणि परमेश्वराच्या
राज्याच सुवार्ता सांगत सर्व प्रकारचा आजार बरा करत राहिले, दुर्बळता बरी
करत राहिले. [24] संपूर्ण सूरियात ते प्रसिद्ध झाले. लोकांनी रोग्यांना, भूत-प्रेत
ग्रस्त, मिरगी आणि लकव्याच्या पीडितांना येशूंजवळ आणले. येशूंनी त्या
सर्वांना बरे केले. [25] गालील दकापलीस, यरूशलेम, यहूदीया आणि यार्देन
नदीजवळच्या प्रदेशातून लोकांचे थव्यांचे थवे येशूंच्या मागे चालू लागले.

# 5

[1] येशू लोकांची ती गर्दी पाहून डोंगरावर चढले आणि बसले. तेव्हा
त्याचे शिष्य त्यांच्याजवळ आले. [2] त्यावेळी येशू त्यांना शिकवू लागले;
[3] आशीर्वादित आहेत ते लोक जे स्वभावाने साधे सरळ आहेत कारण स्वर्गाचे
राज्य त्याचेच आहे. [4] आशीर्वादित ते आहेत जे दुःख व शोक करतात कारण
त्यांना शांति प्राप्त होईल. [5] आशीर्वादित व धन्य आहेत ते जे नम्र आहेत कारण
ते पृथ्वीचे आधिकारी होतील. [6] आशीर्वादित ते आहेत जे नितिमत्वाचे भूकेले व
तान्हेले आहेत, कारण त्यांना भरपूर तृप्त केले जाईल. [7] आशीर्वादित ते आहेत
जे दयाळू आहेत कारण त्यांच्यावर दया केली जाईल. [8] आशीर्वादित व धन्य

आहेत ते ज्यांचे अंतःकरण शुद्ध आहे कारण ते परमेश्वर बापांना पाहतील.
9 धन्य आहेत ते जे शांति प्रस्थापित करतात कारण त्यांना परमेश्वरपित्यांची
मुले व मुली असे म्हटले जाईल. 10 आशीर्वादित ते आहेत जे आपल्या सत्य
वागणुकीमुळे, नितिमत्वामुळे छळले जातात कारण स्वर्गाचे राज्य त्याचेच आहे.
11 धन्य आहात तुम्ही जेव्हा लोक माझ्या नावामुळे तुम्हाला तुच्छ लेखतील,
छळतील आणि खोटे बोलून-बोलून तुमच्याविरूद्ध सर्व प्रकारचे वाईट बोलतील.
12 आनंदीत आणि मग्न व्हा, कारण तुमच्यासाठी स्वर्गात मोठे बक्षीस प्रतिफल्
आहे कारण तुमच्यापूर्वी जे संदेष्टे येऊन गेले त्याचा त्यानी असाच छळ केलेला
होता. 13 तुम्ही या पृथ्वीचे मीठ आहात, पण जर मीठाचा खारटपणा गेला तर
मग ते पुन्हा कशाप्रकारे खारट केले जाऊ शकेल? त्यावेळी ते अगदी कसल्याच
उपयोगाचे नसते केवळ यासाठीच की बाहेर फेकले जावे आणि माणसांच्या
पायाखाली तुडविले जावे. 14 तुम्ही जगाचा प्रकाश आहात. जे शहर डोंगरावर
वसलेले आहे. ते लपू शकत नाही. 15 लोक दिवा लावून तो मापाखाली ठेवत
नाहीत पण उंचावर ठेवतात, तेव्हाच त्या घरातील सर्व लोकांना प्रकाश
मिळतो. 16 त्याचप्रकारे तुमचा प्रकाश लोकांपुढे चमकावा यासाठी की त्यानी
तुमच्या स्वर्गिक पित्यांची प्रशंसा करावी. 17 असे समजू नका की मी मोशे आणि
संदेष्टयांची व्यवस्था व नियम रद्द करण्यासाठी आलो आहे, परंतु मी ती पूर्ण
करण्यासाठी आलो आहे. 18 मी तुम्हांला खरे-खरे सांगतो की आकाश व पृथ्वी
नाहीशी होईपर्यंत सर्वकाही म्हणजे लहानातील लहान गोष्ट पूर्ण झाल्याशिवाय
परमेश्वराच्या नियमशास्त्रातील एक देखील काना किंवा मात्रा रद्द होणार
नाही. 19 यासाठी जो कोणी या लहान आज्ञांपैकी एकाचे देखील पालन करत
नाही आणि लोकांना सुद्धा तसेच शिकवेल, त्याला स्वर्गाच्या राज्यात सर्वात
लहान असे म्हणतील. परंतु जो कोणी त्या आज्ञांचे पालन करेल आणि तसेच
शिकवेल त्याला स्वर्गाच्या राज्यात मोठा असे म्हणतील. 20 कारण मी तुम्हाला
सांगतो की जर तुमचा खरेपणा नीतिमत्व, धार्मिक गुरू आणि शिक्षकांपेक्षा
अधिक झाला नसेल तर तुम्हाला परमेश्वराच्या राज्यात प्रवेश मिळणारच
नाही. 21 तुम्ही ऐकले आहे की जुन्या काळातील लोकांना सांगितले गेले होते की
हत्या करू नका. जो कोणी हत्या करेल तो न्यायसभेत दंडास पात्र ठरेल. 22 पण
मी तुहांला असे म्हणतो की जो कोणी आपल्या भावावर रागावेल तो स्वर्गाच्या

न्यायसभेत दंडास पात्र ठरेल. जो कोणी आपल्या भावाला नालायक म्हणेल
तो स्वर्गाच्या न्यायसभेच्या शिक्षेयोग्य ठरेल. जो एखादयाला मूर्ख म्हणेल तो
नरकातील अग्नीच्या शिक्षेस पात्र ठरेल. 23 तुझे दान वेदीजवळ आणल्यानंतर
अचानक तुमहांला आठवले की, तुमचा भावाच्या मनात तुमच्याविरूद्ध काही
नाराजी आहे तर, तुझे दान वेदीसमोर सोडून निघून जा. 24 आणि प्रथम जाऊन
आपल्या भावाबरोबर समेट करा त्यानंतर येऊन स्वच्छ ह्रदयाने तुझे दान
वेदीवर अर्पण करा. 25 जोपर्यंत वाटेवर तुमचा वादी तुमच्याबरोबर आहे लगेच
त्याच्याशी सलोखा करा नाही तर कदाचित वादी तुम्हाला न्यायधिशाच्या
हाती देईल आणि तो तुम्हाला शिपायांच्या हाती देईल आणि तुम्ही तुरूंगात
टाकले जाल. 26 मी तुम्हांला खचित सांगतो जोपर्यंत तुम्ही पूर्ण किंमत फेडणार
नाही तोपर्यंत त्याच्यातून सुटणारच नाही. 27 तुम्ही ऐकलेच आहे की व्यभिचार
करू नका; 28 पण मी तुम्हाला सांगतो की जर, एखादयाने स्त्रीकडे वाईट दृष्टीने
इच्छेने पाहिले तरी त्याने आपल्या मनात तिच्याशी व्यभिचार केलाच आहे.
29 जर तुमचा उजवा डोळा तुम्हाला पापात पाडण्यास भाग पाडत असेल तर
त्याला काढून आपल्यापासून दूर फेकून दे कारण तुचे कल्याण यातच आहे
की तुमच्या एका अवयवाचा नाश व्हावा आणि तुमचे संपूर्ण शरीर नरकात
टाकले न जावे. 30 जर तुमचा उजवा हात तुम्हाला वाईट कार्यासाठी (पाप)
भाग पाडत असेल-प्रवृत्त करत असेल तर तो कापून आपल्या जवळून दूर
फेकून दया कारण तुमचे संपूर्ण शरीर नरकात टाकले जावे यापेक्षा तुमच्या
एका अवयवाचा नाश व्हावा हेच तुमच्या हिताचे आहे. 31 असे सांगितले गेले
होते की जो कोणी आपल्या पत्नीचा त्याग करतो त्याने तिला सूटपत्र देखील
दयावे. 32 परंतु मी तुम्हाला सांगतो की जो आपल्या पत्नीला व्यभिचाराच्या
कारणाशिवाय सोडतो, तोच तिला व्यभिचार करण्यासाठी भाग पाडतो.
बाध्य करतो, जो कोणी त्या त्यागलेल्या पत्नीबरोबर लग्न करतो, तो व्यभिचार
करतो. 33 तुम्ही ऐकले होते की प्राचीन काळच्या लोकांना सांगितले गेले होते
की त्यानी खोटी शपथ वाहू नये; पण प्रभुजींसाठी आपली शपथ पूर्ण करावी.ए
34 परंतु मी तुम्हाला असे सांगतो की कधीच शपथ वाहू नका; स्वर्गाची नाही
कारण ते परमेश्वरपित्याचे सिंहासन-राजासन आहे; 35 पृथ्वीची सुद्धा नाही
कारण ती त्याचे पादासन आहे. यरूशलेमेची देखील नाही कारण ते थोर

महाराजांचे शहर आहे. 36 आपल्या मस्तकाची सुद्धा नाही कारण तुम्ही आपला
एकहि केस पांढरा किंवा काळा करू शकत नाही. 37 यास्तव तुमचे बोलणे, होय
तर होय किंवा नाही तर नाही असे असावे. जे काही यापेक्षा अधिक असते ते
सैतानातर्फे आहे. 38 तुम्हाला असे सांगितले होते की डोळयाबद्दल डोळा आणि
दातांबद्दल दात. 39 मी तुम्हाला असे सांगतो की वाईट माणसाशी तंटा करूच
नका, पण त्याऐवजी जर कोणी तुमच्या उजव्या गालावर मारतो त्याच्याकडे
दूसरा गाल सुद्धा करा. 40 जर कोणी तुमच्यावर वरचढ होऊन तुमचा बंडी
हिसकण्याच्या बेतात असतो किंवा घेऊ पाहतो त्याला आपली शाल देण्यास
देखील तुम्ही तयार असावे. 41 जो कोणी तुम्हाला मजूरीशिवाय एक कोस
नेईल त्याच्याबरोबर दोन कोस जाण्यासाठी तुम्ही तत्पर असावे. 42 जो
तुम्हांला काही मागतो त्याला दया आणि जा तुमच्यापासून उसने घेऊ पाहतो
त्याला पाठ दाखवू नका. 43 तुम्हांला सांगितले होते की आपल्या शेजाऱ्यावर
प्रीति करा आणि आपल्या शत्रूशी शत्रूता ठेवा. 44 मी तुम्हांला असे सांगतो की
आपल्या शत्रूवर प्रीति करा आणि छळ करणाऱ्यांसाठी प्रार्थना करा 45 असे
केल्यावर तुम्ही स्वर्गिक बापांची मुले-मुली व्हाल कारण परमेश्वर बाप वाईट
व चांगले या दोन्हींवर आपला सूर्य चमकवतात तसेच वाईट आणि चांगले या
दोन्हींसाठी पाऊस पाडतात. 46 कारण जर तुम्ही तुमच्याशी प्रेम करणाऱ्यांवर
प्रेम तर तुम्हाला काय प्राप्त होईल? कर वसूल करणारे सुद्धा असेच करत नाहीत
काय? 47 आणि जर तुम्ही केवळ आपल्याच लोकांना अभिवादन (प्रणाम) केले
तर काय विशेष व मोठे काम करता? दुसरे लोकपण असेच करतात की नाही?
48 म्हणूनच जसे तुमचे स्वर्गिक पिता पूर्ण निर्दोष आहेत, तसेच तुम्ही सुद्धा पूर्ण
निर्दोष असावे.

# 6

1 सावध असा. लोकांना दाखवण्यासाठी तुम्ही चांगली कामे करू नका,
अन्यथा स्वर्गिक पित्यांकडून त्याऐवजी तुम्ही काहीच प्राप्त करणार नाही.
2 यास्तव जसे ढोंगी लोक सभेत आणि रस्त्यात करतात तसे दान देतांना तुम्ही
करू नका, आपल्या गौरवासाठी ढोल वाजवू नका. 3 गरजवंताना काही देतांना,
तुमचा उजवा हात जे काही करतो, ते तुमच्या डाव्या हाताला कळता कामा
नये; 4 यासाठी की तुचे दान गुप्त असावे, तेव्हाच तुमचे स्वर्गिक पिता जे गुप्तपणे

पाहतात ते तुम्हांला आशीर्वादीत करतील. 5 जेव्हा तुम्ही प्रार्थना करता, तेव्हा
ढोंगी लोकांसारखे होऊ नका जे लोकांना दाखवण्यासाठी सभेत व रस्त्यांच्या
वळणावर उभे राहून प्रार्थना करतात कारण अशा लोकांना त्याचे प्रतिफळ
आधीच मिळालेले आहे; 6 पण ज्यावेळी तुम्ही प्रार्थना करता, त्यावेळी आपल्या
खोलीत जा, दार बंद केल्यावर आपल्या स्वर्गिक पित्याशी एकांतात प्रार्थना
करा; तेव्हा तुचे परमेश्वर बाप जे सर्व काही पाहत असतात, तुम्हांला योग्य ते
प्रतिफळ देतील. 7 प्रार्थना करतांना अविश्वासू लोकांसारखे व्यर्थ बडबड करू
नका, कारण त्यांना वाटते की त्यांच्या पुष्कळ बोलण्याद्वारे त्यांची प्रार्थना
ऐकली जाईल. 8 म्हणून त्यांच्यासारखे होऊ नका कारण तुम्ही मागण्यापूर्वीच
तुमच्या स्वर्गिक पित्यांना ठाऊक आहे की तुमच्या गरजा काय आहेत. 9 यासाठी
तुम्ही अशाप्रकारे प्रार्थना करा "हे आमच्या स्वर्गिक पित्या, आपण जे स्वर्गात
आहात, तुझे नाव पवित्र मानले जावो. 10 तुझे राज्य येवो; जशी आपली इच्छा
स्वर्गात पूर्ण होते तशी या पृथ्वीवर सुद्धा पूर्ण होवो. 11 आमचे प्रत्येक दिवसाचे
भोजन आपण आम्हांला दयावे. 12 ज्याप्रकारे आम्ही आपल्या अपराध्यांना क्षमा
केले आहे त्याचप्रमाणे आपण आमचे अपराध देखील क्षमा करावे. 13 आम्हांला
प्रलोभनात पडू देऊ नये परंतु वाईटापासून (सैतानापासून) आमचा बचाव
करावा; कारण राज्य आणि पराक्रम आणि गौरव ही सर्वकाळ आपलीच आहेत.
आमेन असेच होवा. 14 यास्तव जर तुम्ही मनुष्यांचे अपराध क्षमा केलेत तर
तुमचे स्वर्गिक पिता देखील तुमचे अपराध क्षमा करतील. 15 म्हणूनच जर तुम्ही
लोकांचे गुन्हे क्षमा केले नाहीत तर तुमचे परमेश्वर परमेश्वर तुमचे गुन्हे सुद्धा
क्षमा करणार नाहीत. 16 जेव्हा कधी तुम्ही उपास करता तेव्हा ढोंग्यासारखा
उदासपणा तुमच्या चेहऱ्यावर नसावा. ढोंगी तुझे चेहरे विरूप करतात यासाठी
की लोकांना कळावे की ते उपास करत आहेत. मी तुम्हांला सत्य सांगतो की
ते तुझे प्रतिफळ भरून पावले आहेत. 17 परंतु जेव्हा तुम्ही उपास करता तेव्हा
आपल्या डोक्याला तेल लावा आणि आपला चेहरा स्वच्छ धुवा. 18 यासाठी की
लोकांनी नव्हे तर तुमच्या आकाशातील पित्यानी ज्यांना गुप्त गोष्टी कळतात
तुमचा उपास दिसावा; याप्रकारे तुमचे आकाशातील पिता जे गुप्तदर्शी आहेत
तुम्हांला प्रतिफळ देतील. 19 आपल्यासाठी या पृथ्वीवर संपत्ती साठवू नका तेथे
कसर आणि जंग खाऊन नाश करतात, जेथे चोर घर फोडून चोरी करतात;

20 तर आपल्यासाठी स्वर्गात संपत्ती साठवा जेथे वाळवी आणि जंग खाऊन
नाश करत नाहीत व चोर घर फोडून चोरी सुद्धा करत नाहीत. 21 कारण जेथे
तुमचे धन आहे तेथे तुमचे मन देखील लागलेले असेल. 22 डोळा शरीराचा दिवा
आहे. जर तुमचे डोळे निर्दोष स्वच्छ आहेत तर तुमचे संबंध शरीर प्रकाशमय
ज्योतिर्मय होईल, 23 परंतु जर डोळा अंधकारमय असेल तर संपूर्ण शरीर सुद्धा
अंधकारमय होईल. म्हणून तुमच्यात जी ज्योति आहे, ती विझली तर तो अंधार
केवढा भयानक असेल! 24 कोणत्याही व्यक्ति एकाच वेळी दोन मालकांची सेवा
करू शकत नाही कारण तो एकाशी वैर करेल आणि दुसऱ्यावर प्रेम किंवा
एकाप्रति प्रामाणिक राहील तर दुसऱ्यावर प्रेम किंवा एकाप्रति प्रामाणिक
राहील तर दुसऱ्याप्रति अप्रामाणिक. तुम्ही परमेश्वरबाप आाि संपत्ती या
दोन्हींची सेवा करू शकत नाही. 25 यासाठीच मी तुम्हांला सांगतो की आपल्या
जीवाविषयी चिंता करून असे म्हणू नका की आम्ही काय खाऊ किंवा काय
पिऊ किंवा काय घालू? जीवन भोजनापेक्षा आणि शरीर कापडापेक्षा श्रेष्ठ नाही
काय? 26 आकाशातील पाखरांकडे लक्षपूर्वक पहा. ते पेरत नाहीत, कापत
नाहीत व कोठारात साठवत नाहीत तरी तुमचा स्वर्गिक पिता त्यांना खायला
देतात. तुमची किंमत त्यांच्यापेक्षा सुद्धा अधिक नाही काय? 27 तुमच्यापैकी
कोणी चिंता करून आपल्या आयुष्यावचा एक सेकंद देखील वाढवू शकतो
काय? 28 वस्त्रांसाठी चिंता का करत बसता? जंगली फुलांकडे लक्ष दया की
ते कसे वाढतात. ते परिश्रम करत नाहीत किंवा सुत कातत नाहीत. 29 तरी
सुद्धा मी तुम्हांला सांगतो की शलमोन सुद्धा आपल्या सर्व वैभवात त्यांच्यापैकी
एकासारखा देखील वस्त्र घालू शकला नव्हता. 30 म्हणून जेव्हा परमेश्वरबाप
मैदानातील गवताला जे आज आहे आणि उदया अग्नीत घातले जाईल असे
वस्त्र देतात तर ते अल्प विश्वासूंनो तुम्हांला ते तसे वस्त्र का घालणार नाहीत?
31 म्हणूनच तुम्ही चिंता करून असे म्हणू नये की आम्ही काय खावे, काय
प्यावे किंवा काय घालावे? 32 कारण परराष्ट्रीय याच सर्व गोष्टींची गरज आहे.
33 म्हणूनच तुम्ही सर्व प्रथम परमेश्वर बापांचे राज्य आणि त्याचे नीतिमत्व
मिळवण्यासाठी खटपट करा म्हणजे या सर्व गोष्टी देखील तुम्हांला आपोआपच
प्राप्त होतील. 34 येणाऱ्या समयाविषयी काळजी करू नका कारण भविष्य
आपली काळजी स्वतःच करून घेईल, आजच्यासाठी आजचे ओझेच पुरेसे आहे.

7 1 तुमच्यावर दोष लावले जाऊ नयेत म्हणून तुम्ही दुसऱ्यांवर दोष लावू
नका. 2 कारण ज्याप्रमाणे तुम्ही दुसऱ्यांवर दोष लागवता त्याचप्रमाणे
तुमच्यावर सुद्धा दोष लावला जाईल. ज्या मापाने तुम्ही मापून देता, त्याच
मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल. 3 तुम्ही आपल्या भावाच्या डोळयातले
कुसळ का पाहता आणि आपल्या डोळयातील मुसळ तुमच्या दृष्टीस पडत नाही
काय? 4 जेव्हा तुमच्या डोळयात मुसळ असेल तर तुम्ही आपल्या भावाला कसे
म्हणू शकता की तुझ्या डोळयातले मुसळ काढू दे? 5 अरे ढोंग्या आधी आपल्या
डोळयातले मुसळ काढून टाक म्हणजे तुला आपल्या भावाच्या डोळयातले
मुसळ काढतांना स्पष्ट दिसेल. 6 पवित्र वस्तु कुत्र्यांना घालू नका. तुझे मोती
डुकरांपुढे टाकू नका. कदाचित ते ती आपल्या पायाखाली तुडवतील आणि
तुम्हाला फाडून टाकतील. 7 मागा म्हणजे तुम्हांला मिळेल, शोधा म्हणजे
तुम्हाला सापडेल, ठोका म्हणजे तुमच्यासाठी दार उघडले जाईल. 8 कारण
जो कोणी मागतो त्याला मिळते आणि जो शोधतो त्याला सापडते. जो
ठोकतो त्याच्यासाठी उघडले जाते. 9 तुमच्यापैकी असा कोण मनुष्य आहे
की जर त्याच्या मुलाने त्याला भाकर मागितली तर तो त्याला दगड देईल?
10 किंवा मासा मागितला तर त्याला साप देईल? 11 मग तुम्ही वाईट असतांना
देखील आपल्या बाळांना चांगल्या वस्तु देणे जाणता तर तुमचे स्वर्गिक पिता
मागणाऱ्यांना विशेष चांगल्या वस्तु का देणार नाहीत? 12 यासाठी माणसांनी
जसे तुमच्याशी वागावे अशी तुमची इच्छा आहे तसेच तुम्ही सुद्धा त्यांच्याशी
वागावे, कारण मोशे आणि संदेष्टयांची शिकवण हीच आहे. 13 अरूंद फाटकाने
आत जा कारण रूंद विशाल आणि पसरट आहे तो मार्ग जो विनाशाकडे
जातो. पुष्कळ लोक याच मार्गावर चालतात. 14 परंतु संकुचित व अरूंद
मार्ग जीवनाकडे जातो. या मार्गावर जाणारे फारच थोडे आहेत. 15 खोटया
संदेष्टयांविषयी सचेत जागृत रहा, जपून रहा कारण ते फाडून खाणारे क्रूर
लांडगे आहेत, परंतु मेंढरांचे वेष घालून तुमच्याकडे येतात. 16 त्याच्या
फळावरून तुम्ही त्यांना ओळखून घ्याल. काटेरी झाडावरून द्राक्षे किंवा
टिंगणीच्या झाडावरून अंजीर काढतात काय? 17 याचप्रकारे प्रत्येक चांगल्या
झाडाला चांगले फळ येते तसेच प्रत्येक वाईट झाडाला वाईटच फळ येते.
18 चांगले झाड वाईट फळ देत नाही किंवा एक वाईट झाड चांगले फळ देत

नाही. 19 प्रत्येक झाड जे चांगले फळ देत नाही ते तोडून अग्नीत टाकण्यात येते
आणि जाळले जाते. 20 याचप्रकारे तुम्ही त्यांच्या फळावरून त्यांना ओळखाल.
21 प्रत्येक जण जो मला प्रभुजी-प्रभुजी म्हणतो त्याचा परमेश्वराच्या राज्यात
प्रवेश होणार नाही परंतु जो कोणी स्वर्गात राहणाऱ्या माझ्या पित्यांची इच्छा
पूर्ण करतो, त्याचा त्यात प्रवेश होईल. 22 त्या दिवशी पुष्कळ लोक मला
म्हणतील, "प्रभो-प्रभो" आम्ही आपल्या नांवाने, पवित्रात्म्याच्या प्रेरणेने संदेश
दिला, भुतें घालवली आणि अनेक चमत्काराची कामें केली नाहीत काय?
23 तेंव्हा मी त्यांना स्पष्ट-स्पष्ट सांगेन, माझा तुमच्याशी कधी परिचय झालाच
नव्हता, मला तुमची कधी ओळखच नव्हती, माझ्यापुढून दूर निघून जा, चालते
व्हा. 24 म्हणून जो कोणी माझी शिकवण ऐकून तसेच करतो जसे मी शिकवले
आहे, तो त्या बुद्धिमान माणसासारखा ठरेल, ज्याने तुझे घर खडकावर बांधले;
25 पाऊस आला, पूर आला, वाराहि सुटला तरीपण ते घर पडले नाही, कारण
ते खडकावर बांधले गेले होते. 26 प्रत्येकजण जो माझी वचने ऐकून त्याप्रमाणे
वागत नाही, तो एका मूर्ख मनुष्यासारखा आहे ज्याने तुझे घर वाळूवर बांधले.
27 पाऊस आला, पूर आला आणि तुफानी वारा त्या घराला लागला आणि ते
घर एकदम कोसळून खाली पडले. 28 जेव्हा येशूंचे हे सर्व बोलणे संपले तेव्हा
लोक ते सर्व ऐकून आश्चर्यचकित झाले, थक्क झाले. 29 कारण ते त्यांना मोठया
अधिकार वाणीने शिकवत होते, त्यांच्या शास्त्री लोकांसारखे नव्हे.

8 1 जेव्हा येशू डोंगरावरून खाली उतरले, तेव्हा लोकांची एक मोठी गर्दी
त्यांच्यामागे चालू लागली. 2 एक कुष्ठ रोगी जवळ आला व येशूंना प्रणाम
करून म्हणाला, "हे प्रभुजी आपली इच्छा असेल तर आपण मला बरे करू
शकता" 3 येशूंनी हात पुढे करून त्याला स्पर्श केला व म्हटले, "माझी इच्छा आहे
की तू बरे व्हावे". त्या व्यक्तिचा कुष्ठरोग ताबडतोब बरा झाला. 4 येशू त्याला
म्हणाले, "पहा, हे कोणाला सांगू नको, आधी जाऊन स्वतः याजकाला दाखव.
ते अर्पण सुद्धा वाहून टाक यासाठी की त्यांच्यासाठी प्रमाण व्हावे. 5 जेव्हा ते
कफर्णहूमात आले तेव्हा एक सुभेदार त्यांच्याजवळ येऊन विनंती करू लागला
की, 6 "प्रभुजी माझा सेवक माझ्या घरात लकव्याने पक्षघाताने पडला आहे.
7 येशू त्याला म्हणाले, "मी येऊन त्याला बरे करीन" 8 सुभेदाराने उत्तर दिले,

"हे प्रभुजी माझी अशी योग्यता नाही की आपण माझ्या छपराखाली यावे,
आपण केवळ मुखाने शब्द मात्र बोला म्हणजे माझा सेवक बरा होईल. 9 मी
पण अधिकाराच्या अधीन आहे आणि शिपाई माझ्या अधीन आहेत; जेव्हा मी
एकाला म्हणतो, तिकडे जा आणि तो जातो, जेव्हा एखादयाला म्हणतो इकडे
ये तेव्हा तो येतो. जेव्हा मी माझ्या दासाला "हे कर" असे म्हणतो तेव्हा तो
तसेच करतो. 10 हे ऐकून येशूंना आश्चर्य वाटले त्यानी त्यांच्या येत असलेल्या
लोकांना म्हटले, "मी तुम्हाला खचित खचित सांगतो की मी इस्त्राएलात देखील
एवढा विश्वास पाहिला नाही. 11 आणि मी तुम्हांला सांगतो की पूर्वेकडून व
पश्चिमेकडून पुष्कळ लोक येतील आणि अब्राहाम, इसहाक व याकोबाबरोबर
स्वर्गाच्या राज्यात बसतील. 12 परंतु राज्याचे संतान बाहेरच्या अंधारात टाकले
जातील "जेथे रडणे व दात खाणे चालेल". 13 मग येशु सुभेदाराला म्हणाले
"जा, जसा तुझा विश्वास आहे, तसेच तुझ्यासाठी होवो" आणि त्याचा नोकर
त्याच क्षणी बरा झाला. 14 येशू पेत्राच्या घरी गेले आणि त्याच्या सासूला
तापाने पडलेले पाहिले. 15 त्यानी तिच्या हाताला स्पर्श केला आणि तिचा ताप
उतरला व ती उठून येशूंची सेवा करू लागली. 16 जेव्हा संध्याकाळ झाली
तेव्हा त्यांच्याजवळ लोकांनी पुष्कळ असे लोक आणले ज्यांना भूतबाधा होती
येशूंनी केवळ आपल्या शब्द मात्रांनी त्या भूतप्रेतांना घालवले आणि सर्व
रोग्यांना बरे केले. 17 यासाठी की यशया संदेष्टयाद्वार जे सांगितले होते ते पूर्ण
व्हावे की येशूंनी स्वतःच आपल्यावर आमचा अशक्तपणा व दुर्बळता घेतली
आणि आमच्या रोगांना देखील त्यानी वाहिले. 18 येशूंनी आपल्या सभोवताल
एक मोठा लोकसमूह पाहिला आणि त्यांना आज्ञा केली की त्यानी पलीकडे
जावे. 19 तेव्हा एक धार्मिक गुरू येशूंना म्हणाला, "गुरूजी, आपण जेथे कोठे
जाल तेथे मी आपल्याबरोबर राहीन. 20 येशू त्याला म्हणाले, "कोल्यांना
राहण्यासाठी बिळे आहेत, पक्ष्यांना घरटी आहेत परंतु परमेश्वराच्या पुत्राला
डोके टेकवायला सुद्धा जागा नाही". 21 येशूंच्या शिष्यांपैकी एकजण त्यांना
म्हणाला, "प्रभुजी माझ्या बापाचा देहांत झाल्यानंतर मी आपल्या मागे येईन".
22 येशू त्याला म्हणाले, "माझ्या मागे ये आणि जे लोक आत्मिक रीतिने मेलेले
आहेत त्यांच्यावर हे कार्य सोपून दे". 23 जेव्हा ते नावेत चढले तेव्हा त्याचे शिष्य
सुद्धा त्यांच्या सोबत मागे-मागे नावेत चढले. 24 काही वेळानंतर जेव्हा येशू

झोपलेले होते, समुद्रात एक असे वादळ उठले की ती नाव लाटांनी झाकू जाऊ
लागली. 25 तेव्हा त्यानी येशूंजवळ जाऊन त्यांना जागे केले व म्हटले, "येशू
प्रभु, आम्हांला वाचवा नाहीतर आम्ही मरून जाऊ". 26 येशू त्यांना म्हणाले,
"अरे आत्मविश्वास ठेवणाऱ्यांनो, तुम्ही का भीत आहात?" तेव्हा येशूंची उठून
वारा आणि समुद्राला जेव्हा धमकावले, त्यांवर रागावले तेव्हा सर्वकाही शांत
झाले. 27 शिष्य आश्चर्य करून म्हणू लागले, हे कोणत्या प्रकारचे मनुष्य आहेत
की तुफान-वादळ-वारा आणि समुद्र सुद्धा त्याचा हुकूम ऐकतात. 28 जेव्हा
येशू पलीकडच्या गदरेकरांच्या देशात पोहचले तेव्हा दोन व्यक्ती ज्यांच्यात
दुष्टात्मे होते, कबरेतून निघून येत असतांना त्यांना भेटले. ते इतके भयंकर व
भयानक होते की त्या वाटेने कोणी सुद्धा जाण्याची हिंमत करू शकत नव्हते.
29 ते जोरजोराने ओरडून म्हणाले, "हे परमेश्वराच्या पुत्रा, आम्हांला आपल्याशी
काय काम? काय घेणे-देणे? नेमलेल्या समयापूर्वी आपण आम्हांला पीडा व
दुःख दयायला आला आहात काय?" 30 दूर काही अंतरावर तेथे डुकरांचा एक
मोठा कळप चरत होता. 31 म्हणून दुष्टात्मे त्यांना विनंती करू लागले की
आपण जर आम्हाला काढत असाल तर तेथे चरणाऱ्या त्या डुकरांच्या कळपात
आम्हांला पाठवून दया. 32 येशूंनी उत्तर देऊन म्हटले, "निघा आणि जा". त्या
दोन्ही माणसातून निघून ते दुष्टात्मे डुकरात शिरले. 33 डुकरे चारणारे पळाले
आणि शहरात जाऊन त्यांना लोकांना सर्व गोष्टी व घडलेली घटना सांगितली;
दुष्टात्म्याने बांधलेल्या माणसांचे काय झाले हे सुद्धा सांगितले. 34 हे ऐकून पूर्ण
शहर येशूंना भेटण्यासाठी निघाले, लोकांची गर्दी तेथे लोटली. येशूंना पाहून
त्यानी त्यांना विनंती केली की आमच्या हद्दीबाहेर आणखी दुसऱ्या ठिकाणी
आपण कृपया जावे.

9 1 मग येशू होडीत बसून समुद्रापलीकडे गेले आणि आपल्या गावी जाऊन
पोहचले. 2 तेव्हा लकवा मारलेल्या एका व्यक्तिला बाजेवर घालून लोक
त्यांच्याकडे आले. येशूंनी त्याचा विश्वास पाहिला व अपंग व्यक्तिला म्हटले,
"मुला हिंमत ठेव". तुझ्या पापांची क्षमा तुला मिळालेली आहे. 3 त्यांच्यापैकी
काही विद्वान आपसात म्हणाले, "हा मनुष्य परमेश्वराची निंदा करत आहे."
4 त्याचे विचार ओळखून येशू त्यांना म्हणाले, "तुम्ही आपल्या अंतःकरणात

वाईट कल्पना व विचार का आणता?" [5] काय म्हणणे सोपे आहे, तुझ्या सर्व
पापांची क्षमा झालेली आहे किंवा उठून चालू लाग; [6] पण हे केवळ यासाठी की
तुम्ही समजावे की परमेश्वराच्या पुत्राला या जगाची पापे क्षमा करण्याचा
अधिकार आहे." यानंतर येशू त्या पक्षघाती माणसाला म्हणाले, "उठ, आपली
बाज उचलून घेऊन घरी जा". [7,8] तो लगेच उठून आपल्या घरी गेला. जेव्हा
लोकांच्या गर्दीत हे सर्व पाहिले तेव्हा ते आश्चर्यचकित होऊन त्या परमेश्वराची
स्तुति प्रशंसा करू लागले ज्यांनी माणसांना एवढा अधिकार दिला होता.
[9] तेथून जातांना येशूंनी मत्तय नावाच्या एका व्यक्तिला जकातीच्या नाक्यावर
बसलेले पाहिले. येशू त्याला म्हणाले, "माझ्या मागे ये," तो तेव्हाच उठला
आणि त्यांच्याबरोबर गेला. [10] आता जेव्हा येशू भोजन खायला बसले होते
तेव्हा कर घेणारे दुष्ट लोक येशू व त्यांच्या शिष्यांबरोबर जेवायला बसले.
[11] जेव्हा परूश्यांनी हे पाहिले तेव्हा ते शिष्यांना म्हणाले, "तुमचे गुरूजी कर
घेणारे व दुष्ट लोक यांच्या बरोबर बसून का जेवतात?" [12] जेव्हा येशूंनी ते
ऐकले तेव्हा ते म्हणाले, "ज्यांचे स्वास्थ्य उत्तम आहे त्यांना डॉक्टरांची गरज
नसते, पण जे आजारी असतात त्यांना त्यांची आवश्यकता असते. [13] जा याचा
अर्थ शिकण्याचा प्रयत्न करा की, "मला दया हवी, बलिदान नको म्हणजे काय?"
कारण मी नितिमानांना निमंत्रण देण्यासाठी आलो नाही पण यासाठी आलो
आहे की पाप्यांचे परिवर्तन व्हावे." [14] तेव्हा योहानाचे शिष्य येशूजवळ येऊन
म्हणू लागले, "असे का आहे की आम्ही आणि परूशी बहुतेक वेळा उपास करतो
परंतु तुझे शिष्य असे का करत नाहीत?" [15] तेव्हा येशू त्यांना उत्तर देऊन
म्हणाले, "नवरपरमेश्वर असतांना पाहूणे शोक-विलाप करणार काय?" पण
असे दिवस येणार आहेत जेव्हा नवरपरमेश्वर त्यंाच्या पासून दूर केला जाईल
आाि ते उपास करतील! [16] कोणताहि व्यक्ती जुन्या वस्त्राला नवीन कापडांचे
ठिगळ लावत नाही कारण असे केल्याने ते ठिगळ जुने वस्त्र फाडते आणि
छिद्र मोठे होते. [17] लोक ताबडतोब काढलेला द्राक्षारस जुन्या कातडयाच्या
पिशवीत घालत नाहीत कारण असे केले तर त्या पिशव्या फाटतात आणि
द्राक्षारस वाहून जातो व पिशव्या बिघडतात. परंतु नवीन द्राक्षारस नवीन
कातडयाच्या पिशवीत घालतात म्हणजे दोन्ही नीट राहतात. [18] जेव्हा येशू
त्यांच्या बरोबर या गोष्टी बोलतच होते तेव्हा पहा एक प्रधान अधिकारी

त्यांच्याकडे आला आणि त्यांना अभिवादन करून म्हणाला, "माझी मुलगी
आताच मरण पावली आहे, कृपया आपण्सा येऊन तिच्या डोक्यावर आपला
हात ठेवावा म्हणजे ती जिवंत होईल." 19 येशू उठून त्याच्यामागे आपल्या
शिष्यासमवेत जाऊ लागले. 20 या दरम्यान एका स्त्रीने जिला बारा वर्षे रक्त
वाहण्याचा रोग होता, त्यांच्यामागून येऊन त्यांच्या कापडाच्या गोंडयाला
शिवले. 21 ती स्वतः आपल्या मनात म्हणत होती की, "जर मी त्यांच्या वस्त्राला
केवळ स्पर्शच केला तरी, मी बरी होईन". 22 परंतु येशूंनी ज्यावेळी मागे
वळून पाहिले त्यावेळी ते तिला म्हणाले, "मुली, धीर धर, हिंमत ठेव, तुझ्या
विश्वासाने तुला बरे केले आहे; त्याच क्षणी ती स्त्री बरी झाली. 23 मग जेव्हा येशू
त्या प्रमुख अधिकाऱ्याच्या घरी पोहचले, तेव्हा तेथे बासुरी बाजविणाऱ्यांना
आणि जमलेल्या गर्दीला गोंधळ माजवतांना, गलबला करतांना पाहिले आणि
म्हणाले, 24 "वाट सोडा, मागे व्हा, मुलगी मेलेली नाही, पण ती झोपलेली
आहे." हे ऐकून ते लोक येशूंवर हसू लागले. 25 परंतु जेव्हा लोकांची गर्दी बाहेर
गेली तेव्हा येशूंनी आत जाऊन त्या मुलीचा हात धरला आणि ती जिवंत झाली
व उठली. 26 या गोष्टीची खबरबात त्या सर्व देशात पसरली. 27 जेव्हा येशू तेथून
पुढे जात होते तेव्हा दोन आंधळे त्यांच्या मागे-मागे चालत जाऊन, ओरडून
हाक मारू लागले, "अहो, दावीदाच्या पुत्रा, आमच्यावर दया करावी" 28 मग
जेव्हा ते घरी पोहचले तेव्हा ते आंधळे त्यांच्याजवळ आले आणि येशू त्यांना
म्हणाले, "तुम्हाला असा विश्वास आहे काय की मी हे करू शकतो?" ते येशूंना
म्हणाले, "होय, प्रभुजी". 29 तेव्हा येशूंनी त्यांच्या डोळयांना स्पर्श केला आणि
म्हटले, "तुमच्या विश्वासाच्या परिमाणाने तुमच्यासाठी होवो" 30 त्याच वेळी
त्याचे डोके उघडले आणि येशूंनी त्यांना बजावून सांगितले की, "सावध असा,
कोणालाच ही गोष्ट कळता कामा नये." 31 परंतु ते तेथून निघून गेल्यावर संपूर्ण
देशात येशूंचे नाव व कीर्ती पसरली. 32 जेव्हा येशू बाहेर जात होते तेव्हा लोक
एका मुक्या माणसाला ज्याच्या आत दुष्टात्मा होता त्यांच्याकडे घेऊन आले.
33 जेव्हा दुष्टात्मा काढला गेला तेव्हा मुका बोलू लागला आणि लोकांची गर्दी
आश्चर्यचकित होऊन म्हणाली, "इस्त्राएलात असे कधीच पाहिले गेले नाही".
34 पण परूशी म्हणाले, "येशू दुष्टात्म्यांच्या पुढाऱ्याच्या मदतीने भुते काढतात."
35 येशू सर्व नगरात आणि गावोगावी जाऊन त्यांच्या सभेत उपदेश देत राहिले

आणि परमेश्वराच्या शासनाविषयी त्यांना सांगत राहिले. त्याठिकाणी ते सर्व
प्रकारचे आजार, विकार व अशक्तपणा बरे करत राहिले. 36 जेव्हा त्यानी
लोकांची गर्दी पाहिली तेव्हा त्यांच्या दयात त्यांच्याविषयी करूणाभाव व
कळवळा आला, कारण ते लोक अशा मेंढरांसारखे होते ज्यांची देखरेख करणारा
कोणीच मेंढपाळ नव्हता. ते व्याकुल आणि भटकणाऱ्या लोकांप्रमाणे होते.
37 तेव्हा येशू आपल्या शिष्यांना म्हणाले, "पिकलेले शेते भरपूर आहेत पण
मजूर फारच थोडे आहेत; म्हणूनच पिकाच्या स्वामीकडे प्रार्थना करा कि त्यानी
पिकांच्या कापणीसाठी मजूर कामकरी पाठवावेत".

# 10

1 मग येशूंनी आपल्या बारा शिष्यांना बोलावून त्यांना दुष्टात्म्यावर
अधिकार दिला आणि सर्व आजार, विकार व दुखणी बरी करण्याचा
अधिकार दिला. 2 बारा प्रेषितांची नावे आहेत : शिमोन पेत्र, त्याचा भाऊ
अंद्रिया, जब्दीचा मुलगा याकोब व त्याचा भाऊ योहान. 3 फिलिप्प, बर्थलमय,
थोमा आणि जकात घेणारा मत्तय, अल्फीचा मुलगा याकोब व तद्दय,
4 शिमोन कनानी व यहूदा इस्कर्योत ज्याने येशूंना धरून दिले होते. 5 या बारा
शिष्यांना येशूंनी अशी आज्ञा करून पाठवले की, परराष्ट्रीयांकडे जाऊ नका
आणि शोमरोण्यांच्या कोणत्याच नगरात, क्षेत्रात प्रवेश करू नका. 6 परंतु
इस्त्राएलाच्या हरवलेल्या हरवलेल्या मेंढरांकडे जा. 7 जात असतांना लोकांना
घोषणा करत जा की, स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे. 8 रोग्यांना बरे करा,
मेलेल्यांना जिवंत करा, कुष्ठ रोगी बरे करा, दुष्टात्मे काढा, तुम्हांला फुकड
मिळाले आहे, तुम्ही फुकट दया. 9 आपल्या झोळीत सोने, रूपे, तांबे घेऊ नका.
10 यात्रेसाठी झोळी, दोन जोडी अंगरखे, जोडे, काठी घेऊ नका, कारण परिश्रम
करणाऱ्यांच्या गरजा पूर्ण होणे योग्यच आहे. 11 ज्या ज्या गावात तुम्ही जाल
तेथे शोधून काढा की कोण तुम्हाला ग्रहण करण्यास योग्य आहे; जोपर्यंत तुम्ही
ते गाव सोडत नाही तोपर्यंत त्याच व्यक्तिच्या येथे रहा. 12,13 त्याच्या घरात
प्रवेश करताच त्याला आशीर्वाद दया. जर त्या घरचे लोक योग्य असतील
तर तुमचा आशीर्वाद त्यांना मिळेल. पण जर ते लायक नसले तर तुमचा
आशीर्वाद तुमच्याजवळ परत येईल. 14 जो कोणी तुमचा स्वीकार करत नाही
व तुमचे ऐकत नाही (वचने) त्याच्या घरातून किंवा त्या शहरातून निघतांना

आपल्या पायांची धूळ झटकून टाका. 15 मी तुम्हाला खातरीने सांगतो की,
न्यायाच्या दिवशी त्या नगरापेक्षा सदोम व गमोरा या प्रदेशाला जास्त सोपे
जाईल (त्या नगराची स्थिती सदोम गमोरापेक्षा सुद्धा फारच भयंकर होईल).
16 पहा, जसे लांडग्यांच्यामध्ये मेंढरे त्याचप्रमाणे मी तुम्हांला पाठवतो म्हणून
तुम्ही सापासारखे चतुर बुद्धिमान आणि कबूतरासारखे भोळे व्हा. 17 परंतु
लोकांच्या बाबतीत जपून सांभाळून रहा; कारण ते तुम्हांला न्यायसभेच्या
स्वाधीन करतील, ते आपल्या आराधनालयात तुम्हांला चाबकाचे फटके
मारतील, 18 माझ्यामुळे तुम्हांला देशाचे अधिकारी व राजे यांच्यापुढे नेण्यात
येईल यासाठी की त्यांच्यासाठी आणि परराष्ट्रीयांकरता तुम्ही साक्ष ठरावे.
19 पण जेव्हा ते तुम्हांला त्यांच्या स्वाधीन करतील तेव्हा काय आणि कसे
बोलावे याविषयी विचार देखील करू नका कारण तुम्ही काय-काय बोलावे,
ते त्याच विशिष्ट क्षणाला तुम्हांला सांगितले जाईल. 20 कारण बोलणारे तुम्ही
नसून तुमच्या पित्याचा आत्मा आहे जो तुमच्या ठायी बोलतो. 21 आणि भाऊ
आपल्या भावाला आणि बाप आपल्या मुलाला जिवे मारण्यासाठी सोपतील
मुले आपल्या बापाविरूद्ध बंडखोरी करतील आणि त्यांच्या मृत्युस कारणीभूत
ठरतील. 22 माझ्या नावामुळे सर्व लोक तुमचा द्वेष करतील परंतु जो शेवटपर्यंत
टिकेल तोच मुक्ती प्राप्त करेल. 23 ज्यावेळी ते तुमचा छळ एका शहरात करतील
त्यावेळी तुम्ही दुसऱ्या शहराला पळून जा. कारण मी तुम्हांला सत्य सांगतो की
मनुष्याचा पुत्र येईपर्यंत इस्त्राएलाच्या सर्व शहरात तुमच्याने फिरून होणार
नाही. 24 शिष्य आपल्या गुरूपेक्षा किंवा नोकर आपल्या स्वामीपेक्षा श्रेष्ठ नाही.
25 शिष्यासाठी एवढेच पूरे आहे की त्याने गुरूसारखे आणि नोकराने आपल्या
मालकासारखे व्हावे. 26 म्हणून त्यांना भिऊ नका कारण असे काहीच झाकलेले
नाही जे प्रकाशात उघडकीस येणार नाही किंवा असे काहीच केलेले गुप्त नाही
जे कळणार नाही. 27 मी जे काही तुम्हांला अंधारात सांगतो ते तुम्ही प्रकाशात
बोला जे काही तुम्ही कानाने ऐकता ते घराच्या धाब्यावरून मोठयाने ओरडून
बोला. 28 जे शरीर नष्ट करू शकतात त्यांना भिऊ नका कारण ते आत्म्याचे
नुकसान करू शकत नाही. केवळ त्यांनाच भ्या जे शरीर व आत्मा या दोघांना
नरकात टाकून नाश करू शकतात अर्थात परमेश्वर. 29 एका नाण्यात दोन
चिमण्या विकतात की नाही? तरीपण तुमच्या पित्याला कळल्याशिवाय

त्यातील एकही जमिनीवर पडत नाही. 30 त्याचप्रकारे डोक्यावरचे सर्व केस
सुद्धा मोजलेले आहेत. चिमण्यांपेक्षा अधिक तुमची किंमत आहे. 31 म्हणून
घाबरू नका. 32 म्हणून जो कोणी लोकांसमोर मला नाकारतो त्याला मी देखील
आपल्या स्वर्गिक पित्यासमोर नाकारीन. 33 माझ्यामुळे या जगात सर्वकाही
ठीकठाक आणि व्यवस्थित होईल. असे मुळीच समजू नका. 34 नाही; परंतु
माझ्यामुळे लोकात आपसात फूट पडेल. 35 माझ्यामुळे बाप मुलाचा आणि
मुलगा बापाचा विरोध करेल. आई मुलीचा व मुलगी आईचा, सासू-सूनेचा व
सून-सासूचा विरोध करून त्यांच्यात फूट पडेल. 36 माणसाच्या घरचेच लोक
त्याचे शत्रू होतील. 37 जो कोणी माझ्यापेक्षा आपल्या आई किंवा बापावर
अधिक प्रेम करतो, तो माझ्या कोणत्याच उपयोगाचा नाही, मला योग्य
नाही. जो माझ्यापेक्षा जास्त आपल्या मुलावर किंवा मुलीवर प्रेम करतो तो
देखील माझ्या योग्य नाही. 38 जो कोणी आपला वधस्तंभ उचलून घेऊन
माझ्या इच्छेप्रमाणे जीवन जगत नाही तो सुद्धा माझ्या कोणत्याच कामाचा
नाही. 39 जो व्यक्ती स्वतःसाठी जगतो, तो तुझे जीवन गमावील आणि जो
माझ्यासाठी तुझे जीवन बलिदान अर्पण करतो, तो ते प्राप्त करेल. 40 जे तुमचा
स्वीकार करतात, ते स्वीकारतात; जे मला स्वीकारतात, ते ज्यांनी मला
पाठवले आहे त्याचा स्वीकार करतात. 41 जो एखादया संदेष्टयाला संदेष्टा
म्हणून आदर-सन्मान देतो, त्याला संदेष्टयाचे प्रतिफळ मिळेल. 42 मी तुम्हांला
खचित सांगतो, जो कोणी एखादयाला माझा शिष्य म्हणून केवळ जर गार
पाण्याचा एक प्याला पाजतो, तो आपल्या पुरस्काराला मुकणारच नाही (ते
त्याला खचित मिळेलच).

11 1 आपल्या बारा शिष्यांना आज्ञा केल्यानंतर येशू त्यांच्या शहरात
व गावात शिकवण्यासाठी निघाले. 2 तुरूंगात असतांना ज्यावेळी
योहानाने येशूंच्या कार्याविषयी ऐकले तेव्हा त्याने आपल्या दोन शिष्यांना
विचारपूस करण्यासाठी येशूंकडे पाठवले. 3 योहानाच्या शिष्यांनी त्यांना
विचारले, "जे येणार आहेत ते आपणच आहात किंवा आम्ही दुसऱ्याची वाट
पाहावी"? 4 येशूंनी उत्तर दिले आणि म्हटले, जे काही तुम्ही ऐकले आणि
पाहिले ते योहानाला जाऊन सांगा. 5 आंधळे पाहातात, लंगडे चालतात,

कोढी शुद्ध होतात, बहिरे ऐकतात, मेलेले जिवंत उठतात आणि गरिबांना
सुवार्ता सांगण्यात येते. 6 आशीर्वादित व धन्य व्यक्ती तोच आहे जो माझ्यामुळे
अडखळत नाही. 7 योहानाचे शिष्य जाणारच होते की इतक्यात येशूंनी
गर्दीला योहानाविषयी सांगितले, "तुम्ही जंगलात काय पाहायला गेला
होता? वाऱ्याने हलवलेला बोरू काय? 8 पण मग तुम्ही काय पाहायला गेला
होता? अत्यंत वस्त्रे घातलेल्या माणसाला काय? पहा, जे लोक अत्यंत उत्तम
कपडे घालतात ते राजमहालात राहतात. 9 पण तुम्ही काय पाहायला गेला
होता? एका संदेष्टयाला? हाये, मी म्हणतो की, एका संदेष्टयापेक्षाहि श्रेष्ठ
असलेल्या माणसाला. 10 कारण याच माणसांविषयी असे लिहिले आहे की
पहा, मी माझा संदेश देणाऱ्याला तुमच्याकडे पाठवतो, तो तुमच्यासाठी
मार्ग तयार करेल. 11 मी खरे सांगतो की या जगात जन्म घेणाऱ्या लोकांत
योहान बाप्तिस्मा करणाऱ्यांपेक्षा श्रेष्ठ असा कोणीच झालेला नाही. पण जो
कोणी स्वर्गाच्या राज्यात सर्वात लहान तो त्याच्यापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे.
12 बाप्तिस्मा देणाऱ्या योहानाच्या दिवसापासून आजपर्यंत स्वर्गाच्या राज्यावर
आक्रमण होत राहिले आहेत आणि बलवान असलेले ते हिसकून घेत आहेत.
13 योहानापर्यंतचे सर्व संदेष्टे आणि नियमशास्त्र यांनी या गोष्टींविषयी पूर्वीच
संदेश दिले होते. 14 जर तुम्ही विश्वासाने ग्रहण करत असाल तर जो एलीया
येणार तो हाच आहे. 15,16 ज्याला ऐकायचे असेल त्याने ऐकावे. परंतु मी या
पिढीची तुलना कशाशी करू? या पिढीला कोणती उपमा देऊ? हे लोक त्या
मुलांसारखे आहेत जे बाजारात बसून आपल्या सोबत्यांना हाका मारतात. 17 ते
म्हणतात की, "आम्ही तुमच्यासाठी बासरी वाजवली पण तुम्ही नाचला नाही;
आम्ही तुमच्यासाठी विलाप केला पण तुम्ही रडला नाही. 18 योहान खातपीत
आला नाही, परंतु त्याच्यावर असा आरोप लावला गेला की त्याच्याठायी
दुष्टात्मा आहे. 19 मी एखादया साधारण खातपीत असलेल्या माणसासारखा
खातो-पितो, तेव्हा माझ्यावर असा आरोप ठेवतात की, मी खादाड, पेटू, दारू
पिणाऱ्या, कर गोळा करणाऱ्या दुष्ट लोकांचा मित्र आहे. 20 तेव्हा येशू त्या
शहरावर दोष लावू लागले कारण त्यानी तेथे अनेक चमत्कार केले होते तरीपण
त्या लोकांनी तुझे अंतःकरण बदलले नाही, ह्रदयापासून पश्चाताप केला नाही.
21 हे खोराजिना तुझ्यावर हाय-हाय! हे बेथसैदा, तुझे काय हाल होतील!

काय दुर्दशा होईल! कारण जे अद्भुत कार्य तुमच्यांकडे केले गेले, ते जर सोर
व सीदोन यांच्यात केले गेले असते तर, तेथील लोकांनी गोणताट पांघरून
व राखेवर बसून केव्हाच मन बदलले असते. 22 पण मी तुम्हांला सांगतो की
न्यायाच्या दिवशी सोर व सीदोनच्या लोकांची स्थिती सहन करण्यासाठी सोपी
जाईल 23 आणि तुम्ही हे कफर्णहूमाचे लोकहो; जे गर्वाच्या शिखरावर उंच असे
आहात ते तुम्ही नरकाच्या खोलीपर्यंत उतरवले जाल कारण तुमच्यामध्ये जे
चमत्कार व जी पराक्रमाची कार्ये केली गेली, जर ती सदोमात झाली असती
तर, ते शहर आजपर्यंत राहिले असते. 24 पण मी तुम्हांला अगदी सत्य-सत्य
सांगतो की न्यायाच्या दिवशी सदोमातील लोकांना तुमच्यापेक्षा सोपे जाईल.
25 त्याच वेळी येशू म्हणाले की, "स्वर्ग आणि पृथ्वीच्या प्रभो, बापाच मी तुझे
आभार यासाठी मानतो की या गोष्टी आपण ज्ञानी, विचारवंत व बुद्धीमान
लोकांपासून गुप्त ठेवून त्या बाळकांवर प्रगट केल्या. 26 असे यासाठी घडले की
ही गोष्ट आपल्याला योग्य वाटली. 27 सर्व काही माझ्या पित्यानी माझ्या हातात
सोपून दिले आहे. पित्याशिवाय पुत्राला कोणीच ओळखत नाही; पुत्राशिवाय
पित्यांना कोणीच ओळखत नाही. केवळ तेच लोक ज्यांच्यावर पुत्र ते प्रगट
करतात (इच्छा बाळगतात). 28 अहो, तुम्ही परिश्रम करणारे सर्व लोकहो आणि
भारी ओझ्याने दबलेल्या लोकांनो माझ्याजवळ या म्हणजे मी तुम्हांला विसावा
(शांति) देईन. माझे जू स्वतःवर घ्या आणि माझ्यापासून शिका कारण मी
मनाचा नम्र आणि दीन आहे, तेव्हा तुमच्या जीवाला शांती मिळेल. 30 कारण
माझे जू फायदयाचे आणि माझे ओझे हलके आहे.

# 12

1 एका शब्बाथ दिवशी येश धान्याच्या शेतातून जात होते. भूक
लागल्यामुळे येशूंचे शिष्य कणसे मोडून-मोडून त्याचे दाणे खाऊ
लागलेत. 2 मग परूश्यांनी हे पाहिले आणि म्हणाले, "पहा येशू, शब्बाथ दिवशी
जे करणे अयोग्य आहे नेमके तेच तुझे शिष्य करत आहेत." 3 यावर येशू त्यांना
म्हण्सा ाले, "दाविद व त्याच्या सोबत्यांना जेव्हा भूक लागली, तेव्हा त्यानी
काय केले हे तुम्ही वाचले नाही काय?" 4 परमेश्वराच्या मंदिरात जाऊन त्यानी
त्या भाकरी खाल्ल्या ज्यांना खाण्याचे स्वातंत्र्य केवळ याजकांनाच होते; हे
तुम्ही वाचले नाही काय? 5 किंवा याजक मंदिरात शब्बाथ दिवशी शब्बाथ

मोडून देखील निर्दोष असतात हे तुम्ही नियमशास्त्रात वाचले नाही काय?
6 पण मी तुम्हांला असे म्हणतो की येथे जो तुमच्यापुढें उभा आहे तो प्रार्थना
भवनापेक्षा देखील श्रेष्ठ थोर आहे. 7 परंतु जर तुम्हांला याचा अर्थ समजला
असता की "मला दया हवी, बलिदान नको", तर तुम्ही निर्दोष माणसावर दोष
लावला नसता. 8 कारण मी शब्बाथाच्या सुद्धा वर श्रेष्ठ असा आहे. 9 "तेथून
निघून येशू आराधनालयात गेले. 10 तेथे एक हात वाळलेला मनुष्य होता. त्यानी
येशूवर दोष लावण्यासाठी विचारले, "शब्बाथ दिवशी एखादयाला बरे करणे
योग्य आहे काय? 11 येशूंनी त्यांना उत्तर दिले, समजा तुमच्यापैकी एक असा
मनुष्य आहे ज्याच्याजवळ केवळ एकच मेंढरू आहे आणि जर ते शब्बाथ दिवशी
खडड्यात पडले तर तो त्याला बाहेर काढणार नाही काय? 12 माणसाचे मूल्य
मेंढरांपेक्षा किती मोठे आहे! म्हणूनच हे योग्य आहे की शब्बाथ दिवशी चांगली
कार्ये, कल्याणाची कार्ये केली जावीत" 13 तेव्हा येशू त्या व्यक्तिला म्हणाले,
"आपला हात पुढे कर". त्याने तसेच केले आणि त्याचा वाळलेला हात दुसऱ्या
हातासारखा बरा झाला. 14 यानंतरच परूश्यांनी बाहेर जाऊन येशूंविरूद्ध
एक सभा बोलवली यासाठी की त्याचा घात कशाप्रकारे करावा याची
योजना आखली जावी. 15 हे कळताच येशू तेथून निघून गेले तेव्हा एक मोठा
लोकसमुदाय त्यांच्या मागे-मागे चालला आणि त्या सर्वांना त्यानी बरे केले.
16 येशूंनी लोकांना अशी ताकीद दिली की त्यांच्याविषयी अन्य लोकांना अशी
ताकीद दिली की त्यांच्याविषयी अन्य लोकांना सांगितले जाऊ नये; 17 यासाठी
की यशया संदेष्टयाने जे काही म्हटले होते, ते पूर्ण व्हावे, 18 ते असे की "माझा
प्रिय सेवक व परमप्रिय असलेला जो, त्याला पहा, ज्याला मी निवडले आहे
आणि ज्याच्याविषयी मी प्रसन्न आहे. मी आपला आत्मा त्याच्यावर घालीन
आणि तो परराष्ट्रीयांना न्यायाची खबरबात कळवील. 19 तो भांडणार नाही,
ओरडणार सुद्धा नाही, रस्त्यावरील कोणत्याच मनुष्याला त्याची वाणी ऐकू
येणार नाही. 20 जोपर्यंत बोरू मोडणार नाही तसेच मिणमिणती वात तो
विझवणार नाही. 21 परराष्ट्रीय त्याच्या नांवावर विश्वास धरतील. 22 लोक
दुष्टात्माने ग्रसित एका आंधळयावर आणि मुक्या मनुष्याला येशूंजवळ घेऊन
आले आणि त्यानी त्याला बरे केले म्हणून तो बोलू लागला आणि पाहू लागला.
23 सर्व लोक आश्चर्यचकित होऊन म्हणू लागले, "हा दावीदाच्या वंशाचा नाही

काय?" 24 परूशी हे ऐकून म्हणाले, "हा व्यक्ती दुष्टात्म्यांचा प्रधान बालजबूल
याच्या मदतीशिवाय दुष्टात्मे काढूच शकत नाही. 25 येशू त्याचे विचार ओळखून
त्यांना म्हणाले, "ज्या राज्यात एकता नसते, ते स्वतःचा नाश करते, ज्या
शहरात किंवा घरात एकता नसते ते स्थिर राहू शकत नाही. 26 जर सैतान,
सैतानाला काढू लागला तर तो स्वतःचाच शत्रू ठरेल. अशा स्थितीत त्याचे राज्य
व शासन कसे टिकणार? 27 जर मी बालजबूलाच्या साहाय्याने भुते काढत
असेन तर मग तुमची मुले त्यांना कोणाच्या मदतीने काढतात? म्हणून तेच
तुमचे न्यायदाता ठरतील. 28 पण जर मी परमेश्वराच्या आत्म्याच्या साहाय्याने
दुष्टात्मा काढतो तेव्हा तर परमेश्वराचे राज्य तुमच्याजवळ आले असे समजा;
29 अथवा बलवान माणसाला आधी बांधल्याशिवाय त्याच्या घरात शिरून
त्याच्याच घरातील वस्तू कशा लुटून नेता येतील? त्याला बांधल्यावरच तो
त्याचे घर लुटील किंवा त्याला त्याचे घर लुटता येईल. 30 जो माझ्या पक्षाचा
नाही, तो माझ्या विरूद्ध आहे आणि जो गोळा करत नाही, तो उधळून टाकतो.
31 म्हणून मी तुम्हांला सांगतो की प्रत्येक प्रकारची दुष्टता आणि वाईट पापाची
क्षमा केली जाईल परंतु पवित्रात्मा विरूद्ध केलेले पाप क्षमा केले जाणार नाही.
32 जो कोणी माझ्या विरूद्ध काही बोलले त्याला क्षमा मिळेल, पण जो कोणी
पवित्रात्म्याविरूद्ध बोलेल त्याला या जगात किंवा येणाऱ्या जगात सुद्धा क्षमा
होणार नाही. 33 जर झाडाला चांगले म्हणता तर त्याच्या फळाला देखील
चांगले म्हणा किंवा झाडाला वाईट म्हणता तर त्याच्या फळाला सुद्धा वाईट
म्हणा. कारण फळावरून झाडाच्या बऱ्या वाईटाची ओळख होत असते. 34 अरे,
सापाच्या पिलांनो तुम्ही वाईट असूनहि चांगल्या गोष्टी कसे काय बोलू शकता?
कारण मुखातून तेच बाहेर निघते जे अंतःकरणात भरलेले असते. 35 चांगला
मनुष्य आपल्या आतील चांगल्या खजिन्यातून चांगल्याच गोष्टी काढतो. वाईट
मनुष्य आपल्या वाईट भांडारातून वाईट गोष्टीच काढतो. 36 पण मी तुम्हाला
सांगतो की न्यायाच्या दिवशी लोकांनी मुखातून बोललेल्या प्रत्येक व्यर्थ
शब्दाचा हिशेब त्यांना दयावा लागेल. 37 कारण तुम्ही बोललेल्या गोष्टीवरूनच
निर्दोष किंवा दोषी ठरवले जाल. 38 तेव्हा काही शास्त्री आणि परूशी त्यांना
म्हणाले, "गुरूजी आम्हांला आपल्याकडून एक अद्‌भुत चिन्ह पाहायची इच्छा
आहे." 39 परंतु येशूंनी उत्तर दिले, "दुष्ट आणि वाईट व्यभिचारी पिढी चिन्ह

मागते, परंतु योना संदेष्टयाशिवाय तिला दुसरे कोणतेच चिन्ह दिले जाणार
नाही. 40 ज्याप्रकारे योना तीन दिवस-रात्र एक मोठया मास्याच्या पोटात होता
त्याचप्रकारे मी सुद्धा तीन दिवस-रात्र पृथ्वीच्या पोटात राहीन. 41 न्यायाच्या
दिवशी निनवेचे लोक या पिढीच्या लोकांवर दोष लावतील कारण त्यानी
योनाच्या उपदेशावरून ॅदय परिवर्तन केले होते; येथे एक असा उभा आहे
जो योनापेक्षाहि धन्य-श्रेष्ठ आहे. 42 न्यायाच्या दिवशी (समयी) दक्षिनेची
राणी या पिढीबरोबर उभी राहून ह्रिला दोषी ठरवील कारण ती पृथ्वीच्या
एका सीमेपासून यासाठी आली होती की तिने शलमोनाद्वारे ज्ञानाच्या
गोष्टी ऐकाव्यात. पहा, येथे असा एक उभा आहे जो शलमोनापेक्षा देखील
थोर-श्रेष्ठ होय. 43 परंतु अशुद्ध आत्मा एका माणसातून निघून, विसावा शोधत
कोरडया स्थानी फिरत असतो, पण तो त्याला मिळत नाही. 44 तेव्हा तो
अशुद्ध आत्मा म्हणतो की, ज्या घरातून मी निघालो त्याच आपल्या घरात
मी परत जाईन. जेव्हा तो तेथे पोहचतो तेव्हा आपल्या घराला झाडून
स्वच्छ-नीट-व्यवस्थित केलेले, सजवलेले आणि रिाकमे असे पाहतो. 45 तेव्हा
तो जाऊन आपल्यापेक्षाहि जास्त दुष्ट असे सात अशुद्ध आत्मे घेऊन येतो आणि
ते सर्व या जुन्या घरात राहतात. या माणसाची दशा आधीपेक्षाहि वाईट व
भयंकर होते. तसेच या दुष्टपिढीचे देखील होईल. 46 जेव्हा येशू लोकांबरोबर
बोलतच होते तेव्हा त्यांची आई आणि भाऊ बाहेरच उभे राहून त्यांच्याशी
बोलण्याची संधी शोधत होते. 47 कोणीतरी येशूंना म्हटले, "पहा, आपली आई
आणि तुझे भाऊ बाहेर उभे राहून आपल्याशी बोलण्यासाठी वाट पाहत आहेत."
48 परंतु येशू त्यांना म्हणाले, "माझी आई आणि भाऊ कोण आहेत?" 49 तुझे
हात शिष्यांकडे करून येशू म्हणाले, "पहा, माझी आई, माझे भाऊ. 50 जो
कोणी माझ्या स्वर्गिक पित्यांची इच्छा पूर्ण करतो, तोच माझा भाऊ, बहिण व
आई आहे."

# 13

1 त्या दिवशी येशू घरातून निघून समुद्र किनाऱ्याशी जाऊन बसले.
2 तेव्हा लोकांची गर्दी तेथे जमली म्हणून ते एका होडीत जाऊन
बसले. सर्व लोक किनाऱ्यावर उभे राहिले. 3 आणि येशू दृष्टांताद्वारे त्यांना
पुष्कळ गोष्टी शिकवू लागले; ते म्हणाले, "एक बी पेरणारा पेरणी करायला

निघाला. 4 असे करत असता काही बी वाटेच्या किनाऱ्यावर पडले आणि
पक्ष्यांनी येऊन ते खाऊन टाकले. 5 काही बी खडकाळ जमिनीत पडले जेथे
माती अधिक खोल नव्हती. आणि लगेच त्यांना अंकुर आले, ते उगवले कारण
ते मातीच्या वरच्या थरावरच होते. 6 पण जेव्हा सूर्य उगवला, ऊन आले, ते
कापले त्यामुळे ते कोमेजले आणि त्याचे मूळ नव्हते म्हणून ते वाळून गेले.
7 काही बी काटेरी झाडांमध्ये पडले आणि झाडे वाढल्यामुळे त्यांची वाढ
खुंटली 8 परंतु बाकीचे बी चांगल्या जमिनीत पडले आणि फळ देण्याजोगे
झाले, काही शंभरपट काही साठपट, काही तीसपट असे पीक आले. 9 ज्यांना
ऐकायचे आहे त्यानी ऐकून घ्यावे. 10 शिष्यांनी येशूंना विचारले, "आपण
दाखल्यांनी त्यांच्याशी का बोलता?" 11 येशूंनी उत्तर दिले, "यासाठी की
स्वर्गाच्या राज्याच्या रहस्यमय गोष्टी जाणून घेण्याची, समजण्याची योग्यता
तुमच्याठायी आहे, पण ती क्षमता त्यांना दिली गेली नाही. 12 कारण
ज्याच्याजवळ आहे त्याला दिले जाईल, यासाठी की त्याला ते भरपूर व्हावे,
परंतु ज्याच्याजवळ नाही त्याचे ते देखील घेतले जाईल ते त्याच्याजवळ आहे.
13 म्हणूनच मी त्यांच्याशी दाखल्यांनी बोलतो कारण पाहून सुद्धा ते आंधळे
होतात, ऐकून देखील ते ऐकत नाहीत, समजत नाहीत. 14 यशया संदेष्टयाद्वारे
केलेली भविष्यवाणी त्यांच्यातच पूर्ण होते जो म्हणतो की, "तुम्ही ऐकाल पण
तुम्हाला समजण्यास नाही, पहाल पण तुम्हाला दिसणारच नाही, 15 कारण
त्या लोकांचे अंतःकरण जड झाले आहे, त्याचे कान मंद आहेत, नीट ऐकत
नाहीत, त्यानी तुझे डोळे मिटलेले आहेत कारण डोळयांनी पाहून, कानांनी
ऐकून आणि अंतःकरणाने समजून त्याचे परिवर्तन होऊ नये, त्यानी वळू नये
आणि मी त्यांना बरे करू नये. 16 पण तुमचे डोळे आशीर्वादीत व धन्य आहेत
कारण ते पाहत आहेत, तुमचे कान धन्य आहेत कारण ते ऐकत आहेत. 17 मी
तुम्हांला ठामपणे अगदी सत्य सांगतो की पुष्कळ संदेष्टे आणि नीतिमान लोक,
त्या सर्व गोष्टी पाहण्यास उत्सुक होते जे तुम्ही पाहत आहात, पण ते पाहू शकले
नाहीत, ते ऐकू इच्छित होते जे तुम्ही ऐकत आहात पण ते ऐकू शकले नाहीत.
(ते त्यांना मिळाले नाही). 18 म्हणून बी पेरणाऱ्याचा दाखला ऐका. 19 जेव्हा
एखादा व्यक्ति वचन ऐकतो, राज्याच्या गोष्टी ऐकतो आणि समजत नाही तेव्हा
दुष्टात्मा येऊन त्याच्या अंतःकरणात पेटलेल्या गोष्टी (वचने) हिरावून घेतो, हा

तोच आहे जो वाटेवर पेटलेला आहे. [20] परंतु खडकाळ जमिनीवर पेटलेला तो
हा आहे; तो वचन ऐकतो, लवकरच आनंदाने ग्रहण्सा करतो. [21] परंतु त्याचे
मूळ खोल व मजबूत नसल्यामुळे फारच थो ा वेळ तो तसा असतो, ज्यावेळी
परमेश्वराचे वचन ग्रहण केल्यामुळे, परिणामी त्याच्यावर संकट येते, दबाव
येतो, छळ येतो त्यामुळे तो लगेच अडखळतो. [22] काटेरी झुडपात पेटलेला तो
हा आहे जो परमेश्वराचे वचन ऐकतो, परंतु या जगाची चिंता, धनाचा मोह
त्या सर्व गोष्टी तो दाबून टाकतो त्यामुळे वचने वाळतात आणि वचनांची वाढ
खुंटून तो व्यक्ती निष्फळ होतो. [23] परंतु चांगल्या जमिनीवर पडणारे बी त्या
माणसाकडे इशारा करते जो ऐकून ते समजतो; त्याच्याठायी परमेश्वराच्या
गोष्टींचा परिणाम दिसतो अर्थात तो फळ देतोच देतो, काही लोक शंभरपट,
कोणी साठपट तर कोणी तीसपट पीक उत्पन्न करतात. [24] येशूंनी त्यांना आणखी
एक दृष्टांत सांगितला, "स्वर्गाचे राज्य त्या माणसासारखे आहे ज्याने आपल्या
शेतात उत्तम बी पेरले. [25] परंतु जेव्हा लोक झोपेत होते तेव्हा त्याचे शत्रू आले
आणि ते गव्हामध्ये जंगली बी पेरून निघून गेले. [26] जेव्हा पाला फुटला, पीक
दिसू लागले तेव्ळा जंगली पाला सुद्धा त्याच्यात दिसू लागला. [27] नोकरांनी
येऊन मालकाला विचारले, "महाराज आपण शेतात चांगले बी पेरले होते ना?
तर मग त्यात जंगली पाला कोठून आला? [28] तो त्यांना म्हणाला, "हे काम
एखादया शत्रूचेच असावे". नोकर त्याला म्हणाले, "आपली इच्छा आहे काय
की आम्ही ते सर्व उपटून फेकून दयावे?" [29] तो म्हणाला नाही, कारण जेव्हा
तुम्ही जंगली पाला उपटाल तेव्हा त्याबरोबर कदाचित गहू देखील उपटून
टाकाल. [30] म्हणून पीकाच्या कापणीपर्यंत दोन्ही बरोबरच वाढू दया; पिकाच्या
कापणीच्या वेळी मी कापणाऱ्यांना ताकीद देईन की "आधी जंगली पाला गोळा
करून ते जाळण्यासाठी त्याच्या पेंढया बांधा, परंतु गहू माझ्या कोठारात भरून
ठेवण्यासाठी गोळा करा." [31] त्यानी त्यांना आणखी एक दाखला सांगितला
की स्वर्गाचे राज्य मोहरीच्या (राईच्या) दाण्यासारखे आहे, जे एका माणसाने
आपल्या शेतात पेटले. [32] मोहरीचा दाणा सर्व दाण्यामध्ये अगदी लहानसा तर
आहे पण जेव्हा तो वाढतो तेव्हा सर्व प्रकारच्या भाज्यांपेक्षा मोठा होऊन त्याचे
असे झाड होते की आकाशाचे पक्षी येऊन त्याच्या फांदयांत वस्ती करतात.
[33] त्यानी आणखी एक दृष्टांत त्यांना सांगितला की स्वर्गाचे राज्य खमिरासारखे

आहे जे एका स्त्रीने घेतले तीन माप पिठात मिसळले आणि शेवटी सर्व पीठ
फुगून गेले खमीर झाले. 34 या सर्व गोष्टी ऐकून दाखल्याद्वारे येशूंनी लोकांना
शिकवल्या; दाखल्याशिवाय ते त्यांच्याशी काहीच बोलत नव्हते. 35 यासाठी
की संदेष्टयाचे ते वचन पूर्ण व्हावे, जे तो बोलला होता की, मी तुझे तोंड उघडून
दाखले देईन; मी त्या गोष्टी ज्या जगाच्या उत्पत्तिपासून रहस्य गुप्त राहिल्यात
त्या प्रगट करीन." 36 तेव्हा येशू लोकांची गर्दी सोडून घरी आले आणि त्यांच्या
शिष्यांनी त्यांच्याजवळ येऊन म्हटले, "शेतातील जंगली दाण्यांचा दाखला
आम्हांला समजावून सांगा" 37 येशूंनी त्यांना उत्तर दिले की, उत्तम बी पेरणारा
मनुष्याचा पुत्र आहे. 38 शेत हे जग आहे, चांगले बी हे राज्याचे संतान आहेत
आणि जंगली बी हे दुष्टाचे पुत्र आहेत. 39 ज्या वैऱ्याने ते पेरले तो सैतान आहे,
कापणी ही जगाची युगाची समाप्ति आहे आणि कापणारे स्वर्गदूत आहेत.
40 म्हणून जसे जंगली दाणे गोळा करून अग्नीत जाळतात तसेच जगाच्या
अंतसमयी देखील होईल. 41 मनुष्याचा पुत्र (येशू) आपल्या स्वर्गदूतांना पाठवेल
आणि ते त्यांच्या राज्यातून सर्व अडखळविणाऱ्यांना व कुकर्म करणाऱ्यांना जमा
करतील. 42 आणि त्यांना अग्नीच्या भटटीत टाकतील, तेथे रडणे व दाते खाणे
चालेल. 43 त्यावेळी क्षमा प्राप्त लोक पित्यांच्या राज्यात सूर्यासारखे चमकतील.
ज्यांना कान आहेत त्याने ऐकून घ्यावे. 44 स्वर्गाचे राज्य शेतात लपवलेल्या
धनासारखे आहे, ते ज्या माणसाला सापडले त्याने ते लपवून ठेवले आणि अति
आनंदाच्या भरात त्याने जाऊन व सर्वकाही विकून ते शेत विकत घेतले. 45 मग
स्वर्गाचे राज्य एका व्यापाऱ्यासारखे आहे जो चांगल्या मोत्यांच्या शोधात होता.
46 जेव्हा त्याला एक अतिशय मोलवान मोती मिळाला तेव्हा त्याने जाऊन तुझे
सर्वकाही विकून तो मोती विकत घेतला. 47 आणखी स्वर्गाचे राज्य त्या मोठया
जाळयासारखे आहे जे समुद्रात टाकले गेले आणि ज्यात सर्व प्रकारचे मासे एकत्र
सापडले; 48 आणि जेव्हा ते भरले तेव्हा माणसांनी ते किनाऱ्याकडे ओढले आणि
बसून जे चांगले होते ते एका भांडयात जमा केले आणि जे वाईट ते फेकून दिले.
49 तसेच जगाच्या शेवटी होईल, स्वर्गदूत येऊन दुष्टांना नीतिमानातून वेगळे
करतील आणि त्यांना अग्नीच्या कुंडात टाकतील, 50 तेथे रडणे व दात खाणे होत
असेल 51 तुम्ही या सर्व गोष्टी समजून घेतल्यास काय?" 52 शिष्य त्यांना म्हणाले
"होय". येशू त्यांना म्हणाले, "यासाठीच प्रत्येक व्यक्ती जे स्वर्गाच्या राज्याचा

सदस्य झाला आहे तो त्या गृहस्थासारखा आहे जो आपल्या भांडारातून
नव्या-जुन्या गोष्टी काढून टाकतो." 53 जेव्हा येशूंनी हे दाखले संपवले तेव्हा
येशू तेथून निघून गेले. 54 आणि स्वतःच्या गावी येऊन त्यांच्या सभेत त्यांना
असा उपदेश दिला की लोक थक्क झाले व म्हणाले, "हे ज्ञान आणि सामर्थ्यांची
कामें याला आले कोठून? 55 हा सुताराचाच मुलगा आहे का? आणि यांच्या
आईचे नाव मरिया आणि याच्या भावांची नांवे याकोब, योसे, शिमोन आणि
यहूदा ही नाहीत काय? 56 आणि याच्या सर्व बहिणी आपल्याबरोबर राहत
नाहीत काय? मग याला हे सर्व कोठून मिळाले? 57 म्हणून ते सर्व त्यांच्यामुळे
अडखळले, पण येशू त्यांना म्हणाले, "संदेष्टयाला मात्र आपला देश व तुझे घर
यात सन्मान मिळत नाही तेथे तो केवळ अपमानितच होतो. 58 आणि येशूंनी
तेथे त्यांच्या अविश्वासामुळे फारशी अद्‌भुत कार्ये केली नाहीत.

14 1,2 त्यावेही राजा हेरोदाने येशूंविषयी ऐकले. तो आपल्या
सल्लागारांना म्हणाला, "हा बाप्तिस्मा करणारा योहान आहे, तो
मेलेल्यातून उठलेला आहे म्हणूनच त्याच्याद्वारे अद्‌भुत कार्ये प्रगट होत आहेत".
3 कारण हेरोदाने आपला भाऊ फिलिप्प याची बायको हेरोदिया हिच्या
कारणाने योहानाला बांधून कैदेत टाकले होते. 4 कारण योहानाने त्याला म्हटले
होते की, "तू आपल्या भावाच्या पत्नीला ठेवावे हे योग्य नाही". 5 जरी तो
योहानाला जिवे मारण्यास पाहत होता तरी तो लोकांना भीत होता कारण
लोक त्याला संदेष्टा मानत असत. 6 जेव्हा हेरोदाचा वाढदिवस साजरा केला
जात होता तेव्हा हेरोदियाची मुलगी त्याच्यासमोर येऊ नाचू लागली व तिने
हेरोदाला प्रसन्न केले. 7 म्हणून त्याने तिला शपथ वाहून जे काही ती मागेल,
ते देण्याचे वचन दिले. 8 आपल्या आईचा इशारा ओळखून तिने एका ताटात,
योहान बाप्तिस्मा करणाऱ्याचे डोके मागितले. 9 या मागणीमुळे राजाला खूप
दुःख झाले; तरीपण तुझे वचन पूर्ण करण्यासाठी आणि बसलेल्या लोकांमुळे
त्याने ते दयावयाची आज्ञ केली. 10 आणि आपल्या लोकांना तुरूगांत पाठवून
त्याने योहानाचे डोके कापले. 11 आणि ते एका ताटात ठेवून त्या मुलीला दिले
गेले आणि मुलीने ते आपल्या आईला दिले. 12 मग योहानाच्या शिष्यांनी
त्याचे मृत शरीर घेतले ते पुरले आणि त्यानंतर येशूंना या गोष्टीची खबरबात

दिली. 13 हे ऐकताच येशू एका होडीत बसून एकांत ठिकाणी निघून गेले. जेव्हा
लोकांना याविषयी कळले तेव्हा ते शहरातून निघून येशूंना भेटण्यास पायीपायी
गेले. 14 आणि येशू लोकांच्या हा मोठा समुदाय पाहून कळवळले, त्यांच्यापैकी
जितके दुखणेकरी, रोगी, आजारी होते त्या सर्वांना त्यानी बरे केले. 15 जेव्हा
संध्याकाळ झाली तेव्हा त्याचे शिष्य त्यांच्याकडे येऊन म्हणाले, "ही एक
निवांत एकांत जागा आहे आणि वेळ होऊन गेलेली आहे. लोकांना जाऊ दया,
म्हणजे जवळच गावात जाऊन स्वतःसाठी खायला ते काहीतरी विकत घेतील.
16 पण येशू शिष्यांना म्हणाले, लोकांना पाठवण्याची गरज नाही, हे बरोबर
नाही की त्यानी जावे; तुम्हीच त्यांना काही खायला दया. 17 शिष्य त्यांना
म्हणाले, "येथे आमच्याजवळ केवळ पाच भाकरी व दोन मासे आहेत." 18 येशू
म्हणाले, "ते माझ्याकडे दया". 19 तेव्हा येशूंनी लोकांना गवतावर बसायला
सांगितले आणि पाच भाकरी व दोन मासे हातात घेऊन वर आकाशाकडे पाहून
आभार मानले, आशीर्वाद दिला. 20 सर्वजण पोट भरून जेवले आणि तरीपण
उरलेल्या तुकडयांच्या बारा टोपल्या त्यानी भरल्या. 21 स्त्रिया व मुले सोडल्यात
जवळजवळ पाच हजार पुरूषच होते. 22 येशूंनी लगेच शिष्यांना ताबडतोब
होडीत बसवले यासाठी की त्यानी त्यांच्या आधीच समुद्राच्या पलीकडे
जावे; त्यानंतर त्यानी लोकांना निरोप दिला. 23 लोकांना निरोप दिल्यानंतर
परमेश्वर बापाशी प्रार्थना प्रार्थनेद्वारे सहभागिता करण्यासाठी ते डोंगरावर
एकांत ठिकाणी निघून गेले. त्यावेळी रात्र झाल्यावर देखील ते एकटेच होते.
24 तेव्हा जोरदार प्रचंड वारा असल्यामुळे त्यांची नाव समुद्राच्या लाटांनी अति
वेगाने वरखाली जात होती. 25 तेव्हा येशू रात्री चवथ्या प्रहरी समुद्रावरून
चालत त्यांच्याकडे आले. 26 शिष्य त्यांना समुद्रावर चालतांना पाहून घाबरले
व भीतिमुळे ओरडू लागले, "भूत-भूत". 27 येशू लगेच त्यांना म्हणाले, "हिंमत
बांधा, भिऊ नका, मी आहे". 28 पेत्राने उत्तर दिले, "हे प्रभो, जर आपण असाल
तर मला आज्ञा दया की मी पाण्यावर चालू आपल्याकडे यावे." 29 येशू म्हणाले
"ये". तुरंत पेत्र होडीतून उतरला आणि येशूंकडे जाण्यासाठी पाण्यावर चालू
लागला. 30 परंतु वारा वाहून तो भ्याला आणि जेव्हा तो बुडू लागला तेव्हा
ओरडून म्हणाला, "प्रभुजी मला वाचवा". 31 येशूंनी त्याच क्षणी हात पुढे करून
त्याला धरले आणि म्हटले, "अरे अल्प विश्वासू, तू संशय का धरलास?" 32 जेव्हा

ते होडीत चढले तेव्हा वाटा थांबला. 33 तेव्हा ते नावेत होते तेव्हा त्यानी
येशूंना दंडवत करून म्हटले, "आपण खरोखरच परमेश्वराचे पुत्र आहा." 34 ते
सर्व पलीकडे गनेसरेताच्या देशात गेले. 35 तेथील लोकांनी त्यांना ओळखले
व आपल्या आसपासच्या सर्व प्रांतात माणसे पाठवून खबर दिली आणि सर्व
आजाऱ्यांना त्यांच्याकडे आणले गेले. 36 आणि लोकांनी येशूंना विनंती केली
की, "केवळ आपल्या वस्त्राच्या गोंडयास आम्हांला स्पर्श करू दया," आणि
जितक्यांनी स्पर्श केला तितके सर्व अगदी बरी झाले.

15 1 यरूशलेमेतून आलेले शास्त्री आणि परूशी येशूंना म्हणाले, 2 "तुझे
शिष्य वाडवडिलांपासून चालत आलेल्या रीति-विधींप्रमाणे का करत
नाहीत? जेवणापूर्वी ते तुझे हात का धूत नाहीत?" 3 परंतु येशूंनी उत्तर दिले,
"तुम्ही तुझे रीति-विधी पूर्ण करून परमेश्वराची आज्ञा का मोडता? 4 कारण
परमेश्वरबापांनी अशी आज्ञा केली आहे की आपल्या आई-बापाचा सन्मान
करा आणि हे देखील की जो कोणी आई-बापाला शाप देतो/निंदा करतो
त्याला मृत्युदंड व्हावा. 5 परंतु तुम्ही म्हणता की आपल्या आई-बापाला असे
म्हणणे बरोबर आहे की, "मला क्षमा करा, जे काही मला आपल्याला देणे
भाग होते, ते मी परमेश्वराला देऊन टाकलेले आहे." 6 याप्रकारे तुम्ही म्हणता
की, आपल्या आई-बापाचा आदर करण्याची गरज नाही; त्याचमुळे तुम्ही
आपल्या रीतिप्रमाणे परमेश्वराच्या वचनाला रद्द करून टाकलेले आहे. 7 अरे
ढोंग्यानो, तुमच्यासाठी यशयाने योग्यच भविष्यवाणी केली आहे की, 8 "हे लोक
आपल्या मुखातील गोष्टींद्वारे माझ्याकडे येतात, आणि आपल्या ओठांनी मला
आदर देतात, पण त्याचे अंतःकरण माझ्यापासून दूर आहे." 9 ते व्यर्थच माझी
उपासना करतात आणि मनुष्यांचा आज्ञा सिद्धांताच्या रूपात शिकवतात."
10 लोकसमुदायाला आपल्याजवळ बोलावून येशू म्हणाले, "ऐका आणि समजून
घ्या. 11 जे तोंडात जाते ते माणसाला अशुद्ध करत नाही, परंतु जे काही त्याच्या
तोंडातून बाहेर येते, ते त्याला अशुद्ध करते." 12 तेव्हा शिष्य येशूंना म्हणाले,
"आपल्याला ठाऊक आहे काय की आपण जे काही याविषयी सांगितले, ते
परूश्यांना आवडले नाही आणि ते नाराज झाले आहेत?" 13 यावर येशू उत्तर
देत म्हणाले, "प्रत्येक रोप, जे माझ्या स्वर्गिक पित्यानी लावलेले नाही ते उपटले

जाईल; [14] त्यांना नाराज होऊ दया, ते आंधळयांचे आंधळे मार्गदर्शक आहेत
आणि जर आंधळा आंधळयाला वाट दाखवत असेल तर ते दोघेही खडड्यात
पडतील. [15] तेव्हा पेत्राने विचारले, "आम्हांला ही गोष्ट नीट समजावून
संागा." [16] येशू म्हणाले, "आतापर्यंत देखील अजूनहि तुम्हांला समजत नाही
काय? [17] तुम्हांला हे समजत नाही काय की जे काही तोंडात जाते, ते पोटात
उतरते व बाहेर निघून जाते? [18] परंतु जे काही माणसाच्या तोंडातून निघते ते
अंतःकरणातून येते, तेच त्याला अशुद्ध करते. [19] माणसाच्या अंतःकरणातूनच
दुष्ट आणि घाणेरडया कल्पना, खून, व्यभिचार, यौन-अनैतिकता, चोरी, खोटी
साक्ष, निंदा आणि शिव्यागाळी ही निघतात. [20] या गोष्टी माणसाला अशुद्ध
करतात; परंतु न धुतलेल्या हातांनी जेवल्यावर कोणीच अपवित्र होत नाही.
[21] तेव्हा तेथून निघून येशू सोर व सीदोनाच्या भागात गेले. [22] अचानक तेथे
एक कनानी बाई येऊन मोठयाने ओरडून म्हणाली, "हे प्रभो, दावीदाच्या पुत्रा,
माझ्यावर दया करा, माझी मुलगी भुत लागल्यामुळे फारच दयनीय दशेत
आहे." [23] पण येशू काहीच बोलले नाहीत. त्यांच्या शिष्यांनी येऊन त्यानी
विनंती केली की, "तिला पाठवून दयावे कारण ती आपल्यामागे ओरडत येत
आहे." [24] पण उत्तर देऊन येशू म्हणाले, "इस्त्राएलाच्या हरवलेल्या मेंढरांना
सोडून मला इतर कोणाकडेच पाठवलेले नाही." [25] तरी देखील ती बाई आली,
येशूंना प्रणाम करून म्हणाली, "हे प्रभो, मला साहाय्य करा." [26] येशू म्हणाले,
"बाळकांची भाकरी घेऊन ती घरच्या कुत्र्यांना घालणे चांगले नाही." [27] ती
स्त्री म्हणाली, खरे आहे प्रभुजी, परंतु कुत्रे सुद्धा आपल्या स्वामीच्या मेजावरून
पडलेला चूर खातातच." [28] यवर येशू तिला उत्तर देऊन म्हणाले, "हे बाई
तुझा विश्वास मोठा आहे जसे तुला हवे. तुझ्यासाठी तसेच होवो, आणि तिची
मुलगी त्याच वेळी स्वस्थ झाली. [29] येशू तेथून निघून गालील समुद्राजवळ आले
व डोंगरावर चढून तेथे बसले. [30] लोकांचे थव्यांचे थवे, लंगडे, आंधळे, मुके,
व्यंग असलेले आणि पुष्कळ जण होते आणि त्यानी त्यांना येशूंच्या पायाशी
आणून ठेवले व येशूंनी त्यांना बरे केले. [31] मग जेव्हा लोकांनी पाहिले की मुके
बोलतात, लंगळे चालतात, व्यंग बरे होतात आणि आंधळे पाहतात तेव्हा
थक्क होऊन त्या सर्वांनी इस्त्राएलाच्या परमेश्वराचे गौरव केले. [32] येशूंनी
आपल्या शिष्यांना बोलावून म्हटले, "मला या लोकांचा कळवळा येतो कारण ते

तीन दिवसापासून माझ्याजवळ आहेत आणि त्यांच्या जवळ खायला काहीच
नाही आणि त्यांना उपाशी पोटी निरोप देण्याची माझी इच्छा नाही कारण
वाटेत ते थकतील व असहाय होतील. 33 शिष्यांनी त्यांना म्हटले, "आम्हांला
या जंगलात इतकी भाकरी कोठून मिळेल की आम्ही इतक्या मोठया लोक
समुदायाला तृप्त करावे?" 34 येशूंनी त्यांना विचारले, "तुमच्याजवळ किती
भाकरी आहेत? ते म्हणाले, "सात आणि काही लहान मासे". 35 तेव्हा येशूंनी
लोकांना जमिनीवर बसायला सांगितले. 36 नंतर त्यानी सात भाकरी व मासे
देत गेले व शिष्य लोकांना. 37 याप्रकारे ते सर्व जेवून तृप्त झाले आणि त्यानी
उरलेल्या तुकडयाच्या सात टोपल्या भरून घेतल्या. 38 आणि खाणारे, स्त्रिया व
मुले सोडून चार हजार पुरूष होते. 39 तेव्हा लोकसमुदायाला निरोप दिल्यावर
येशू नावेत चढले आणि मगदानाच्या सीमेपर्यंत आले.

# 16

1 परूशी व सदूकी यांनी येशूंची परीक्षा पाहण्यासाठी "आम्हांला
स्वर्गातून काही चिन्ह दाखवा असे म्हटले". 2 येशू त्यांना म्हणाले,
"तुम्ही संध्याकाळी म्हणता की हवामान उघड-स्वच्छ राहिल कारण आकाशात
लालिमा पसरलेली असते. 3 सकाळी तुम्ही म्हणता की आज तूफान येईल,
कारण आकाश लाल आणि गडद आहे." तुम्ही आकाशाला पाहून सांगू शकता
की हवामान कसे असेल, परंतु काळाची चिन्हे आणि रहस्य का समजू शकत
नाही, ओळखू शकत नाही? 4 या युगाचे दुष्ट आणि व्यभिचारी लोक चिन्ह
शोधतात; परंतु योनाच्या चिन्हाशिवाय दुसरे चिन्ह त्यांना दिले जाणार
नाही. या सर्व गोष्टी बोलल्यानंतर येशू तेथून निघून गेले. 5 शिष्य समुद्राच्या
पलीकडे गेले, पण ते भाकरी घ्यायचे विसरले होते. 6 येशू त्यांना म्हणाले,
"पहा, परूशी आणि सदूकी यांच्या खमिरापासून जपून रहा, सावध असा." 7 ते
आपसात चर्चा करू लागले की, आपण भाकरी आणल्या नाहीत! 8 त्यांच्या
अंतःकरणातील गोष्टी ओळखून येशू म्हणाले, "अरे, कमी विश्वास ठेवणाऱ्यांनो,
तुम्ही आपसात असा विचार का करता की आमच्याजवळ भाकरी नाहीत?
9 तुम्हांला आतापर्यंत देखील समजत नाहीत काय? 10 आणि चार हजारांच्या
सात भाकरींविषयी काय? उरलेल्या भाकरींच्या किती टोपल्या तुम्ही भरल्या
होत्या? 11 तुम्हांला हे कां कळत नाही की मी तुम्हांला भाकरीविषयी म्हटलेच

नव्हते, मी तर तुम्हांला परूशी व सदूकी त्यांच्या खमिराविषयी अर्थात
शिकवणीविषयी सावध रहायला सांगितले होते." 12 तेव्हा त्यांना कळले की
येशूंनी भाकरीच्या खमिराविषयी सांगितले नव्हते परंतु परूशी सदूकी यांच्या
शिक्षणाविषयी सावध राहायला सांगितले होते. 13 जेव्हा येशू कैसरियातील
फिलिप्पीच्या भागात होते तेव्हा त्यानी आपल्या शिष्यांना विचारले, "सांगा
बरे, लोक मला काय म्हणतात?" 14 शिष्यांनी उत्तर दिले, "काही लोक योहान
बाप्तिस्मा देणारा असे म्हणतात, काही लोक एलीया आणि काही यिर्मया किंवा
संदेष्टयांपैकी कोणी एक असे म्हणतात. 15 येशूंनी त्यांना विचारले, "पण तुम्ही
मला काय म्हणता?" 16 शिमोन पेत्र म्हणाला, "आपण जिवंत परमेश्वराचे पुत्र
ख्रिस्त आहात"! 17 येशू म्हणाले, "हे शिमोना, बार्योनाच्या मुला तू आशीर्वादित
आहेस कारण तू स्वतः असे म्हटले नाही, तर माझे पिता जे स्वर्गात आहेत,
त्यानी हे तुझ्यावर प्रगट केले आहे. 18 मी पण तुला सांगतो की तू पेत्र आहेस
आणि याच खडकावर मी आपली मंडळी रचणार; अधोलोकाची दारे मंडळीचा
पराभव करू शकणार नाही. 19 मी तुला स्वर्ग राज्याच्या किल्ल्या देईन. जे
काही तुम्ही या पृथ्वीवर बांधाल, ते स्वर्गात बांधले जाईल; जे काही तुम्ही
पृथ्वीवर उघडाल ते स्वर्गात मोकळे केले जाईल. 20 तेव्हा येशूंनी शिष्यांना
सावध करून सांगितले की, "तुम्ही कोणालाच सांगू नका की मी ख्रिस्त आहे."
21 तेव्हापासून येशू आपल्या शिष्यांना सांगू लागले की त्यानी यरूशलेमेस
जाऊन वडील, मुख्य याजक व शास्त्री यांच्याद्वारे पुष्कळ दुःखे सोसून मारून
टाकले जावे आणि तिसऱ्या दिवशी उठवले जावे हे अतिशय आवश्यक आहे."
22 हे ऐकून पेत्र येशूंना वेगळे घेऊन गेला आणि रागावून म्हणाला, "हे प्रभो,
परमेश्वराची दया आपणावर असावी आणि हे सर्व आपल्याला होऊच नये"
23 येशू लगेच वळून पेत्राला म्हणाले, "हे सैताना, माझ्यापुढून निघून दूर
चालता हो, तु माझ्यासाठी अडखळण बाधा आहेस कारण तू परमेश्वराच्या
गोष्टीकडे नाही तर माणसाच्या गोष्टीकडे लक्ष लावतो. 24 तेव्हा येशू आपल्या
शिष्यांना म्हणाले, "जर माझ्यामागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याला
स्वःचा त्याग करावा लागेल आणि आपला वधस्तंभ उचलून माझ्या इच्छेप्रमाणे
वागावे लागेल. 25 जो कोणी आपला जीव वाचवण्याचा प्रयत्न करेल तो त्यास
मुकेल; जो कोणी माझ्यावर विश्वास केल्यामुळे आपला जीव गमावेल तोच

आपला जीव सदाकाळासाठी सुरक्षित ठेवेल. 26 कारण जर तो संपूर्ण जग प्राप्त
करतो परंतु आपला आत्मा गमावतो तर त्याला काय लाभ? किंवा मनुष्य
आपल्या आत्म्याऐवजी काय देणार? 27 कारण मनुष्याचा पुत्र येशू, आपल्या
स्वर्गदूतांबरोबर येईल आणि तेव्हा प्रत्येक माणसाला त्याच्या कामानुसार
मजुरी मोबदला फळ देईल. 28 मी तुम्हांला खातरीने सांगतो की येथे उभे
असलेल्यांमध्ये काही असे आहेत की ते मनुष्याच्या पुत्राला त्यांच्या राज्यात
येतांना पाहतील. तोपर्यंत ते मृत्युची चव चाखणारच नाहीत" (त्यांना मरणाचा
अनुभव येणार नाही).

17 1 मग सहा दिवसानंतर येशू पेत्र, याकोब आणि त्याचा भाऊ योहान
यांना एका उंच डोंगरावर घेऊन गेले. 2 त्यांच्या उपस्थितीतच येशूंचे
रंगरूप बदलले. त्याचा चेहरा सूर्यासारखा तेजस्वी आणि वस्त्रे प्रकाशासारखी
पांढरी झाली. 3 अचानक मोशे व एलीया येशूंशी संभाषण करू लागले.
4 तेव्हा पेत्र येशूंना म्हणाला,"प्रभुजी आपल्यासाठी हे बरे आहे की आपण
येथे असावे, आपली इच्छा असेल तर आम्ही तीन तंबू (मंडप) तयार करतो;
एक आपल्यासाठी, एक मोशेसाठी आणि एक एलीयासाठी." 5 तो बोलतच
होता त्यावेळी अचानक एक तेजस्वी ढगाने त्यांच्यावर छाया केली त्याचवेळी
एक अशी वाणी झाली, "हा माझा परमप्रिय पुत्र आहे, ज्याच्यामुळे मी प्रसन्न
आहे, त्याचे तुम्ही ऐका." 6 जेव्हा शिष्यांनी ते ऐकले तेव्हा ते भयभीत झाले
व पालथे पडले. 7 येशूंनी जवळ येऊन त्यांना स्पर्श करून म्हटले, "उठा, भिऊ
नका." 8 जेव्हा त्यानी तुझे डोळे उघडले तेव्हा तेथे येशूंशिवाय त्यांना, दुसरा
कोणीच दिसला नाही. 9 जेव्हा ते डोंगरावरून खाली उतरत होते तेव्हा, येशूंनी
त्यांना आज्ञा दिली की जोपर्यंत मनुष्याचा पुत्र अर्थात मी स्वतः मेलेल्यातून
जिवंत उठविला जात नाही, तोपर्यंत कोणालाच या दर्शनाविषयी सांगू नका.
10 येशूंच्या शिष्यांनी विचारले, "मग शास्त्री असे का शिकवतात, की प्रथम
एलीया येईल"? 11 येशूंनी उत्तर दिले, "यात संशय नाही की एलीया येऊन
सर्वकाही व्यवस्थित करेल. 12 मी तुम्हांला सांगतो की एलीया तर आलाच
आहे आणि त्यानी त्याला ओळखलेच नाही. त्यानी त्याच्याशी वाटेल तसा
व्यवहार केला, मनात येईल तसे वागले. याचप्रकारे मनुष्याचा पुत्र त्यांच्या

हातून दुःख सोसणार आहे." 13 तेव्हा शिष्यांना कळले की येशू बापतिस्मा
देणाऱ्या योहानाविषयी सांगत होते. 14 जेव्हा ते सर्व लोक समुदायाजवळ आले
तेव्हा एक माणूस त्यांच्याकडे आला व गुडघे टेकून म्हणाला, "हे प्रभो, माझ्या
मुलावर दया करा, कारण 15 तो मानसिक रोगी असून त्यामुळे त्याचे अतिशय
हाल होतात. तो कधी पाण्यात पडतो तर कधी विस्तवात. 16 मी आपल्या
शिष्यांकडे त्याला घेऊन गेलो होतो, पण ते त्याला बरे करू शकले नाहीत.
17 तेव्हा येशू म्हणाले, "अरेरे, हे अविश्वासू आणि दुष्ट पिढी, मी केव्हापर्यंत
तुमच्या बरोबर राहणार? तुमचे कोठवर सोसणार? त्याला माझ्याकडे घेऊन
या." 18 तेव्हा येशूंनी त्या अशुद्ध आत्म्याला दटावले आणि तो त्याच्यातून निघून
गेला. त्याचवेळी तो मुलगा बरा झाला. 19 मग एकांतात शिष्य, येशूंजवळ
आले आणि त्यांना विचारले, "आम्ही त्या आत्म्याला का काढू शकलो नाही?"
20 येशू त्यांना म्हणाले, "तुमच्या अविश्वासामुळे मी तुम्हाला सत्य सांगतो
की जर तुमच्याजवळ मोहरीच्या (राईच्या) दाण्याएवढा विश्वास आहे तर
असेच होईल. तुमच्यासाठी काहीच अशक्य किंवा असाध्य नाही. 21 तरीपण
या जातीचा आत्मा उपास व प्रार्थना याशिवाय निघत नाही". 22 जेव्हा ते
गालीलातच होते येशू त्यंाना म्हणाले, "मनुष्याचा पुत्र लोकांच्या हातात
धरून दिला जाणार आहे; ते त्याला मारून टाकतील आणि तो तिसऱ्या दिवशी
जिवंत होऊन जाईल." हे ऐकताच ते सर्व अतिशय दुःखी झालेत. 24 जेव्हा
ते कफर्णहूमास आले तेव्हा जे प्रार्थना भवनाचे जकातदार होते, ते पेत्राला
म्हणाले, "तुमचे गुरू प्रार्थना भवनाचा कर देत नाहीत काय?" तो म्हणाला,
होय, देतात. 25 घरी आल्यानंतर सर्वप्रथम येशू म्हणाले, "तुझा विचार काय
आहे, या पृथ्वीचे राजे कर कोणापासून घेतात?" पेत्र म्हणाला, "परक्यांपासून"
26 येशू त्याला म्हणाले, "तेव्हा तर मुले वाचलीत." 27 परंतु आपण त्यांना
अडथळा आणू नये म्हणून समुद्रात गळ टाक आणि येणारा पहिलाच मासा
धरून त्याचे तोंड उघड म्हणजे तुला त्यात एक नाणे सापडेल, तेच नाणे माझ्या
व आपल्याबद्दल कर रूपाने देऊन टाक".

18 1 त्यावेळी शिष्य येशूंकडे येऊन म्हणाले, "स्वर्गाच्या राज्यात सर्वात
मोठा कोण आहे?" 2 येशूंनी एका लहान बाळकाला आपल्याजवळ

बोलावले आणि त्याला त्यांच्यामध्ये उभे केले, 3 आणि म्हटले, "मी तुम्हांला
खचित सांगतो की जर तुमचे परिवर्तन होऊन तुम्ही या लहान बाळकासारखे
झाला नाहीत तर स्वर्गाच्या राज्यात तुमचा प्रवेश होणारच नाही. 4 म्हणून
जो कोणी या लहान बाळकाप्रमाणे स्वतःला दीन करतो, तोच स्वर्गाच्या
राज्यात सर्वात मोठा होईल, 5 आणि जो अशा लहान बाळाला माझ्या नावाने
ग्रहण करतो तो मला स्वीकारतो. परंतु जो कोणी या लहानातील एकाला
जो माझ्यावर विश्वास ठेवतो दुःख देईल व अडखळण असे होईल, त्याच्या
आत्मिक जीवनात बाधा आणेल, त्याच्या गळयात मोठया जात्याचा दगड
बांधून त्याला समुद्राच्या खोल पाण्यात बुडवावे याच्यातच त्याचे हित आहे.
6 अडखळणामुळे जगाची हाय! केवढी दुर्दशा! अडखळणे तर असतीलच, पण
त्या व्यक्तीवर हाय! ज्याच्याद्वारे अडखळण होईल, दुर्दशा होईल! 8 म्हणून
जर तुमचा हात किंवा पाय तुम्हांला अडखळवीत असेल तर त्याला कापून
स्वतःपासून दूर फेकून टाकावे. लुळे आणि लंगडे किंवा व्यंग घेऊन स्वर्गात प्रवेश
करणे, दोन हात किंवा दोन पाय घेऊन सार्वकालिक अग्नीत पडण्यापेक्षा सर्वात
उत्तम आहे. 9 जर तुमचा डोळा तुम्हांला बाधा आणत असेल तर तो उपटून
फेकून टाका" कारण दोन डोळे घेऊन अनंत अग्नीत टाकले जावे यापेक्षा एक
डोळा असून जीवनात प्रवेश करणे तुमच्यासाठी आहे. 10 सावध रहा यासाठी
की या लहानांतील एकाहि बाळकाला तुच्छ मानू नका. मी तुम्हांला सांगतो
की स्वर्गात त्याचे दिव्यदूत माझ्या स्वर्गिक पित्यांच्या उपस्थितीत निरंतर
असतात. 11 आणि ज्यांनी मुक्ति प्राप्त केली नाही त्या सर्वांना तारण देण्यास मी
आलो आहे. 12 तुमचा विचार काय आहे? जर एका मनुष्याजवळ शंभर मेंढरे
असली आणि त्यापैकी एखादे भटकले तर, ती नव्याण्णव सोडून त्या भटकलेल्या
एका मेंढराला शोधण्यास तो डोंगरावर जाणार नाही काय? 13 आणि जेव्हा
त्याला तेव्हा ते सापडले तेव्हा मी तुम्हांला खातरीने सांगतो की, तो त्या
हरवलेल्या मेंढरांसाठी इतका आनंदित होतो. जितका तो नव्याण्णव मेंढरांसाठी
होतच नाही. 14 याचप्रकारे तुमच्या स्वर्गात राहणाऱ्या पित्यानी अशी मुळीच
इच्छा नाही की या लहानापैकी एकाचा देखील नाश व्हावा. 15 समजा, तुमचा
भाऊ किंवा बहिण तुमच्याविरूद्ध काही अपराध करत असेल तर एकांतात
जाऊन त्याला/तिला, त्याची/तिची चूक दाखवा. 16 जर त्याने तुमचे ऐकले तर

तुम्हांला ते परत मिळालेत, पण जर ते तुमचे ऐकत नसतील तर तुम्ही आणखी
एक दोन जणांना आपल्याबरोबर घ्या. तेव्हा दोन-तीन साक्षीदारांच्या तोंडून
प्रत्येक गोष्टीचा निर्णय केला जावा. 17 आणि जर त्यानी त्याचे ऐकले नाही तर,
मंडळीकडे जा. जर त्यानी त्याचे ऐकले नाही तर मंडळीकडे जा. जर त्यानी
मंडळीचे देखील ऐकले नाही तर ते तुमच्यासाठी (भाऊ-बहिण) जकातदार
किंवा परराष्ट्रीय यांच्यासारखे झालेत असे समजा. 18 मी तुम्हांला खरे सांगतो
की जे काही तुम्ही या पृथ्वीवर बांधाल ते स्वर्गात बांधले जाईल आणि जे काही
तुम्ही या पृथ्वीवर मोकळे कराल ते स्वर्गात मोकळे केले जाईल. 19 मी पुन्हा
तुम्हांला सांगतो की जर एखादया विषयावर तुमच्यापैकी दोन जण, एक मन
होऊन विनंती करतील तर, स्वर्गात राहणारे माझे पिता त्यांच्यासाठी तसेच
करतील; पित्याद्वारे त्यांना ते मिळेल. 20 कारण जेथे कोठे माझ्या नावाने
दोन किंवा तीन एकत्र जमतात, तेथे त्यांच्यामध्ये मी आहे. 21 तेव्हा पेत्र
येऊन म्हणाला, "प्रभुजी, माझे भाऊ किंवा बहिण माझ्याविरूद्ध अपराध
करतात तेव्हा मी त्यांना क्षमा करावी काय? सात वेळा काय? 22 येशू त्याला
म्हणाले, "मी असे म्हणत नाही की फक्त सात वेळा पण साताच्या सत्तर वेळा.
23 म्हणूनच स्वर्गराज्याची तुलना एका राजाशी केली जाऊ शकते. 24 जेव्हा तो
आपल्या दासाकडून आपला हिशेब घेऊ लागला तेव्हा एका अशा व्यक्तिला
त्याच्याकडे आणले जो दहा हजार नाण्यांचा कर्जदार होता. 25 पण तो ते कर्ज
फेडू शकत नव्हता; त्याच्या मालकाने आज्ञा केली की त्याला त्याच्या पत्नीला व
त्याच्या मुलाबाळांना विकून, कर्जाची फेड केली जावी, रक्कम वसूल केली जावी.
26 तेव्हा दासाने त्याला प्रणाम केला, त्याचे पाय पकडून विनंती केली की,
"स्वामी थोडा धीर ठेवा, मी आपली सर्व फेड करीन." 27 तेव्हा त्या दासाच्या
स्वामीला त्याच्यावर दया आली आणि त्याने त्याला जाऊ दिले व त्याचे कर्ज
देखील माफ केले. 28 तो दास बाहेर गेला तेव्हा त्याला त्याचा सोबतीचा दास
भेटला; भेटलेल्या दासाला कर्ज माफ झालेल्या पहिल्या दासाला चांदीची 100
नाणी दयायची होती. 29 पहिल्या दासाने त्याचा गळा पकडला आणि म्हणाला,
"तुझ्याकडून माझे जे काही येणे आहे ते लवकरात लवकर दे." यावरून त्याचा
सोबतीच्या दासाने त्याच्या पाया पडून विनंती केली की, माझ्यावर दया करा,
धीर धरा, मी लवकरच तुमची नाणी परत देईन." 30 त्या पहिल्या त्याचे ऐकले

नाही, तो गेला व कर्ज परत देईपर्यंत त्याने त्याला तुरूगांत टाकले; 31 घडलेले
सर्व पाहून त्याचे सोबती दास अतिशय दुःखी झाले आणि त्यानी जाऊन त्याच्या
स्वामीला त्या पहिल्या दासाविषी सर्व माहिती सांगितली. 32 तेव्हा त्याच्या
स्वामीने त्याला बोलावून म्हटले, "हे दुष्ट दासा, तू विनंती केली आणि मी तुझे
सर्व कर्ज माफ केले होते. 33 जशी मी तुझ्यावर दया केली तशी तू सुद्धा आपल्या
सोबती दासावर दया करायची नव्हतीस काय? 34 त्याच्या स्वामी त्याच्यावर
रागावला, तो सर्व देणे फेडीपर्यंत त्याला छळणाऱ्या लोकांच्या हातात दिले,
यासाठी की जोपर्यंत ते सर्वकाही फेडत नाही तोपर्यंत त्याने तेथेच रहावे. 35 जर
तुम्ही प्रत्येकाने आपआपल्या अपराधी भाऊ-बहिणींना मनापासून क्षमा केली
नाही तर माझे स्वर्गिक पिता देखील तुमच्याशी तसाच व्यवहार करतील.

# 19

1 हे सर्व बोलणे संपवल्यानंतर येशू गालीलातून निघून यार्देनेच्या
पलीकडे यहूदीया प्रांतात गेले. 2 एक मोठा लोकसमूह त्यांच्या
मागेमागे चालू लागला आणि त्यानी तेथे त्यांना बरे केले. 3 परूशी देखील येशूंना
पारखण्यासाठी येऊन म्हणाले, "एखादया माणसाने, कोणत्याहि कारणावरून
आपल्या पत्नीला सूटपत्र देणे योग्य आहे काय?" 4 येशू म्हणाले, "तुम्ही असे
वाचले नाही काय की जसे परमेश्वरपित्यानी त्यांना सुरवातीलाच पति-पत्नी
म्हणून ठरवले आणि असे म्हटले की, 5 "या कारणाने पुरूष आईबापाला सोडून
आपल्या पत्नीशी जुळून राहील आणि ती दोघे एकदेह होतील?" 6 यासाठी ते
दोघे, दोन नव्हे तर एकदेह होतील. या कारणांने जे परमेश्वरबापाने जोडले आहे
त्यांना कोणी वेगळे करू नये." 7 त्यानी येशूंना म्हटले, "मग मोशेद्वारे ही आज्ञा
का केली गेली की सूटपत्र देऊन वेगळे व्हावे?" 8 येशू त्यांना म्हणाले, "तुमच्या
कठोर आणि हटट्ी अंतःकरणामुळे मोशेने तुम्हांला सूटपत्र देण्याची परवानगी
दिली होती. पण सुरवातीपासून असे नव्हते. 9 मी म्हणतो की जो कोणी
आपल्या पत्नीला यौन अनैतिकतेच्या कारणाशिवाय सूटपत्र देतो आणि दुसरीशी
विवाह करतो, तो व्यक्ती व्यभिचार करतो; जो कोणी त्यागलेल्या स्त्रीशी विवाह
करतो, तो सुद्धा व्यभिचार करतो" 10 येशूंच्या शिष्यांनी त्यांना म्हटले, "जर
असे असेल तर विवाह करणे बेकार आहे." 11 परंतु येशू त्यांना म्ळणाले, "सर्वच
लोक अविवाहीत राहू शकत नाहीत केवळ तेच ज्यांना हे दान दिले गेलेले

आहे. [12] कारण जन्मतःच नपुसंक आहेत, काही लोकांना माणसांनी नुपुसंक
केलेले आहे; काही लोकांनी स्वतःला स्वर्गाच्या राज्यासाठी नपुसंक करून घेतले
आहे. जो व्यक्ती हे स्वीकारू शकतो त्याने ते स्वीकारावे. [13] तेव्हा येशूंजवळ
लोक बाळकांना घेऊन आलेत की येशूंनी त्यांच्यावर हात ठेवून प्रार्थना करावी,
परंतु शिष्यांनी त्यांना दटावले आणि मना केले. [14] येशूंनी म्हटले, "लहान
बाळकांना माझ्याजवळ येऊ दया; त्यांना मनाई करू नका कारण परमेश्वर
बापांचे राज्य बाळकासारखा स्वभाव असणाऱ्या लोकांचेच आहे." [15] येशूंनी
तुझे हात त्यांच्यावर ठेवले आणि ते तेथून निघून गेले. [16] अचानक एक मनुष्य
येऊन म्हणू लागला, "उत्तम गुरूजी अनंत जीवन प्राप्त करण्यासाठी मी कोणती
चांगली कामें करावी?" [17] येशू त्याला म्हणाले, "तू मला उत्तम का म्हणतोस?
परमेश्वर पित्यांशिवाय कोणीच उत्तम नाही. पण जर, तुला जीवन हवे असेल
तर आज्ञांचे पालन कर. [18] तो म्हणाला, "कोणती आज्ञा?" येशू म्हणाले, "तू
खून करू नको, व्यभिचार करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको;
[19] आपल्या आईवडीलांचा सन्मान कर आणि जसे स्वतःवर प्रेम करतो तसेच
आपल्या शेजाऱ्यावर देखील प्रेम कर. [20] तो तरूण म्हणाला, "हे सर्व मी अगदी
बालपणापासूनच करत आलो आहे, आता माझ्यात काय उणे आहे?" [21] येशू
त्याला म्हणाले, "जर सिद्ध व्हायचे असेल तर जा, आणि जे काही तुझ्याजवळ
आहे ते गोरगरिबांना देऊन टाक; माझा शिष्य हो म्हणजे तुला स्वर्गात संपत्ती
मिळेल." [22] हे ऐकताच तो तरूण उदास होऊन निघून गेला कारण तो फारच
श्रीमंत होता. [23] तेव्हा येशू आपल्या शिष्यांना म्हणाले, "मी तुम्हांला सत्य
सांगतो की स्वर्गाच्या राज्यात श्रीमंताचा प्रवेश होणे फारच कठीण आहे." [24] मी
पुन्हा तुम्हांला सांगतो की, "परमेश्वराच्या राज्यात श्रीमंताचा प्रवेश होण्यापेक्षा
उंटाला सुईच्या नाकातून जाणे जास्त सोपे आहे." [25] जेव्हा येशूंच्या शिष्यांनी
ते ऐकले तेव्हा ते आश्चर्याने भरून गेले आणि म्हणाले, "तर मग कोणाचे तारण
होणे शक्य आहे?" [26] तेव्हा येशू त्यांच्याकडे पाहून म्हणाले, "माणसांतर्फे
हे होणे अशक्य, पण परमेश्वराला सर्व शक्य आहे." [27] तेव्हा पेत्र त्यांना
म्हणाला, "पहा, आम्ही तुझे सर्वकाही सोडून आपल्यामागे आलो आहोत, तेव्हा
आम्हांला काय मिळेल?" [28] आणि येशू त्या लोकांना म्हणाले, "मी तुम्हांला
अगदी-अगदी खातरीने सांगतो की तुम्ही जितके माझ्यामागे आला आहात,

नवीन प्रारंभाच्या समयी जेव्हा परमेश्वराचा पुत्र आपल्या गौरवाने परिपूर्ण
होऊन राजसिंहासनावर बसून इस्त्राएलाच्य बारा वंशाचा न्याय करेल तेव्हा
तुम्ही देखील जे माझ्यामागे आला आहात, राजासनावर बसून, इस्त्राएलाच्या
बारा वंशाचा न्याय कराल. 29 तसेच प्रत्येकजण ज्याने घर, भाऊ, बहिणी,
बाप, आई, मुले किंवा शेते किंवा संपत्ती माझ्या नावांसाठी सोडले आहे त्या
प्रत्येकाला शंभरपटीने प्रतिफळ तसेच अनंत जीवन हे वतन मिळेल. 30 परंतु जे
पहिले ते शेवटले आणि जे शेवटले ते पहिले असे पुष्कळ लोकांचे होईल.

# 20

1 कारण स्वर्गाचे राज्य एका अशा गृहस्थासारखे आहे जो मोठया
पहाटे उठून आपल्या द्राक्षाच्या मळयात काम करण्यासाठी कामकरी
शोधण्यास गेला. 2 त्याने त्यांना चांदीचे एक नाणे (एक दिनार) अशी
दिवसभराची मजूरी ठरवून आपल्या द्राक्षमळयात कामावर लावले. 3 जेव्हा
तो सकाळी नऊ वाजता बाहेर गेला, तेव्हा बाजारातील सर्व कामकरी रिकामे
उभे असलेले त्याला आढळले. त्याने त्यांना देखील म्हटले, 4 "तुम्ही सुद्धा
द्राक्षाच्या मळयात काम करायला जा आणि मी तुम्हांला योग्य मजूरी देईन"
आणि त्यानी तसेच केले सुद्धा. 5 दुपारी आणि तिसऱ्या प्रहरी जाऊन त्याने
तसेच केले. 6 संध्याकाळी पाच वाजता पुन्हा दुसऱ्यांना रिकामे पाहून त्याने
विचारले, "तुम्ही पूर्ण दिवस येथे असेच का उभे आहात?" त्यानी म्हटले,
"कोणीच आम्हाला काम दिले नाही." 7 तो त्यांना म्हणाला, "तुम्हीपण
जाऊन द्राक्षाच्या मळयात काम करा आणि तुम्हांला मजुरी दिली जाईल."
8 संध्याकाळ झाल्यावर मळयाच्या मालकाने आपल्या अधिकाऱ्याला म्हणाला
"शेवटल्यापासून आरंभ करून पहिल्यापर्यंत मजूरांना मजूरी देऊन टाक." 9 ज्या
लोकांना पाच वाजता कामावर घेतले होते त्यांना चांदीचे एक नाणे (एक
दीनार) दिले गेले. 10 ज्या लोकांना सकाळपासून काम दिले होते, 11 त्यांना
सुद्धा चांदीचे एक नाणे दिले गेले, त्या मजूरांनी अधिक मजूरी मिळण्याची
अपेक्षा केलेली होती. 12 मजूरी मिळताच ते मालकाची तक्रार व कुरकुर करत
म्हणाले, "ज्या लोकांनी एकच तास काम केले त्यांनापण तीच मजूरी दिली
गेली. आम्ही सर्वांनी दिवसभर उन्हात कष्ट केल्यावर सुद्धा तेवढीच मजूरी
मिळाली आहे. 13 परंतु त्याने त्यातील एकाला उत्तर दिले, "मी तुझ्यावर

अन्याय करत नाही. तूच एका चांदीच्या नाण्यासाठी काम करायचे कबूल केले
नव्हते काय?" [14] आपली मजूरी घे आणि चालता हो. ही माझी इच्छा आहे की
मी जितके तुला दिले तितकेच शेवटल्या मजूराला सुद्धा दयावे. [15] आपल्या
मर्जीप्रमाणे आपल्या पैशाचे, मी वाटेल ते करू शकत नाही काय? मी उदार
मनाचा आहे यामुळे तुम्हांला त्रास होतो काय? [16] अगदी याचप्रमाणे जे पहिले
आहेत ते उंच पदे प्राप्त करणार नाहीत आणि ज्यांना कोणी विचारत देखील
नाही. तेच शेवटी श्रेष्ठ असे होतील. [17] यरूशलेमेस जातांना येशूंनी आपल्या
बारा शिष्यांना एकीकडे नेऊन म्हटले, [18] "पहा, आपण यरूशलेमेस जात
आहोत. मनुष्याचा पुत्र मुख्य याजकांच्या व शास्त्रांच्या हातात धरून दिला
जाणार आहे; ते लोक त्याला मारून टाकतील, [19] त्याची थटट करण्यासाठी,
फटके मारण्यासाठी व वधस्तंभावर खिळण्यासाठी त्याला परराष्ट्रीयांच्या
स्वाधीन करतील, तो तिसऱ्या दिवशी पुन्हा उठवला जाईल. [20] तेव्हा जब्दीच्या
मुलांची आई आपल्या मुलांसोबत आली. ती येशूंच्या पाया पडली आणि काही
मागू लागली. [21] येशूंनी तिला विचारले, "तुला काय हवे?" ती त्यांना म्हणाली,
"असे करा की, आपल्या स्वर्गिक राज्यात माझ्या दोन्ही मुलांना, एकाला
आपल्या उजवीकडे व एकाला आपल्या डावीकडे बसता यावे." [22] परंतु येशूंनी
उत्तर दिले, "तुम्हांला ठाऊक नाही की तुम्ही काय मागत आहात? जो प्याला मी
पिणार आहे तो तुम्हांला पिता येईल काय? ते म्हणाले, "पिता येईल". [23] येशू
त्यांना म्हणाले, "तुम्ही खरोखर माझा प्याला प्याल तरी देखील उजवीकडे व
डावीकडे बसण्याचा अधिकार देणे हे माझे काम नाही, परंतु हे त्याच लोकांना
मिळेल ज्यांना माझ्या परमेश्वर बापांनी त्यासाठी सिद्ध तयार केलेले आहे.
[24] जेव्हा बाकी दहा शिष्यांनी हे सर्व ऐकले तेव्हा त्यांना त्या दोन्ही भावांचा
राग आला, [25] परंतु जेव्हा येशूंनी त्यांना बोलावून म्हटले, "तुम्हांला ठाऊक
आहे की परराष्ट्रीयांवर त्याचे प्रधान लोक शासन करतात आणि जे महान व
थोर आहेत ते दुसऱ्यांवर तुझे अधिकार चालवतात. [26] परंतु तुमच्यामध्ये असे
होता कामा नये. तुमच्यात जो श्रेष्ठ होऊ पाहतो त्याने दुसऱ्याचा सेवक व्हावे.
[27] जो सर्वात पुढे किंवा उंच पदाची अपेक्षा करतो त्याने दुसऱ्यांचा गुलाम
दास व्हावे. [28] याप्रकारे मनुष्याचा पुत्र सेवा घ्यायला नव्हे तर सेवा करायला
आणि तुझे जीवन अनेक लोकांच्या ऐवजी देण्यासाठी आला. [29] ज्यावेळी ते

यरीहोहून जात होते, येशूंबरोबर एक मोठा लोकसमुदाय त्यांच्या मागे-मागे
चालला. 30 तेव्हाच पहा, दोन व्यक्ती ज्यांना डोळयांनी अजिबात दिसत नव्हते
आणि जे वाटेवर बसलेले होते, ऐकले की येशू जवळून जात आहे. हे ऐकताच ते
मोठमोयाने ओरडून म्हणू लागले, "हे दावीदाच्या पुत्रा, आमच्यावर दया करा."
31 लोकांनी त्यांना शांत राहण्यासाठी धमकावले, "पण ते आणखी आमच्यावर
दया करा." 32 येशू तेथेच उभे झाले व त्यानी विचारले, "मी तुमच्यासाठी काय
करू?" तुमची इच्छा काय आहे? त्यानी त्यांना म्हटले, "स्वामी, प्रभो हेच की
आम्ही पाहावे, आम्हांला दृष्टि यावी. आमचे डोळे उघडावे." 33 येशूंना त्याचा
कळवळा आला आणि त्यानी त्यांच्या डोळयांना स्पर्श केला, त्याच वेळी त्यांना
दृष्टि आली व ते पाहू लागले आणि समयापासून ते येशूंच्या मागे-मागे चालू
लागले.

# 21

1 जेव्हा ते यरूशलेमेजवळच्या बेथफगे जवळील जैतून डोंगराजवळ
पोहचले तेव्हा येशूंनी आपल्या दोन शिष्यांना असे सांगून पाठवले की,
2 "तुम्ही समोरच्या गावात जाताच तुम्हांला एक गाढवी व तिच्याजवळ शिंगरू
बांधून ठेवलेली आढळतील ती सोडून माझ्याकडे घेऊन या. 3 जर कोणी तुम्हांला
काही म्हटले तर तुम्ही म्हणा की येशूंना त्याची गरज आहे. तेव्हा तो तुम्हांला
ती ताबडतोब देईल." 4 हे सर्व यासाठी झाले की संदेष्टयांनी लिहिलेली ती गोष्ट
पूर्ण व्हावी की, 5 सीयोनेच्या लोकांना सांगा, पहा, तुमचा राजा तुमच्याजवळ
येत आहे. तो नम्र आहे आणि गाढवावर म्हणजे गाढवाच्या शिंगरावर बसलेला
आहे. 6,7 शिष्यांनी जाऊन येशूंच्या आज्ञेप्रमाणेच केले. गाढव आणि शिंगरू
आणून त्यानी त्यांच्यावर आपली वस्त्रे घातली आणि येशू त्याच्यावर बसले.
8 काही लोकांनी, बहुतेकांनी आपली वस्त्रे वाटेवर पसरली, काहींनी झाडांच्या
डहाळया तोडून त्या वाटेवर पसरल्या. 9 पुढे चालणारे व मागे चालणारे लोक,
ओरडून ओरडून मोठयाने गजर-घोषणा करत होते की, "दावीदाच्या पुत्राला
होसान्ना! जो प्रभूंच्या नांवाने येत आहे, तो धन्य व आशीर्वादीत असो!" 10 जेव्हा
ते यरूशलेमेस आले, पूर्ण शहर उत्साहाने विचारू लागले की "हा कोण आहे?"
11 लोकसमुदाय म्हणाला, "हा गालीलाच्या नासरेथातील संदेष्टा येशू आहे."
12 तेव्हा येशू परमेश्वराच्या भवनात (मंदिरात) गेले आणि जे लोक खरेदी-विक्री

करत होते त्याचे चौरंग पालथे केले आणि कबूतरे विकणाऱ्यांच्या बैठकी फेकून
दिल्या. 13 येशू त्यांना म्हणाले, "लिहिले आहे की माझे घर प्रार्थनेचे घर म्हटले
जाईल, पण तुम्ही याला चोरांचा अडड - लुटारूंची गुहा असे करून टाकलेले
आहे." 14 मग आंधळे आणि लंगडे लोक सुद्धा प्रार्थना भवनात त्यांच्याकडे आले
आणि येशूंनी त्यांना बरे केले. 15 जेव्हा मुख्ययाजक आणि शास्त्र्यांनी येशूंची
अद्भुत कार्ये पाहिली आणि प्रार्थना भवनात मुलांचा हा गजर "दावीदाच्या
पुत्राला होसान्ना" करतांना पाहिले तेव्हा ते रागावले, नाराज झाले. त्यानी
म्हटले, "हे तू ऐकत आहेस काय की हे लोक काय बोलत आहेत?" 16 येशू
त्यंाना म्हणाले, "होय"! तुम्ही कधीच असे वाचले नाही काय की लहान
मुलांच्या आणि दूध पिणाऱ्या बाळकांच्या मुखातून तू स्तूति करून घेतलेली
आहे." 17 तेव्हा ते त्यांना सोडून शहराच्या बाहेर बेथानीस गेले व तेथे त्यानी
रात्र काढली. 18 सकाळी जेव्हा ते शहरात परतले तेव्हा त्यांना भूक लागली.
19 वाटेत जेव्हा त्यानी अंजिराचे एक झाड पाहिले, तेव्हा त्याच्याजवळ गेले
परंतु पानांशिवाय त्यावर त्यांना काहीच मिळाले नाही, तेव्हा ते म्हणाले, "आज
पासून तुला कधीच फळ न येवो." ताबडतोब ते अंजिराचे झाड वाळून गेले.
20 शिष्यांनी ते वाळलेले पाहून आश्चर्याने म्हटले, "अरे अंजिराचे झाड इतक्या
लवकर कसे वाळून गेले? 21 येशूंनी त्यांना उत्तर देऊन म्हटले, "मी तुम्हांला
खचित सांगतो की जर तुमच्याजवळ विश्वास असला तर आणि तुम्ही संशय
धरला नाही तर, तुम्ही केवळ अंजिराच्या झाडाला केल्याप्रमाणे कराल इतकेच
नाही, तर या डोंगराला सुद्धा म्हटले की "आपली जागा सोड आणि समुद्रात
टाकला जा" तर तसेच होईल. 22 जे काही विश्वास धरून व संशय सोडून तुम्ही
प्रार्थनेत मागाल ते सर्व तुम्हांला मिळेल." 23 जेव्हा येशू प्रार्थना भवनात येऊन
शिकवत होते तेव्हा मुख्य याजक आणि लोकांचे पुढारी येऊन म्हणाले, "तुम्ही
ही कार्ये कोणाच्या अधिकाराने व कोणत्या अधिकाराने करता?" 24 येशूंनी
त्यांना उत्तर दिले, "तुम्ही आधी मला उत्तर दया मग मी पण तुम्हांला सांगेन
की मी, कोणाच्या अधिकाराने ही कार्ये करतो." 25 योहानाचा बाप्तिस्मा हा
कोठून होता? स्वर्गाच्या आदेशापासून किंवा माणसापासून ते लोक आपसात
विचार करू लागले की, जर स्वर्गापासून म्हटले तर हा आपल्याला म्हणेल की,
मग तुम्ही त्याच्यावर विश्वास का ठेवला नाही? 26 पण्सा जर आपण म्हटले

की माणसापासून, तर आपल्याला लोकांची भीति आहे कारण प्रत्येक जण
योहानाला संदेष्टा समजत होता." 27 तेव्हा त्यानी येशूंना हे उत्तर दिले की,
"आम्हांला ठाऊक नाही", तेव्हा येशू त्यंाना म्हणाले, "तर मग मी पण तुम्हांला
हे सांगत नाही की मी कोणाच्या अधिकाराने ही अद्‌भुत कार्ये करतो. 28 परंतु
तुमचा विचार काय आहे? एका माणसाला दोन मुले होती; तो एकाजवळ गेला
आणि म्हणाला, "मुला तू आज माझ्या द्राक्षमळयात जाऊन काम कर." 29 त्याने
बापाला उत्तर दिले, "जातो, बाबा" पण तो गेला नाही. 30 मग तो दुसऱ्या
मुलाकडे गेला आणि त्याने त्याला तसेच म्हटले पण तो म्हणाला, "मी जाणार
नाही"; नंतर त्याला पस्तावा झाला, त्याचे मन बदलले आणि तो गेला. 31 या
दोघांपैकी कोणी आपल्या बापाची आज्ञा पाळली हे तुम्ही सांगू शकता का?
त्यानी म्हटले, "दुसऱ्या मुलाने". येशू त्यांना म्हणाले, "मी तुम्हांला अगदी पक्के
सांगतो की जकात घेणारे आणि वैश्या तुमच्या आधीच परमेश्वराच्या राज्यात
प्रवेश प्राप्त करतील. 32 कारण तुम्हांला नीतिचा मार्ग दाखवण्यासाठी योहान
आला होता परंतु तुम्ही त्याच्यावर विश्वास केला नाही. परंतु जकातदारांनी
आणि वैश्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला, तरीपण हे पाहून सुद्धा तुम्ही
त्याच्यावर विश्वास ठेवावा असा त्यानंतर देखील तुम्हांला पस्तावा झाला
नाही. 33 आणखी एक दाखला ऐका; एक व्यक्ती होता, त्याने द्राक्षमळा लावला,
त्याच्या सभोवताल एक कुंपण घातले. त्यात त्याने द्राक्षारससाठी कुंड खणले
व माळा सुद्धा बांधला आणि माळयांना ठेका देऊन तो स्वतः परदेशी निघून
गेला. 34 जेव्हा फळांचा हंगाम आला तेव्हा तुझे फळ घेण्यासाठी त्याने आपल्या
दासांना माळयाकडे पाठवले. 35 परंतु माळयांनी दासांना धरून, कोणाला
ठोकले तर कोणाला मारून टाकले आणि दुसऱ्यांना दगडमार केला. 36 मग
त्याने दुसऱ्या दासांना पाठवले जे पहिल्यापेक्षा अधिक होते आणि त्यानी
त्यांच्याशी सुद्धा तसाच व्यवहार केला. 37 शेवटी त्याने आपल्या मुलाला
त्याच्याकडे या विचाराने पाठवले की निदान माझ्या मुलाचा तरी ते मान
करतील व त्याच्याशी दासाप्रमाणे वागणार नाहीत. 38 परंतु माळयांनी जेव्हा
त्याच्या मुलाला पाहिले, तेव्हा ते आपसात म्हणाले, "अरे हा तर त्याचा मुलगा,
त्याच्या वारीस आहे, चला आपण त्याला मारून टाकू म्हणजे त्याची विरासत,
त्याचे वतन आपल्याला प्राप्त होईलच. 39 आणि या योजनेनुसार त्यानी त्याला

पकडले आणि द्राक्षाच्या मळयाबाहेर काढून त्याचा प्राणच घेतला. 40 तर मग
जेव्हा द्राक्षमळयाचा मालक येईल तेव्हा तो त्या माळयांचे काय करेल? 41 ते
त्यांना म्हणाले, तो त्या दुष्ट लोकांना हालहाल करून भयंकर रीतिने त्याचा
नाश करेल आणि द्राक्षमळयाचा ठेका दुसऱ्या माळयांना देईल जे हंगामी त्याला
फळ देतील." 42 येशू त्यांना म्हणाले, "तुम्ही पवित्रशास्त्रात कधी वाचले नाही
काय, की जो दगड बांधणाऱ्या राजमिस्त्र्यांनी नापसंत केला, रद्द केला, तोच
दगड कोनशिला झाला?" 43 हे परमेश्वरबापांकडून झाले आणि ते आमच्या
दृष्टीने अद्भुत व आश्चर्यकारक असेच आहे, म्हणून मी तुम्हांला सांगतो की
परमेश्वरपित्याचे राज्य तुमच्यापासून काढून घेतले जाईल आणि ते त्या लोकांना
दिले जाईल जे त्याचे फळ देतील. 44 जो या खडकावर आपटेल - पडेल त्याचा
चुराडा होईल आणि ज्या कोणावर ही धोंड पडेल त्याचा भुगा-भुगा करून
टाकील." 45 मुख्य याजक आणि परूशी यांना त्याचा दाखला समजला की येशू
हे सर्व त्यांच्या विषयीचा बोलत आहेत. 46 आणि ते येशूंना कैदेत टाकण्यासाठी
धरू पाहात होते परंतु त्यांना लोकांची भीति वाटली कारण लोक येशूंना संदेष्टा
मानत होते.

22 1 लोकांना दाखले आणि उदाहरण देऊन येशू पुन्हा म्हणाले 2 "स्वर्गाचे
राज्य एका अशा राजासारखे आहे ज्याने आपल्या मुलाच्या लग्नाचा
प्रबंध केला. 3 त्याने आपल्या दासांना त्या सर्व लोकांकडे पाठवले ज्यांना त्याने
निमंत्रित केलेले होते. परंतु त्यांच्यापैकी कोणीच आले नाही. 4 त्याने पुन्हा
एकदा आपल्या दासांद्वारे त्यांना असा संदेश दिला की त्यांना सांगा, की "पहा,
मी जेवण तयार केले आहे, सर्व तयारी झाली आहे, लग्नाच्या मेजवानीस
या." 5 परंतु तरीपण लोकांनी त्याकडे लक्ष दिले नाही आणि इकडे-तिकडे ते
सर्व निघून गेले. एक आपल्या शेतात, तर दुसरा आपल्या कामासाठी 6 बाकी
उरलेल्या लोकांनी त्याच्या दासांना धरून त्याचा अपमान केला आणि त्यांना
मारून सुद्धा टाकले. 7 राजाला त्याविषयी कळले तेव्हा त्याला खूप राग
आला. 8 त्याने आपली सेना पाठवून हत्यारांचा नाश केला आणि त्याचे शहर
जाळून टाकले. तेव्हा तो आपल्या दासांना म्हणाला, जेवण तयार आहे, ज्यांना
बोलावले गेले होते, निमंत्रण दिले होते ते लायकीचे नव्हते. 9 म्हणून रस्त्याच्या

चौकात जा, ज्या कोणाला तुम्ही बघता, जे कोणी आढळतात त्यांना लग्नाचे
निमंत्रण दया. 10 मग ते दास रस्त्यावर गेले आणि बरे-वाईट जितके त्यांना
दिसले, तितक्यांना ते घेऊन आले; याप्रकारे लग्नाचा मंडप पाहुण्यांनी भरून
गेला. 11 जेव्हा राजा पाहुण्यांना भेटायला आला तेव्हा तेथे त्याला एक असा
मनुष्य दिसला जो लग्नाचे विशेष कपडे घालून आला नव्हता. 12 त्याने त्याला
विचारले, "मित्रा, तू लग्नाचे खास कपडे न घालता, येथे कसा काय प्रवेश
केलास?" तो काहीच बोलू शकला नाही. 13 तेव्हा राजा नोकरांना म्हणाला,
"याचे हातपाय बांधून घेऊन जा आणि अंधारात टाकून दया तेथे रडणे व
दात-खाणे चालेल" 14 सर्व लोकांना निमंत्रण दिले गेले होते परंतु सर्वच लोक
लग्नाच्या अटी पूर्ण मान्य करत नसतात. 15 तेव्हा परूश्यांनी आपसात विचार
केला की त्यांना कशाप्रकारे त्यांच्यात बोलण्याद्वारे पकडावे व फसवावे.
16 यासाठी त्यानी आपल्या शिष्यांना हेरोदयांबरोबर त्यांच्याकडे पाठवून
म्हटले, गुरूजी आम्हांला ठाऊक आहे की आपण खरे आहात आणि परमेश्वरांचा
मार्ग खरेपणाने शिकवता; आपण कोणाचीच पर्वा करत नाही, कोणाला भीत
नाही कारण आपण माणसांचे तोंड पाहून बोलत नाही. 17 यासाठीच आम्हांला
सांगा की आपल्याला काय वाटते? कैसराला वर देणे योग्य आहे की नाही.
18 येशूंनी त्यांची दुष्टता ओळखून त्यांना उत्तर दिले, "हे कपटयांनो, ढोंग्यांनो,
मला का पारखता, माझी परीक्षा का घेता? 19 कराचे नाणे मला दाखवा, "तेव्हा
ते त्यांच्याजवळ एक दीनार घेऊन आले. 20 येशूंनी त्या लोकांना विचारले, "ही
मूर्ती आणि हे नांव कोणाचे आहे"? ते म्हणाले, "कैसराचे". 21 येशू म्हणाले, "जे
कैसराचे आहे ते कैसराला आणि जे परमेश्वराचे आहे ते परमेश्वरांना दया." 22 हे
ऐकून त्यानी आश्चर्य केले आणि ते त्यांना सोडून निघून गेलेत. 23 त्याच दिवशी
सदूकी ज्यांच्या मते मेलेल्यांचे पुनरूत्थान नाहीच, ते येशूंजवळ आले आणि
त्यांना विचारले, "हे गुरूजी, मोशेने म्हटले होते की जर कोणी संतान नसता
मेला तर त्याच्या भावाने त्याच्या पत्नीशी विवाह करून आपल्या भावाचा वंश
उत्पन्न करावा. 25 आता आमच्याकडे सात भाऊ होते. पहिला लग्न करून मेला
आणि त्याला संतान नसल्यामुळे तो आपली पत्नी आपल्या भावासाठी सोडून
गेला. 26 याचप्रकारे दुसऱ्याने व तिसऱ्याने सुद्धा केले आणि ते सातहि भाऊ
मेले. 27 शेवटी ती स्त्री सुद्धा मरण पावली. 28 मग पुनरूत्थान झाल्यावर ती

त्या सात जणांपैकी कोणाची पत्नी होईल?" 29 येशूंनी त्यांना उत्तर दिले, तुम्ही
बायबल आणि परमेश्वराचे सामर्थ्य ओळखत नाही, जाणत नाही म्हणून भ्रमात
पडला आहात. 30 कारण पुनरूत्थानानंतर लग्न-विवाह होणारच नाही, परंतु ते
स्वर्गात परमेश्वराच्या दूतांसारखे होतील. 31 पण मेलेल्यांच्या पुनरूत्थाविषयी
परमेश्वराने जे सांगितले ते वचन तुम्ही वाचले नाही काय? की मी अब्राहामाचा
32 इसहाकाचा आणि याकोबाचा परमेश्वर आहे; ते तर मेलेल्यांच्या नव्हे तर
जिवतांचे परमेश्वर आहेत." 33 हे ऐकून लोक त्यांच्या उपदेशामुळे आश्चर्यचकित
झालेत 34 जेव्हा परूश्यांनी ऐकले की येशूंनी कशाप्रकारे सदूक्यांचे तोंड बंद
केले, तेव्हा ते सर्व एकत्र जमलेत 35 आणि त्यांच्यापैकी एका व्यवस्थापकाने
येशूंची परीक्षा घेण्यासाठी त्यांना विचारले, 36 "हे गुरूजी, बायबलमध्ये
कोणती आज्ञा सर्वात मोठी आहे?" 37 त्यानी त्यांना म्हटले, "तू परमेश्वर आपला
प्रभु यांच्यावर पूर्ण अंतःकरणाने, पूर्णजिवाने व पूर्ण बुद्धिने प्रीति कर. 38 मोठी
आणि मुख्य आज्ञा तर हीच आहे. 39 आणि त्याच्यासारखीच ही दुसरी आज्ञा
सुद्धा आहे की तुम्ही आपल्यासारखे प्रेम करा, 40 या दोन आज्ञा नियमशास्त्र
व संदेष्टयांचा आधार आहेत. जेव्हा परूशी एकत्र होते तेव्हा येशूंनी त्यांना
विचारले, 42 'ख्रिस्ताविषयी तुम्हांला काय वाटते, काय कळते? तो कोणाचा
पुत्र आहे? त्यांना त्यांना म्हटले, "दावीदाचा". 43 येशूंनी त्यांना विचारले,
"मग दावीद आत्म्याच्याद्वारे त्याला प्रभु असे का म्हणतो? 44 की प्रभूने माझ्या
प्रभुला म्हटले जोपर्यंत मी तुझ्या शत्रूंना तुझ्या पायाखाली घालत नाही.
तोपर्यंत तू माझ्या उजवीकडे बस. 45 मग जेव्हा दावीद त्यांना प्रभु म्हणतो
तर तो त्याचा पुत्र कसा झाला? कसा असणार? 46 याचे उत्तर, एका शब्दाने
देखील कोणालाच देता आले नाही, पण त्या दिवसापासून येशूंना आणखी काही
विचारण्याची हिंमत झाली नाही.

23 1 तेव्हा येशू लोकांच्या गर्दीला व शिष्यांना म्हणाले की, 2 "शास्त्री
व परूशी मोशेच्या पदावर विराजमान आहेत. 3 म्हणून जे काही ते
तुम्हांला सांगतात त्याचे पालन करा, परंतु त्या गोष्टींचे मुळीच नाही, जे ते
तुम्हांला करायला सांगतात पण स्वतः त्याचे पालन करत नाहीत; तसे वागत
नाहीत. 4 तेजड ओझे जे उचलणे कठीण आहे ते लोकांच्या खांदयावर देतात पण

जड ओझे वाहण्यासाठी मात्र ते स्वतःचे बोट देखील लावत नाहीत. 5 लोकांना
केवळ दाखवण्यासाठी ते तसे करतात ते आपली मंत्रपदे रूंद आणि आपल्या
झग्याचे गोंडे मोठे करतात. 6 जेवण्याच्या कार्यक्रमात त्यंाना बसायला उंच व
श्रेष्ठ आसने हवीत आणि आराधनालयात विशेष खुर्च्यांची त्यांना ओढ आणि
हाव असते. 7 त्यांना बाजारात लोकांकडून नमस्कार आणि स्वतःला लोकांतर्फे
गुरूजी म्हणवून घेणे खुप आवडते. 8 तुम्ही आपल्या मनातही कामना करू नका
की कोणी तुम्हांला गुरूजी म्हणावे, कारण तुमचे एकच गुरू आहेत, ते आहेत
ख्रिस्त व तुम्ही एकमेकांचे भाऊ-बहिण आहात. 9 या जगात कोणालाच माझे
पिता असे म्हणू नका कारण तुमचे एकच स्वर्गिक पिता परमेश्वर आहेत जे
स्वर्गात आहेत. 10 स्वतःला स्वामी म्हणवून घेउ नका कारण तुमचे एकच
स्वामी आहेत, जे ख्रिस्त आहेत. 11 जो तुमच्यात सर्वात मोठा होऊ इच्छितो
त्याने तुमचा सेवक व्हावे. 12 जो स्वतःला मोठा करेल त्याला लहान केले
जाईल, जो स्वतःला नम्र करेल तो उंच व श्रेष्ठ केला जाईल. 13 परंतु अहो,
कपटी शास्त्र्यांनो, अहो परूश्यांनो ढोंग्यांनो तुम्हावर हाय कारण तुम्ही
पाखंडी-ढोंगी आहात. तुम्ही दुसऱ्यांसाठी स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करण्याची
दारे बंद करता, तुम्ही बाधा आणता. 14 हे कपटी शास्त्र्यांनो, परूश्यांना
तुम्ही ढोंगीपणाने लोकांना दाखवण्यासाठी लांब-लांब प्रार्थना करता आणि
त्यासोबतच विधवांची घरें लुटून खाता, म्हणून तुम्ही मोठे अपराधी ठरता
यामुळे तुम्हांला अधिक जास्त शिक्षा होईल. 15 अरे कपटी शास्त्र्यांनो आणि
परूश्यांनो तुम्ही समुद्र आणि भूमीची यात्रा करून कोणत्या ना कोणत्या
प्रकारे एका मनुष्याला आपल्या मताचा करता आणि त्यानंतर त्याला आपल्या
सारखेच नरकाचे संतान व भागीदार करता. 16 आंधळया कपटी मार्गदर्शकांनो,
तुम्ही म्हणता की या प्रार्थना भवनाची शपथ वाहण्यात काहीच अर्थ नाही, पण
जो कोणी या भवनातील सोन्याची शपथ वाहतो, तो मात्र आपल्या शब्दांनी
बांधला जातो. 17 मूर्खांनो, आंधळयांनो यापेक्षा मोठे काय आहे? सोने की
प्रार्थना भवन जे सोन्याला शुद्ध पवित्र करते? 18 तुम्ही म्हणता की, जो कोणी
वेदीची शपथ वाहतो त्यात काहीच नाही, परंतु जर त्यांच्यावर ठेवलेल्या
अर्पणाची शपथ वाहतो तर तो सुद्धा आपल्या शब्दांनी बांधला जातो. 19 अरे
मूर्खांनों, आंधळयांनो! अर्पण मोठे श्रेष्ठ आहे की अर्पणाला पवित्र करणारी वेदी?

20 म्हणून जो वेदीची शपथ वाहतो तो याची व याच्यावर ठेवलेल्या वस्तूची
शपथ वाहतो. 21 जो प्रार्थना भवनाची शपथ वाहतो याची आणि त्याच्या
आत राहणाऱ्यांची शपथ वाहतो. 22 जो स्वर्गाची शपथ वाहतो तो तेथील
सिंहासनाची आणि त्याच्यावर विराजमान होणाऱ्याची देखील शपथ वाहतो.
23 अहो कपटी शास्त्रांनो, ढोंगी परूश्यांनो, तुमच्यावर हाय! तुम्ही पुदिना,
बडीशेप व जिरे यांचा दशांश देता पण त्यापेक्षा महत्वाच्या आणि आवश्यक
बाबींकडे म्हणजेच न्याय, दया आणि प्रामाणिकपणा (जे तुम्ही सोडलेले आहे)
दुर्लक्ष करता. दशांशासोबत या गोष्टी पण तुम्ही करायला हव्या होत्या. 24 अहो,
आंधळया वाटाडयांनो, तुम्ही डास गाळून काढता आणि उंट गिळून टाकता.
25 अरे कपटी शास्त्र्यांनो, परूश्यांनो तुमच्यावर हाय हाय! तुम्ही ताट व प्याला
बाहेरून चकाचक करता पण आतून मात्र ती जुलूम व असंयम यांनी भरलेली
आहेत. 26 आंधळया परूश्यांनो! प्रथम प्याला व ताट याचा आतील भाग स्वच्छ
करा, म्हणजे ती बाहेरून देखील स्वच्छ होतील. 27 कपटी शास्त्र्यांनो आणि
परूश्यांनो, तुमच्यावर हाय-हाय! तुम्ही चुना लावलेल्या कबरांसारखे आहात,
ज्या बाहेरून सुंदर दिसतात, पण आत हाडांनी व सर्व प्रकारच्या घाणीने
भरलेल्या आहेत. 28 याचप्रकारे तुम्ही लोक बाहेरून तर लोकांना नीतिमान
दिसता पण आतून मात्र कपट व अनीतिने भरलेले आहात. 29 अरे कपटी
शास्त्र्यांनो, परूश्यांनो, तुम्ही संदेष्टयांच्या कबरा बांधता आणि नीतिमानाच्या
कबरा सजवता 30 आणि म्हणता की जर आम्ही आपल्या पूर्वजांच्या दिवसात
असता तर, संदेष्टयांच्या हत्येत त्याचे साथीदार झाले नसतो; 31 यावरून तुम्ही
आपली साक्ष स्वतःच देता की, तुम्ही संदेष्टयांच्या घातकांचे व हत्याऱ्यांचे पुत्र
आहात. 32 तेव्हा तुम्ही आपल्या पूर्वजांच्या पापांचे मडके पूर्णप्रकारे भरून
टाका. 33 अरे सापांनो, सापाच्या पिलांनो, तुम्ही नरकाच्या दंडापासून कसे
वाचू शकाल? तुम्ही नरक दंड कसा चुकवाल? 34 म्हणून पाहा, मी तुमच्याकडे
संदेष्टे आणि ज्ञानी व शास्त्री यांना पाठवत आहे आणि तुम्ही त्यांच्यापैकी
अनेकांना मारून टाकाल, वधस्तंभावर खिळाल आणि अनेकांना आपल्या
सभेत फटके माराल आणि एका नगरातून दुसऱ्या नगरात त्यांना हाकलत
राहाल, त्याचा पाठलाग कराल. 35 यासाठी की नीतिमान हाबेल याच्या
रक्तापासून वेदी व पवित्रस्थान याच्यामध्ये ज्याचा तुम्ही प्राण घेतला होता,

तो बरख्याचा पुत्र जखऱ्या याच्या रक्तपातापर्यंत जितक्या नीतिमानांचे रक्त
पृथ्वीवर पाडण्यात आले आहे, त्या सर्वांचा दोष तुमच्यावर यावा. 36 मी
तुम्हांला खरे-खरे सांगतो की या सर्व गोष्टी या वेळी असलेल्या लोकांवर येतील.
37 यरूशलेमे, हे यरूशलेमे, तू जी संदेष्टयांना मारून टाकते आणि जे तुझ्याकडे
पाठवले गेले त्यांना दगडमार करतेस, कितीदा तरी माझी अशी इच्छा होती
की ज्याप्रकारे कोंबडी आपल्या पिलांना आपल्या पंखाखाली संरक्षण देते,
एकवटते; तसेच मी सुद्धा तुझ्या लेकरांना एकवटावे, पण तुझी तशी इच्छाच
नव्हती! 38 पाहा, तुमचे घर तुमच्यासाठी भकास सोडले जात आहे, 39 कारण
मी तुम्हांला सांगतो आतापासून जोपर्यंत तुम्ही असे म्हणत नाही की, "प्रभूंच्या
नांवाने येणारा तो धन्यवादित असो," तोपर्यंत तुम्ही मला पाहणारा नाही, मी
तुमचा दृष्टीस पडणारच नाही.

24 1 जेव्हा येशू प्रार्थना भवनाच्या बाहेर निघत होते तेव्हा त्याचे शिष्य
त्यंाच्याजवळ येऊन त्यांना प्रार्थना भवनाची इमारत दाखवू लागले.
2 येशू त्यांना म्हणाले, "तुम्ही हे सर्व पाहात नाही काय? मी तुम्हांला खरे
सांगतो की, येथे असा कोणताच दगड नाही जो काढून फेकला जाणार नाही.
3 जेव्हा येशू जैतुनाच्या डोंगरावर बसले होते तेव्हा शिष्य एकांतात येऊन
त्यांना म्हणाले, "आम्हांला सांगा की हे सर्वकाही केव्हा होईल? आपल्या
येण्याचे तसेच या जगाच्या समाप्तीची चिन्हे काय असतील?" 4 येशूंनी त्यांना
उत्तर देऊन म्हटले, "तुम्हांला कोणी फसवू नये, धोका देऊ नये म्हणून सावध
असा. 5 माझ्या नांवाने पुष्कळ लोक येऊन "मी ख्रिस्त आहे" असे बोलून
अनेकांना फसवतील. 6 तुम्ही युद्ध व युद्धाच्या अफवा ऐकाल. पाहा, तुम्ही
घाबरून जाऊ नका. कारण या सर्व गोष्टी होणे अवश्य आहे. तरीपण समाप्ती
इतक्या लवकर होणार नाही. 7 कारण एक देश दुसऱ्या देशाविरूद्ध आणि
एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राविरूद्ध उठून उभा होईल. ठिकठिकाणी दुष्काळ आणि
भुकंप होतील. 8 या सर्व गोष्टी जणूकाही एखादया गर्भवती स्त्रीच्या प्रसूति
पिड़ेसारख्या होतील; हाच वेदनांचा प्रारंभ होय. 9 तेव्हा ते तुमचा छळ
करण्यासाठी न्यायालयात पाठवतील आणि मारून सुद्धा टाकतील. माझ्या
नांवामुळे सर्व देश तुमचा द्वेष करतील. 10 अनेक लोक त्यावेळी अडखळतील,

एक दुसऱ्यांना धोका देऊन फसवतील आणि एकमेकांचा द्वेष करतील. 11 अनेक
खोटे संदेष्टे उठतील आणि अनेकांना फसवतील 12 अनुशासन-हीनता वाढीस
लागल्यामुळे अनेक लोकांचे प्रेम थंडावेल. 13 परंतु जो शेवटपर्यंत टिकून राहील
तोच तरेल. आणि राज्याची ही सुवार्ता सर्व जगात गाजवली जाईल यासाठी
की सर्व राष्ट्रांना साक्ष व्हावी 14 आणि तेव्हा जगाचा शेवट होईल. 15 म्हणून
जेव्हा तुम्ही ओसाड करणारा अमंगळ पदार्थ पवित्रस्थानात उभा असलेला
पाहाल, ज्याच्याविषयी दानीएल संदेष्टयाने सांगितले होते (वाचकाने हे
ध्यानात आणावे). 16 त्यावेळी यहूदीयातील लोकांनी डोंगरात पळून जावे.
17 जो धाब्यावर असेल त्याने आपल्या घरातून काहीही घेण्यासाठी खाली
उतरू नये. 18 जे शेतात असतील त्यानी तुझे वस्त्र घेण्यासाठी घरी परत येऊ
नये. 19 त्यांच्यावर हाय! ज्याच्याजवळ त्या दिवसांत अंगावर पिणारी मुले व
लहान शिशु आणि गरोदर स्त्रिया असतील. 20 हे सर्व तुम्हांला हिवाळयात
किंवा शब्बाथ दिवशी सहन करावे लागू नये म्हणून तुम्ही तशी प्रार्थना करा.
21 जगाच्या प्रारंभापासून आतापर्यंत झाले नाही आणि पुढे कधीच होणार
नाही असे मोठे संकट, पीडादायक वेळ येणार आहे. 22 जर ते दिवस कमी केले
नसते तर कोणताच मनुष्य वाचू शकला नसता, त्याचा बचाव झाला नसता.
23 त्यावेळी जर तुम्हांला कोणी म्हणेल की, पाहा ख्रिस्त येथे आहे किंवा तेथे
आहे, तर कोणाचे सुद्धा खरे मानू नका. 24 कारण खोटे ख्रिस्त व खोटे संदेष्टे
उठतील आणि मोठी चिन्हे व अद्भुते दाखवतील यासाठी की संभव असल्यास
निवडलेल्यांना, विश्वासणाऱ्यांना देखील फसवावे. 25 मी तुम्हांला आधीपासूनच
जागृत व सावध केलेले आहे. 26 म्हणून जर ते तुम्हांला म्हणतात की, "पहा,
तो जंगलात आहे तर त्याचा भरंवसा करू नका. 27 ज्याप्रमाणे वीज पूर्वेकडून
निघून पश्चिमेपर्यंत चकाकत जाते त्याचप्रमाणे मनुष्याच्या पुत्राचे आगमन
होईल. 28 कारण जेथे प्रेते असतील तेथे गिधाडे जमतील. 29 त्या संकटातील
दिवसानंतर सूर्य अंधकारमय होईल, चंद्र प्रकाश देणार नाही; आकाशातील तारे
खाली पडतील आणि आकाशाच्या शक्त्या व बळे हालवली जातील. 30 तेव्हा
मनुष्याच्या पुत्राच्या येण्याचे चिन्ह आकाशात प्रगट होईल. पृथ्वीवरील सर्व
लोक शोक करतील, ते परमेश्वराच्या पुत्राला आकाशातल्या ढगावर पराक्रमाने
व मोठया वैभवाने येतांना पाहतील. 31 ते आपल्या स्वर्गदूतांना कर्ण्याच्या/

तुरहीच्या, महानादाबरोबर पाठवतील, ते त्यांच्या निवडलेल्यांना आकाशाच्या
एका सीमेपासून दुसऱ्या सीमेपर्यंत आणि चारही दिशाकडून जमा करतील.
32 आता अंजिराच्या झाडापासून या दृष्टांताचा अर्थ शिका जेव्हा याची उहाळी
कोमल असली, तिला पाने फुटू लागली म्हणजे तुम्हांला समजते की आता
उन्हाळा जवळ आला आहे. 33 त्याचप्रकारे जेव्हा तुम्ही या सर्व गोष्टी होतांना
पाहाल तेव्हा तो जवळ अगदी दाराशीच आहे असे समजा. 34 मी तुम्हांला
खचित सांगतो की, हे सर्व पूर्ण होईपर्यंत ही पिढी संपणारच नाही. 35 आकाश
आणि पृथ्वीचा अंत होईल परंतु माझी वचने पूर्ण झाल्याशिवाय राहणारच
नाहीत. 36 परंतु त्या दिवसाविषयी व त्या क्षणाशिवाय, स्वर्गातील दिव्यदूतांना
आणि पुत्राला सुद्धा ठाऊक नाही, केवळ माझ्या पित्यांनाच त्याविषयी माहित
आहे. 37 परंतु जसे नोहाच्या दिवसात होते तसेच मनुष्याच्या पुत्राच्या
आगमनाच्या वेळी होईल. 38 जोपर्यंत नोहाने जहाजात प्रवेश केला नाही
तोपर्यंत जलप्रलयाच्या पूर्वीच्या दिवसात, लोक जसे खातपीत होते, लग्न करून
घेण्यात व देण्यात मग्न होते 39 आणि जलप्रलय येऊन त्या सर्वांना वाहवून
नेईपर्यंत त्यांना कळलेच नाही की काय होणार आहे. तसेच मनुष्याच्या पुत्राचे
देखील येणे होईल. 40 त्यावेळी शेतात दोन लोक असतील; एक घेतला
जाईल व एक सोडून दिला जाईल. 41 दोन व्यक्ती जात्यावर दळत असतील;
एक घेतला जाईल आणि दुसरा ठेवला जाईल. 42 म्हणून सतर्क आणि जागृत
असा कारण तुम्हाला ठाऊक नाही की तुमचे प्रभु कोणत्या दिवशी येतील.
43 परंतु असे समजा की जर घराच्या मालकाला ठाऊक असते की रात्री चोर
कोणत्या वेळी येईल, तर तो जागृत राहील आणि तुझे घर चोराला फोडू देणार
नाही. 44 म्हणून तुम्ही देखील सिद्ध आणि तयार असा, कारण मनुष्याचा पुत्र
अशा वेळी येईल. ज्या वेळेची तुम्ही कल्पना आणि आशा सुद्धा करू शकत
नाही. 45 प्रामाणिक आणि बुद्धीमान दास कोण असेल? तोच ना, ज्याच्या
मालकाने त्याला घराचा प्रबंधक नेमलेले आहे यासाठी की त्यांना योग्य वेळी
त्याने खावयाला भोजन दयावे. 46 तोच सेवक आशीर्वादीत आहे ज्याचा मालक
त्याला तसेच करतांना पाहील. 47 मी तुम्हांला निश्चित सांगतो की तो त्या
दासाला आपल्या सर्व कारभारावर आणि धनसंपत्तीवर अधिकारी म्हणून
नेमील. 48 परंतु जर तो दास वाईट असेल आणि मनात असे म्हणत असेल की,

माझ्या मालकाला येण्यास उशीर आहे. [49] आणि तो आपल्या सोबती दासांना
मारू लागला आणि दारूडयांबरोबर खाईलपिईल-झिंगेल, [50] त्यावेळी तो ज्या
दिवसाची वाट पाहत नसेल अशा एका दिवशी आणि त्याला माहित नसलेल्या
घटकेला त्याचा मालक येईल तेव्हा तो [51] त्याला कठोर शिक्षा देईल आणि
त्याचा वाटा कपटयांबरोबर असेल जेथे रडणे व दातांचे खाणे चालेल.

25 [1] तेव्हा स्वर्गाचे राज्य त्या दहा कुमारींसारखे होईल, त्या दिवे
घेऊन वराला भेटायला गेल्या. [2] त्यापैकी पाच मूर्ख होत्या व पाच
शहाण्या होत्या. [3] मूर्खांनी दिवे घेतले पण त्यात बरोबर तेल घेतले नाही.
[4] परंतु शहाण्यांनी आपल्या भांडयात तेल सुद्धा घेतले. [5] जेव्हा वराला
उशीर झाला तेव्हा त्या सर्वांना डुलक्या आल्या व त्या झोपल्या. [6] मध्यरात्री
मोठा गाजा-वाजा झाला की पाहा वर येत आहे, त्याला भेटायला लवकर
चला. [7] तेव्हा सर्व कुमारी उठून आपतुझे दिवे नीट करू लागल्या. [8] मूर्खांनी
शहाण्यांना म्हटले, "आमचे दिवे विझत चालले आहेत, कृपया आपआपल्या
तेलातून आम्हांला थोडे दया. [9] परंतु शहाण्यांनी उत्तर दिले, "नाही, आम्ही
देणार नाही, कारण जर आम्ही तुम्हांला थोडे तेल दिले तर, आपल्या सर्वांना
ते पुरणार नाही; तुम्ही बाजारात जाऊन तेल विकणाऱ्यांकडून विकत घेतलेले
बरे. [10] मग जेव्हा त्या तेल विकत घ्यायला गेल्या तेव्हा वर येऊन पोहचला;
ज्या तयार होत्या त्या वराबरोबर आत लग्नास गेल्या आणि दार बंद करण्यात
आले. [11] यानंतर दुसऱ्या कुमारी येऊन म्हणाल्या, "प्रभुजी आमच्यासाठी दार
उघडा." [12] पण त्याने उत्तर दिले, मी तुम्हांला अगदी खरे सांगतो की मी
तुम्हांला ओळखत नाही. [13] यास्तव तुम्हांला तो दिवस व ती वेळ ठाऊक
नाही जेव्हा मनुष्याचा पुत्र येईल म्हणून तुम्ही जागृत रहा, तयार रहा.
[14] कारण स्वर्गाचे राज्य अशा एका मनुष्यासारखे आहे ज्याने दूर देशाची यात्रा
करण्यापूर्वी आपल्या नोकरांना बोलावून आपली संपत्ती सोपवून दिली (आणि
त्यांना काही जबाबदारी दिली). [15] त्यांपैकी प्रत्येकाला त्याच्या योग्यतेनुसार,
एकाला पाच हजार दुसऱ्याला दोन हजार व तिसऱ्याला एक हजार रूपये दिले;
यानंतर लगेच तो परदेशी गेला. [16] याप्रकारे ज्याला पाच हजार रूपये मिळाले
होते त्याने त्यावर व्यापार केला आणि पाच हजार रूपये आणखी मिळवले.

17 तसेच ज्याला दोन हजार रूपये मिळाले होते त्याने त्यावर आणखी दोन
हजार रूपये मिळाले मिळवले. 18 परंतु ज्याला एक हजार रूपये मिळाले होते
त्याने मालकाचे पैसे जमीन खणून तिच्यात लपवून ठेवले. 19 मग बराच काळ
झाल्यानंतर मालक परत आला आणि त्याने येऊन त्या प्रत्येकाचा हिशेब घेतला.
20 ज्याला पाच हजार रूपये मिळाले होते त्याने आणखी पाच हजार आणून
दिले आणि म्हणाला, "मालक पाहा, मी पाच हजार आणखी कमवले. 21 मालक
बोलला, "शाबास, भल्या दासा! तू थोडया गोष्टीत विश्वासू राहिलास, मी तुझी
पुष्कळांवर अधिकारी म्हणून नेमणूक करीन, ये आपल्या मालकाच्या आनंदात
तू देखील सहभागी होऊन जा" 22 ज्याला दोन हजार रूपये मिळाले होते त्याने
सुद्धा येऊन म्हटले, "मालक आपण मला दोन हजार रूपये दिले होते, त्यावर
मी दोन हजार आणखी मिळवले. 23 मालक त्याला म्हणाला, "शाबास, भल्या
दासा, तू थोडया गोष्टीत विश्वासू राहिलास, मी तुझी पुष्कळावर अधिकारी
म्हणून नेमणूक करीन. ये आपल्या मालकाच्या आनंदात तू पण सहभागी हो."
24 तेव्हा ज्या नोकराला एक हजार रूपये मिळाले होते तो येऊन म्हणाला,
"मालक, मला ठाऊक आहे की तुम्ही कठोर अंतःकरणाचे मनुष्य आहा, जेथे
तुम्ही पेरिले नाही तेथे कापणी करता व जेथे पसरून ठेवले नाही तेथे गोळा
करता. 25 म्हणून मला भीति वाटली आणि मी ते रूपये, जे आपण मला दिले
होते, जमीन खणून त्यात लपवून ठेवले; घ्या, हे तुमचे रूपये. 26 त्यांच्या
मालकाने उत्तर देऊन म्हटले, हे दुष्ट आणि आळशी दासा, तुला ठाऊक होते
की जेथे मी पेरत नाही तेथेच कापतो, जेथे पसरून ठेवले नाही तेथूनच गोळा
करतो. 27 यासाठी तू हे पैसे सावकाराला दयायला हवे होते म्हणजे परत
आल्यावर ते मला व्याजासकट परत मिळाले असते. 28 म्हणून याच्याकडून ते
पैसे घ्या आणि ज्याच्याकडे दहा हजार रूपये आहेत त्याला दया. 29 यासाठी
की ज्याच्याजवळ आहे त्याला आणखी दिले जावे म्हणजे त्याला भरपूर होईल.
परंतु ज्याच्याजवळ नाही, त्याच्याजवळ जे काही आहे ते सुद्धा त्याच्यापासून
काढून घेतले जाईल. 30 या निरूपयोगी नालायक दासाला घोर अंधकारात
फेकून दया. तेथे रडणे व दातखाणे चालेल. 31 ज्यावेळी परमेश्वरांचा पुत्र
आपल्या संपूर्ण वैभवात आपल्या स्वर्गदूतांबरोबर येतील त्यावेळी ते आपल्या
गौरवी सिंहासनावर विराजमान होतील. 32 सर्व राष्टे्रं त्यांच्यासमोर

नमवली जातील. ज्याप्रमाणे मेंढपाळ मेंढरांना बकाऱ्यांपासून वेगळे करतो
त्याचप्रमाणे ते त्यांना वेगळे करतील. 33 ते मेंढरांना आपल्या उजवीकडे व
बकऱ्यांना आपल्या डावीकडे ठेवतील. 34 तेव्हा राजे आपल्या उजवीकडील
लोकांना म्हणतील, "अहो, माझ्या पित्याचे आशीर्वादीत व धन्य लोकहो, या, जे
राज्य जगाच्या स्थापनेपासून तयार केले गेले आहे त्यात प्रवेश घ्या; 35 कारण
मी भुकेला होतो आणि तुम्ही मला खायला दिले, मी तान्हेला होतो तेव्हा
तुम्ही मला प्यायला पाणी दिले. मी अनोळखी होतो तेव्हा तुम्ही माझे स्वागत
केले. 36 मी उघडा होतो तेव्हा तुम्ही मला वस्त्र दिले, मी आजारी होतो तेव्हा
तुम्ही माझी भेट घेतली. मी तुरूंगात होतो आणि तुम्ही मला भेटायला आला.
37 तेव्हा नीतिमान असे म्हणून त्यांना उत्तर देतील की, "प्रभुजी, आम्ही केव्हा
आपल्याला भुकेलेपाहून खायला दिले होते? तान्हेले पाहून पाणी दिले होते?
38 आम्ही केव्हा आपल्याला पटके पाहून घराच्या आत घेतले होते? किंवा उघडे
पाहून वस्त्र दिले? 39 किंवा केव्हा आपल्याला आजारी पाहून किंवा तुरूंगात बंद
असतांना आपली भेट घेतली? 40 तेव्हा राजे त्यांना उत्तर देतील, मी तुम्हांला
निश्चित सांगतो की, जे काही तुम्ही या लहानातल्या लहान भावांपैकी एकाला
केले तेच मला देखील केलेले आहे. 41 तेव्हा ते आपल्या डावीकडील लोकांना
म्हणतील, "अहो, शापग्रस्त लोकहो, माझ्यापुढून निघून जा आणि सैतान व
त्याचे दूत यांच्यासाठी जो अनंत अग्नि आहे त्यात जा." 42 कारण मी भुकेला
होतो आणि तुम्ही मला खायला दिले नाही. मी तान्हेला होतो आणि तुम्ही
मला पाणी दिले नाही. 43 मी परका होतो आणि तुम्ही मला घरात घेतले नाही,
मी उघडा होतो आणि तुम्ही मला वस्त्र दिले नाही. आजारी आणि कैदेत होतो
आणि तुम्ही माझ्याकडे लक्ष दिले नाही मला भेटला नाही. 44 तेव्हा ते उत्तर
देतील की हे प्रभुजी आम्ही केव्हा आपल्याला भुकेले, तान्हेले, परके, उघडे,
आजारी किंवा कैदेत पाहिले आणि आपली सेवा केली नाही? 45 तेव्हा ते त्यांना
उत्तर देतील, "मी तुम्हांला खातरीने आणि आश्वस्त होऊन सांगतो की जे काही
तुम्ही या लहानातल्या लहान एकासाठी केले नाही तेच माझ्यासाठी देखील केले
नाही." 46 असे लोक अनंत दंड भोगतील परंतु नीतिमान अनंत जीवनात प्रवेश
करतील.

26 1 येशूंनी हे बोलणे समाप्त केल्यानंतर आपल्या शिष्यांना म्हटले,
2 "तुम्हांला ठाऊक आहे की दोन दिवसानंतर वल्हांडणाचा सण आहे
आणि मनुष्याचा पुत्र वधस्तंभावर खिळला जाईल. 3 तेव्हा मुख्य याजक,
शास्त्री आणि वडील मंडळी, कयफा नावाच्या प्रमुख याजकाच्या महालात
एकत्र जमले. 4 कपटाने येशूंना धरून मारण्याची योजना त्यानी तेथेच तयार
केली. 5 परंतु ते म्हणाले, सणाच्या दिवशी नाही कारण त्यामुळे लोकांत गडबड
माजू शकते. 6 ज्यावेळी येशू शिमोन कुष्ठरोग्याच्या घरी बेनाथीत होते, 7 एक
स्त्री अलाबास्त्र कुपीत सुगंधी तेल घेऊन तेथे आली आणि जेव्हा येशू भोजनाला
बसले होते तेव्हा तिने त्यांच्या मस्तकावर ते सुगंधी तेल ओतले. 8 शिष्य
रागावून कुरकुर करू लागले, की हे इत्र याप्रकारे नाश का केले गेले? 9 हेच इत्र
विकून पुष्कळ पैसे आले असते आणि ते गरिबांना देता आले असते. 10 येशूंनी
त्यांच्या मनातली गोष्ट जाणून त्यांना म्हटले, "या स्त्रीला का त्रास देत आहात?
हिने तर माझ्यासाठी हे सर्वकाही केलेले आहे. 11 गरीब लोक तुमच्याबरोबर
नेहमी राहतील पण मी तुमच्याबरोबर राहणार नाही. 12 तिने जे सुगंधी
तेल माझ्या शरीरावर ओतले आहे ते माझ्या उत्तरक्रियेसाठी केले आहे. 13 मी
हे सत्य तुम्हांला सांगतो की जगात जेथे कोठे ही सुवार्ता गाजवली जाईल
तेथे तेथे या स्त्रीने जे काही केले ते देखील हिच्या स्मरणार्थ सांगितले जाईल.
14 तेव्हा यहूदा इस्कर्योत जो त्या बारांपैकी एक होता, मुख्य याजकाकडे जाऊन
बोलला, 15 "मी स्वतः येशूंना धरून तुमच्या हाती दिले म्हणजे तुम्ही मला काय
दयाल?" त्यानी त्याला चांदीची तीस नाणी देण्याचे मान्य करून ते त्याला
दिले. 16 तेव्हापासूनच तो येशूंना धरून देण्याची संधी पाहू लागला. 17 नंतर
बेखमीर भाकरीच्या सणाच्या पहिल्या दिवशी शिष्य येशूंजवळ येऊन म्हणू
लागले, "वल्हांडणाच्या भोजनाची तयारी आम्ही कोठे करावी अशी आपली
इच्छा आहे?" 18 येशू म्हणाले, "शहरात जाऊन अमुक एका माणसाकडे जाऊन
त्याला सांगा की गुरू म्हणतात माझी वेळ जवळ आली आहे; मी आपल्या
शिष्यांसोबत तुमच्या घरी वल्हांडण सण साजरा करतो. 19 शिष्यांनी येशूंनी
म्हटल्याप्रमाणे केले आणि वल्हाडणांची तयारी केली. 20 संध्याकाळी येशू
आपल्या बारा शिष्यांसह भोजनास बसले. 21 जेव्हा ते खात होते तेव्हा येशू
म्हणाले, "मी तुम्हाला खचित खचित सांगतो की तुमच्यातील एक मला धोका

देईल." 22 सर्व शिष्य दुःखी झाले आणि प्रत्येकजण त्यांना विचारू लागला की,
"प्रभुजी, काय तो मी आहे?" 23 तेव्हा येशूंनी उत्तर दिले, "ज्याने माझ्याबरोबर
ताटात हात घातला आहे, तोच मला धरून देईल. 24 जसे लिहिले आहे तसेच
मनुष्याच्या पुत्राशी होईल, परंतु हाय त्याच्यावर, ज्याच्याद्वारे मनुष्याचा पुत्र
धरून दिला जाईल. त्या माणसाने जन्म घेतला नसता तर ते त्याला बरे झाले
असते." 25 तेव्हा यहूदा ज्याने येशूंना फसवले होते त्याने विचारले, "स्वामी, मी
तर नाही ना?" 26 येशू म्हणाले, "तू स्वतःच मान्य केले आहेस" येशूंनी आभार
मानून भाकरीचे तुकडे करून शिष्यांना देत म्हटले, "घ्या खा, हे माझे शरीर
आहे 27 आणि मग येशूंनी प्याला घेतला व उपकारस्तुति करून तो त्यांना दिला
व म्हटले, "तुम्ही सर्व यातून प्या, 28 हे नव्या कराराचे रक्त आहे जे पापांची
क्षमा होण्यासाठी पुष्कळांसाठी ओतले जात आहे. 29 परंतु मी तुम्हांला सांगतो
की आपल्या पित्याच्या राज्यात, तुमच्याबरोबर नवा द्राक्षारस पिईपर्यंत यापुढे
मी द्राक्षाचा हा रस पिणारच नाही. 30 नंतर भजन गाऊन ते सर्व जैतूनाच्या
डोंगरावर निघून गेले. 31 तेव्हा येशू त्यांना म्हणाले, "माझ्यापुढे आज रात्री
तुम्ही सर्व अडखळाल कारण लिहिले आहे की, मी मेंढपाळाला मारीत आणि
कळपातील मेंढरे पांगून इकडे तिकडे जातील. 32 परंतु मी उठल्यानंतर तुमच्या
आधी गालीलात जाईन. 33 पेत्राने उत्तर दिले, "आपल्याविषयी सर्व अडखळले
तरी मी कधीच अडखळणार नाही." 34 येशू त्याला म्हणाले, "मी तुला सत्य
सांगतो की याच रात्री कोंबडा आखण्यापूर्वी तू मला तीन वेळा नाकारशील."
35 पेत्राने उत्तर दिले, "मला मरावे लागले तरी, मी आपल्याला नाकारणार
नाही." सर्व शिष्यांनी देखील तसेच म्हटले. 36 तेव्हा येशू त्यांच्याबरोबर
गेथशेमाने नांवाच्या ठिकाणी आले आणि त्यांना म्हणाले, "तुम्ही लोक येथेच
थांबा". 37 आपल्या बरोबर येशू पेत्राला आणि जब्दीच्या दोन्ही मुलांना घेऊन
गेले. त्याच ठिकाणी त्याचे अंतःकरण जड व अति दुःखी झाले. 38 तेव्हा येशू
त्यांना म्हणाले, "माझे अंतःकरण फारच खिन्न आहे आणि असे वाटत आहे
की, जणू माझा प्राणच निघतो आहे की काय! येथेच थांबा आणि जागे रहा."
39 मग ते थोडेसे पुढे गेले तेव्हा पालथे होऊन त्यानी अशी प्रार्थना केली, "हे
माझ्या अब्बा, बापा शक्य असेल तर हा प्याला माझ्यावरून टळून जावो;
तरीपण माझ्या इच्छेप्रमाणे नव्हे तर आपल्या इच्छेप्रमाणे होवो." 40 येशू

शिष्यांकडे आले आणि त्यानी शिष्यांना झोपलेले पाहिले आणि पेत्राला म्हणाले,
"हे काय, तुम्ही माझ्याबरोबर एक तास देखील जागू शकत नाही काय?"
41 तुम्ही परीक्षेत पडू नये म्हणून जागे रहा आणि पित्यांकडे प्रार्थना करा;
आत्मा तर उत्सुक आहे पण शरीर अशक्त आहे." 42 दुसऱ्यांदा येशू पुढे गेले
आणि प्रार्थनेत म्हणाले, "हे माझ्या बापा, मला हा प्याला प्यावाच लागणार
असेल तर आपल्या इच्छेप्रमाणे होवो." 43 येशूंनी पुन्हा येऊन त्यांना झोपतांना
पाहिले कारण त्याचे डोळे जड झाले होते. 44 त्यांना सोडून येशू पुन्हा पुढे
गेले आणि तिसऱ्यांदा त्यानी प्रार्थना केली. 45 परत आल्यावर ते आपल्या
शिष्यांना म्हणाले, "तुम्ही अजून सुद्धा झोपतच आहात काय? पाहा, वेळ
जवळ आलेली आहे आणि मनुष्यांचा पुत्र पापी लोकांच्या हाती धरून दिला
जात आहे. उठा चला, पहा मला धरून देणारा जवळ आलेला आहे." 47 येशू
असे बोलतच आहे इतक्यात पहा, अचानक बारांपैकी यहूदा तेथे पोहचला.
त्याच्याबरोबर लोकांची एक मोठी गर्दी होती. त्यांच्या हातात तरवारी व
सोटे होते. हे लोक मुख्य याजक व लोकांचे वडील यांच्यातर्फे पाठवले गेले
होते. 48 धोका देणाऱ्याचे त्यांना आधीच अशी खूण सांगून ठेवली होती की, मी
ज्याचे चुंबन घेईन तो हाच आहे, त्याला धरा. 49 लगेच तो येशूंजवळ पोहचला
आणि त्याचे चुंबन घेत म्हणाला, "सलाम, गुरूजी". 50 येशू म्हणाले, मित्रा, तू
येथे का आला आहेस, ज्यासाठी आला आहे ते कर. तेव्हा त्यानी जवळ येऊन
येशूंबरोबर जे होते त्यांच्यातील एकाने हात लांब करून तरवार चालवली
ज्यामुळे प्रमुख याजकाच्या दासाचा कान छाटला गेला. 51 तेव्हाच येशूंबरोबर
जे होते त्यांच्यातील एकाने हात लांब करून तरवार चालवली ज्यामुळे प्रमुख
याजकाच्या दासाचा कान छाटला गेला. 52 तेव्हा येशू त्याला म्हणाले, "आपली
तरवार परत जागी घाल कारण तरवारीने मारणारे सर्वजण तरवारीनेच
मारले जातील. 53 तुला असे वाटते काय की मी जर पित्यांना मागितले तर से
आताच्या आता मला परमेश्वरदूतांच्या बारा सैन्यांपेक्षा अधिक पाठवून देणार
नाही? 54 परंतु जर असे झाले तर, जसे पवित्र वचनात लिहिले आहे ते कसे पूर्ण
होईल? 55 त्याच वेळी येशू लोकांना म्हणाले, "जसे एखादया चोर लुटारूला
धरतात तसे तुम्ही मला तरवारी व सोटे घेऊन धरायला आला आहात काय?
प्रार्थना भवनात मी दररोज तुम्हांला शिकवत होतो, तेव्हा तुम्ही मला धरले

नाही. 56 पण हे सर्व यासाठी होत आहे की, संदेष्टयांनी जे काही लिहिले होते ते
सर्व पूर्ण व्हावे." तेव्हा सर्व शिष्य येशूंना सोडून पळून गेले. 57 ज्या लोकांनी
येशूंना धरले ते त्यांना प्रमुख याजक कयफा याच्याकडे जेथे शास्त्री व वडील
एकत्रित होते तेथे घेऊन गेले. 58 परंतु पेत्र मात्र काही दूरवर प्रमुख याजकाच्या
महालापर्यंत जाऊन नोकराबरोबर बसला की पुढे काय होते ते पाहावे. 59 प्रमुख
याजक, वडील आणि पूर्ण सभा त्यांना मारून टाकण्याच्या हेतूने येशूंविरूद्ध
खोटया साक्षीच्या शोधात होते. 60 बरेच खोटे साक्षीदार पुढे आले पण तरी
देखील सत्य समोर आले नाही. 61 शेवटी दोन लोक पुढे येऊन म्हणाले, "याने
म्हटले होते की मी परमेश्वराचे मंदिर मोडून ते तीन दिवसांत पुन्हा बांधण्यास
समर्थ आहे. 62 तेव्हा प्रमुख याजकाने उभे होऊन येशूंना म्हटले, "तू काहीच
उत्तर देत नाहीस काय? हे लोक तुझ्याविरूद्ध साक्ष देत आहेत, वाटेल ते बोलत
आहेत? परंतु येशू शांतच राहिले. 63 तेव्हा प्रमुख याजकाने त्यांना म्हटले, "मी
तुला जिवंत परमेश्वराची शपथ घालतो, जर तू परमेश्वराचा पुत्र ख्रिस्त आहेतस
तर तसे आम्हांला सांग." 64 येशू त्याला म्हणाले, "होय, जसे आपण म्हटले
आहे तसेच. याहि पुढे मी तुम्हांला आणखी सांगतो की मनुष्याच्या पुत्राला
सर्वशक्तिमानाच्या अधिकार पदावर बसलेले आणि आकाशातील मेघावर
येतांना तुम्ही पाहाल." 65 यानंतर प्रमुख याजकाने आपली वस्त्रे फाडली व
म्हटले, "हा निंदा करत आहे, आता आम्हांला आणखी जास्त साक्षीदारांची
काय गरज आहे? 66 आता तर, तुम्ही स्वतः याच्या तोंडून हे सर्व ऐकलेले
आहे. तुम्हांला काय वाटते? तुमचा विचार काय आहे? त्यानी उत्तर देऊन
म्हटले, "हा मरणदंडास पात्र आहे." 67 तेव्हा ते येशूंच्या तोंडावर थुंकले व
त्यानी त्यांना बुक्क्या मारल्या आणि दुसऱ्यांनी थापडा मारून म्हटले, 68 "अरे
ख्रिस्ता, ओळख बरे आणि आम्हांला सांग की तुला कोणी मारले? 69 इकडे पेत्र
महालात बाहेर बसला होता; तेव्हा एक दासी तेथे येऊन त्याला म्हणाली, "तू
सुद्धा गालीलाच्या येशूंबरोबर होतास ना?" 70 परंतु पेत्राने सर्वांच्या समोर
नाकारून म्हटले, "तू काय बोलत आहेतस, ते मला ठाऊक नाही." 71 तेव्हा पेत्र
तेथून निघून बाहेर आला, तेव्हा एक दूसरी तरूण दासी त्याला तेथे पाहून
तेथील लोकांना म्हणाली, हा मनुष्य सुद्धा त्या नासोरी येशूंबरोबर होता.
72 परंतु पुन्हा त्याने शपथ वाहून नाकारून म्हटले, "मी त्या येशूंना ओळखत

नाही." [73] काही वेळाने तेथेच जवळ उभे राहणारे येऊन पेत्राला म्हणाले,
"खरोखर तू पण त्यातलाच आहेस कारण्सा तुझ्या बोलीवरून वाटते की तू सुद्धा
त्यांच्यापैकीच एक आहेस." [74] तेव्हा तो शपथ वाहून शाप देत म्हणाला, "मी
त्या मनुष्याला ओळखतच नाही. त्याच वेळी कोंबळा आरवला. [75] पेत्राला
येशूंची ती गोष्ट आठवली ती त्यानी म्हटली होती की कोंबडा आरवण्यापूर्वी तू
तीन वेळा मला नाकारशील आणि तो बाहेर जाऊन मोठया दुःखाने रडू लागला.

27 [1] सकाळ होताच सर्व मुख्य याजक आणि वडील मंडळी यांनी येशूंना
मारून टाकण्यासाठी आपसात सल्ला दिला. [2] त्यांना बांधल्यानंतर ते
त्यांना घेऊन पिलाताकडे गेले. [3] तेव्हा यहूदा ज्याने येशूंना धरून दिले होते,
येशूंना त्या लोकांनी पकडले आहे हे पाहून पस्तावला आणि स्वतःला शाप
देऊ लागला. प्रमुख याजकांना आणि वडीलांना त्याने चांदीची तीस नाणी
परत आणून म्हणाला, [4] "एका निर्दोष जिवाला धरून देऊन पाप मी केलेले
आहे, ते लोक त्याला म्हणाले, "आम्हांला याच्याशी काहीच करायचे नाही,
तू तुझे पाहात बस, आम्हांला त्याचे काय?" [5] त्याने प्रार्थना भवनात जाऊन
ती नाणी फेकून दिली आणि जाऊन स्वतःला फाशी लावून घेतली. [6] मुख्य
याजकांनी ती नाणी गोळा केली आणि म्हटले, "त्यांना दानपेटीत टाकणे योग्य
नाही कारण हे रक्ताचे मोल आहे." [7] त्यानी सल्लामसलत करून कुंभाराचे
शेत विकत घेतले यासाठी की तेथे परक्या लोकांना पुरले जावे [8] त्यामुळे
आजपर्यंत त्या शेताला रक्ताचे शेत असे म्हणतात. [9] तेव्हा यिर्मया संदेष्टयाने
सांगितलेले वचन पूर्ण झाले; एका व्यक्तिचे जे मूल्य ठरवले गेले होते ती तीस
चांदीची नाणी त्यानी घेतली. हे मुल्य सुद्धा इस्त्राएली लोकांनीच लावले होते.
[10] आणि जसा परमेश्वरबापांनी हुकुम केला होता, तसेच त्या पैशाने कुंभाराचे
शेत विकत घेतले. [11] येशू सुभेदाराच्या पुढे उभे राहिले; तेव्हा त्याने त्यांना
विचारले, "तू यहूदयांचा राजा आहेस काय? येशू त्याला म्हणाले, "तुम्ही
स्वतःच असे म्हणत आहात". [12] मुख्य याजक व वडीलांनी आरोप लावले पण
तरी सुद्धा त्यानी काहीच उत्तर दिले नाही. [13] तेव्हा पिलात त्यांना म्हणाला,
"तुझ्याविरूद्ध कितीतरी गोष्टीविषयी हे लोक साक्ष देत आहेत, हे तुला ऐकू येत
नाही काय?" [14] येशू त्यांना एकहि शब्द बोलले नाही, हे पाहून सुभेदाराला

त्याचे फार आश्चर्य वाटले. 15 त्या क्षणात लोकांच्या पसंतीप्रमाणे प्रत्येक वर्षी,
सुभेदार एका कैदयाला सोडून देत असे. 16 त्या वेळी तेथे बरब्बा नावाचा एक
खतरनाक कैदी होता. 17 म्हणून जेव्हा ते सर्व जमले तेव्हा पिलात त्यांना
म्हणाला, "मी तुमच्यासाठी कोणाला सोडून दयावे अशी तुमची इच्छा आहे
बरब्बाला किंवा ख्रिस्त म्हटलेल्या येशूला?" 18 त्याला ठाऊक होते की येशूंना
हेव्याने धरून त्यांच्या स्वाधीन केले गेले आहे. 19 जेव्हा तो न्यायासनावर
बसला होता तेव्हा त्याच्या पत्नीने त्याला निरोप पाठवला की, "या निर्दोष
नितिमान मनुष्याच्या बाबतीत काहीच वाईट करू नये कारण मी आज रात्री
स्वप्नात पाहिले की त्याच्यामुळे मला फार यातना झाल्या व मी अत्यंत पीडा
सहन केली. 20 परंतु मुख्य याजक व वडील वर्ग यांनी बरब्बाला वाचवून
घ्यावे आणि येशूंना मारून टाकावे म्हणून त्या सर्व लोकांची मने आपल्याकडे
वळवलीत. 21 सुभेदाराने त्यांना विचारले, "यो दोघातून कोणाला सोडून
दयावे, अशी तुमची इच्छा आहे? ते म्हणाले, "बरब्बाला". 22 पिलात त्यांना
म्हणाला, "मग ख्रिस्त म्हटलेल्या येशूचे मी काय करू?" त्या सर्वांनी उंच स्वरात
म्हटले, "त्याला वधस्तंभावर खिळून टाका." 23 सुभेदार म्हणाला, "का? त्याने
काय वाईट केले आहे?" अणि ते आणखी जास्त मोठया आवाजात ओरडले,
त्याला वधस्तंभावर खिळून टाका. 24 जेव्हा पिलाताने पाहिले की अधिकच
गडबड गोंधळ माजलेला आहे, आणि हा खटला आपल्या काबूत नाही तेव्हा
त्याने लोकांसमारे पाणी घेऊन हात धुऊन घेतले आणि म्हटले, "मी या निर्दोष
मनुष्याच्या रक्ताविषयी निर्दोष आहे; तुमचे तुम्हीच पाहात बसा. 25 "तेव्हा
सर्व लोकांनी उत्तर दिले, "याच्या रक्ताचा दंड आमच्यावर आणि आमच्या
पिढीवर म्हणजेच मुलांबाळावर असो. 26 तेव्हा त्याने त्यांच्यासाठी बरब्बाला
सोडले व येशूंना फटके मारून वधस्तंभावर खिळण्यासाठी सोपवून दिले.
27 तेव्हा सुभेदाराचे शिपाई येशूंना सुभेदाराच्या महालात घेऊन गेले आणि
त्यांच्या चारही बाजूला शिपाई जमा झाले. 28 त्याचे वस्त्र काढून त्यांच्या
अंगात किरमिजी झगा घातला गेला. 29 काटयांचा मुकुट तयार करून येशूंच्या
मस्तकावर ठेवला आणि हातात एक वेल दिला आणि त्यांच्यापुढे गुडघे
टेकून त्यांची थटट करत म्हणून लागले, "यहूदयांच्या राजा, नमस्कार! 30 ते
त्यांच्यावर थुंकले आणि तेच वेल घेऊन त्यांच्या मस्तकावर मारू लागले.

31 थटट केल्यावर त्यानी त्याचा झगा काढला, त्यानी त्याची वस्त्रे त्यांच्या
अंगात घातली आणि त्यांना वधस्तंभावर खिळण्यासाठी घेऊन चालू लागले.
32 बाहेर आल्यावर त्यानी शिमोन कुरेनी याला पकडले आणि त्याला वधस्तंभ
वाहण्यासाठी धरले. 33 जेव्हा ते कवटीच्या जागी म्हणजेच गुलगुथा येथे
पोहचले 34 तेव्हा त्यानी येशूंना पिण्यासाठी "पितमिश्रित दाक्षारस" प्यायला
दिला परंतु चाखल्यावर येशूंनी तो पिण्यास नकार दिला. 35 त्यानी येशूंना
क्रूसावर खिळले आणि चिठ्या टाकून त्यांची वस्त्रे आपसांत वाटून घेतली. तेव्हा
संदेष्टयाने म्हटलेले हे शब्द पूर्ण झाले की, त्यानी माझे वस्त्र आपसात वाटून
घेतले आणि माझ्या वस्त्रावर चिठठ्या टाकल्या. 36 तेथेच बसून ते त्याच्यावर
पहारा करत राहिले. 37 त्यानी येशूंच्या डोक्यावर हा दोषारोपाचा लेख
लावला, 38 "हा यहूदयांचा राजा येशू आहे". त्यावेळी येशूंबरोबर दोन डाकू
एक उजवीकडे व एक डावीकडे असे क्रूसावर खिळले, 39 आणि जे लोक त्यांच्या
जवळून जात होते, ते सर्व आपली डोकी डोलवीत त्यांची निंदा करत होते,
40 "तू जो प्रार्थना भवन मोडून, तीन दिवसात बांधणार होतास, आता आपल्या
स्वतःचा बचाव कर, जर तू परमेश्वराचा पुत्र आहेस तर क्रूसावरून खाली
उतर." 41 त्याचप्रमाणे मुख्य याजक व शास्त्री आणि वडील हे सर्वच थटट करत
म्हणाले, "त्याने दुसऱ्यांना वाचवले, पण त्याला स्वतःला वाचवता आले नाही,
42 जर तो इस्त्राएलाचा राजा आहे, तर त्याने आता क्रूसावरून खाली उतरावे
म्हणजे आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू. 43 तो परमेश्वरावर भरंवसा ठेवतो, हवे
असेल तर परमेश्वराने आता त्याला सोडवावे, कारण त्यानेच असा दावा केला
होता की तो परमेश्वराचा पुत्र आहे". 44 तसेच त्या दोन्ही चोरांनी जे त्यांच्या
बरोबर खिळलेले होते त्यानी सुद्धा येशूंनी तशीच निंदा केली. 45 यानंतर
दुपारपासून तिसऱ्या प्रहरापर्यंत पूर्ण देशभर घनघोर अंधार पडला. 46 सुमारे
तीन वाजता येशू ख्रिस्त उंच स्वरात मोठयाने आरेडून म्हणाले, "एली, एली,
लमा सबखथनी" म्हणजे माझ्या परमेश्वरा, माझ्या परमेश्वरा, आपण मला
का सोडून दिले?" 47 तेथे उभे असलेले काही लोक असे ऐकून म्हणाले, "हा
मनुष्य एलीयाला हाक मारत आहे." 48 लगेच एकाने धावून आंबेने भरलेला
स्पंज एका बोरून टोकावर ठेवून तो येशूंना चोखायला दिला. 49 बाकी लोक
म्हणाले, "त्याला ओरडू दया; आता आपण पाहू की, एलीया त्याला वाचवायला

येतो की नाही." 50 मग येशूंनी उंच आवाजात आरोही मारली आणि आपला
आत्मा त्यागून दिला. 51 त्याचवेळी लगेच, पवित्र स्थानातील पडदा वरपासून
खालपर्यंत फाटून त्याने दोन भाग झाले. पृथ्वी कापली, खडक फुटले. 52 थडगी
(कबर) उघडली आणि निजलेल्या अनेक संताची शरीरें पुन्हा उठवली गेली.
53 येशू पुनरूत्थानानंतर यरूशलेमेस गेले, जेथे अनेक लोकांनी त्यांना पाहिले.
54 सुभेदार आणि त्याच्याबरोबर पहारा करणारे दुसरे लोक, भूकंप आणि
दुसऱ्या घडलेल्या घटना पाहून अत्यंत भयभीत होऊन म्हणाले की, "खरोखर हा
परमेश्वराचा पुत्र होता". 55 तेथे पुष्कळ स्त्रिया दुरून हे सर्व पाहत होत्या. त्या
येशूंची सेवा करत गालीलाहून त्यांच्यामागे आल्या होत्या. 56 त्यांच्यापैकीच
मरीया मग्दालीया याकोब व योसेफ यांची आई मरीया व जब्दीच्या मुलांची
आई या होत्या. 57 संध्याकाळ झाल्यावर अरिमथाईतील योसेफ नावाचा एक
धनवान मनुष्य आला, तो येशूंचा शिष्य होता. 58 त्याने पिलाताकडे जाऊन
तयाला येशूंचे शरीर मागितले. तेव्हा पिलाताने हुकुम दिला की, त्याला येशूंचे
शरीर देण्यात यावे. 59 योसेफाने ते शरीर घेऊन स्वच्छ मलमलच्या कापडात
गुंडाळले, 60 ते त्याने खडकात खोदलेल्या आपल्या नव्या कबरेत ठेवले. त्या
कबरेच्या दाराला एक मोठी धोंड लावली आणि तो निघून गेला. 61 पण तेथे
कबरेसमोर मरीया मग्दालिया व दुसरी मरिया या बसलेल्या होत्या. 62 दुसऱ्या
दिवशी म्हणजे तयारीनंतरच्या दिवशी मुख्ययाजक व परूशी पिलाताकडे
येऊन म्हणू लागले की, 63 महाराज जिवंत असतांना तो धोकेबाज म्हणाला
होता की तीन दिवसानंतर मी उठेन, याची आम्हांला चांगलीच आठवण आहे.
64 म्हणून अशी आज्ञा करा की तीन दिवसापर्यंत कबरेचा बंदोबस्त केला जावा,
नाही तर त्याचे शिष्य त्याच्या शरीराला चोरून नेतील व तो मेलेल्यातून
उठला आहे अशी खबर पसरवतील; पहिल्या धोक्यापेक्षा ही फसवणूक जास्त
भयंकर होईल. 65 पिलाताने त्यांना म्हटले, "तुमच्याजवळ पहारा आहे, जा,
तुम्ही जितका होऊ शकेल तितका जास्त पहारा व बंदोबस्त करा. 66 म्हणून
ते गेले व त्यानी धोंडीवर शिक्कामोर्तब करून चौकीदाराला तेथे बसवले आणि
जास्त कडक पहारा केला.

28 [1] शब्बाथानंतर आठवडयाच्या पहिल्या दिवशी, मग्दालिया मरीया
व दुसरी मरीया कबरेवर आल्या. [2] अचानक, एक मोठा भूकंप झाला
कारण प्रभूंचा एक स्वर्गदूत स्वर्गातून उतरला, त्याने येऊन कबरेच्या दारावरची
धोंड बाजूला केली व तो त्याच्यावर बसला. [3] त्याचे रूप विजेसारखे व त्याचे
वस्त्र बर्फासारखे शुभ्र होते. [4] भीतिमुळे पहारेकरी थरथर कापू लागले आणि
मेलेल्या माणसांसारखे झाले. [5] स्वर्गदूताने त्या स्त्रियांना म्हटले, "तुम्ही भिऊ
नका, कारण मला ठाऊक आहे की येशूंना क्रूसावर खिळले गेले होते, त्याचाच
शोध तुम्ही करत आहात; [6] ते येथे नाही, कारण त्यानी सांगितल्याप्रमाणे ते
उठले आहेत." या आणि ती जागा पहा, जेथे त्याचे शरीर ठेवले होते. [7] आणि
लवकर जाऊन त्यांच्या शिष्यांना सांगा की ते मेलेल्यांतून उठले आहेत. ते
तुमच्या आधीच गालीलात पोहचतील. तुम्ही तेथेच त्यांची भेट घेऊ शकाल"
[8] भीति व आनंदाने भरून त्या कबरेपासून निघून लवकर धावल्या कारण
त्यांना शिष्यांना ही खबर दयायची होती. [9] त्या ही बातमी शिष्यांना देणारच
होत्या की इतक्यात येशू वाटेतच त्यांना भेटले. त्यांच्याजवळ जाऊन त्यानी
येशूंचे चरणस्पर्श करून त्यांना दंडवत केले. [10] तेव्हा येशू त्यांना म्हणाले, "भिऊ
नका, जाऊन माझ्या भावांना सांगा की त्यानी गालीलात जावे, तेथेच मी
त्यांना भेटेन. [11] जेव्हा या स्त्रिया जातच होत्या, तेव्हा काही पहारेकरी त्यांना
दिसले. त्यानी प्रमुख याजकाला सर्व काही सांगितले, [12] जेव्हा त्यांची भेट
इतर परिचित लोकांशी झाली [13] तेव्हा त्यानी शिपायांना मोठी रक्कम देऊन
सांगितले की, "रात्री आम्ही झोपेत असतांना त्याच्या शिष्यांनी येऊन त्याला
चोरून नेले" असे म्हणा. [14] आणि जर ही गोष्ट सुभेदाराच्या कानावर गेली तर
आम्ही त्याला समजावून देऊ आणि तुम्हांला वाचवून सुद्धा घेऊ. [15] त्यानी पैसे
घेऊन तेच केले जे त्यांना करायला सांगितले गेले होते. ही गोष्ट आजपर्यंत यहूदी
लोकांत प्रचलित आहे. [16] तेव्हा अकरा शिष्य गालीलात त्या डोंगरावर गेले
ज्याविषयी येशूंनी त्यांना सांगितले होते. [17] जेव्हा शिष्यांनी येशूंचे दर्शन केले,
त्यांना नमन केले तरी देखील काही लोकांनी शंका व्यक्त केली. [18] येशू येऊन
त्यांना म्हणाले, "स्वर्ग आणि पृथ्वीवरचा सर्व अधिकार मला दिलेला आहे.
[19] तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रातील लोकांना शिष्य करा. त्याचा पिता, पुत्र
आणि पवित्रात्म्याच्या नांवाने बाप्तिस्मा करा; [20] ज्या आज्ञा मी तुम्हांला दिल्या

आहेत त्या सर्व त्यांना पाळावयास शिकवा आणि पहा, युगाच्या समाप्तीपर्यंत, जोपर्यंत जगाचा अंत होत नाही, मी तुमच्याबरोबर आहे.